ISSN-0971-8397

# योजना

विकास समर्पित मासिक

मास्क अप इंडिया

वर्ष ४८ | अंक १० | पाने ५४ | मे २०२१ | मूल्य २२ रु.

## संघराज्य व्यवस्था




मुख्य लेख

संघवादाच्या संकल्पनेची नवी परिभाषा

राजीव कुमार

महाराष्ट्र पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल

अजित पवार

फोकस

गुजरातची विकासगाथा

विजय रूपानी

महाराष्ट्र : साठ वर्षांचा प्रवास

# वस्तू व सेवा कर महसुलाचे विक्रमी संकलन

*एवादी गोष्ट साध्य करणे अतिशय अवघड वाटत असले, तरी कठोर परिश्रम व तपश्चर्येच्या बळावर ती गोष्ट निश्चितच हस्तगत करता येते. आर्य चाणक्याच्या या उक्तीद्वारे वस्तू व सेवा कराची संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट होते. आपल्या देशातील २९ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेशांचा तसेच केंद्राचे सात कर, राज्यांचे आठ कर आणि विविध मालासाठी लादण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या करांचा एकत्रित विचार केला, तर देशभरातील विविध करांची ही संख्या ५०० पर्यंत पोहोचते. पण यापुढे मात्र हे सर्व कर रद्द करून गंगानगर पासून इटानगर पर्यंत व लेह पासून लक्षद्वीप पर्यंत 'एक देश एक कर' ही संकल्पना राबवली जाणार आहे.*


**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**वस्तू व सेवा कर राष्ट्राला अर्पण करताना १ जुलै, २०१७ रोजी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहास भारताच्या पंतप्रधानांचे संबोधन**

वस्तू व सेवा कर (GST) हा ग्रहण कर असून तो पुरवठा साखळीसह अखंडितपणे प्रवाही असणाऱ्या जमा रकमेवर व जमा देयकावर आधारित असतो. या करप्रणालीत प्रत्येक टप्प्यावर होणाऱ्या मूल्यवर्धनावर कर आकारला जातो. या वस्तू व सेवा कर प्रणालीने देशात यापूर्वी अस्तित्वात असणाऱ्या व केंद्र सरकार आणि राज्य सरकार द्वारे स्वतंत्रपणे आकारल्या जाणाऱ्या सर्व ग्रहण करांना अंतर्भूत केले आहे. त्यामुळे करारोपण रचना मोठ्या प्रमाणात संयुक्तिक झाली आहे.

वस्तू व सेवा कराच्या छत्री प्रणालीने विविध केंद्रीय व राज्य करांचे एकात्मीकरण करून करदात्यांसाठी केवळ एका कराची रचना केली आहे. त्यामुळे एक वर्गीय मालाच्या आवक व जावक पुरवठ्याशी सांगड घालणारा माहिती तंत्रज्ञान आधार निर्माण झाला आहे. त्या व्यतिरिक्त विविध करांच्या भडीमाराचा आणि आंतरराज्यिय वाहतुकीसंदर्भात जागोजागी असलेल्या तपासणी नाक्याच्या जाचाचा परिणाम टाळला जाऊन जागतिक स्तरावर भारताची निर्यात प्रणाली अधिक सक्षम ठरली आहे. परिणामी देशाच्या औद्योगिक परिदृष्यात परिवर्तन घडून आले असून वस्तू व सेवा कर संघराज्याच्या वित्त व्यवस्थेतील एक यशस्वी प्रयोग ठरला आहे. वस्तू व सेवा कराची रचना करणाऱ्या कायद्याचे मसुदे लोकशाहीच्या तत्त्वानुसार सार्वजनिक अभिप्रायासाठी प्रत्येक टप्प्यावर सार्वजनिक स्वरूपात मांडून हीतधारकांना अपेक्षित असणाऱ्या कर रचनेबाबत विचार करण्यास उद्युक्त करण्यात आले होते. वस्तू व सेवा कर प्रामुख्याने मालाच्या व सेवांच्या पुरवठ्यावर आकारला जाणारा कर असतो. वस्तू व सेवांच्या आंतरराज्यिय पुरवठ्या संदर्भात केंद्र सरकारद्वारे आकारल्या जाणाऱ्या आणि केंद्र व संबंधित राज्याद्वारे प्रशासित केल्या जाणाऱ्या कराला एकात्मिक कर म्हणून संबोधले जाते. हा कर केंद्र व राज्यांमध्ये विभागला जातो. वस्तू व सेवांच्या राज्यांतर्गत पुरवठ्या संदर्भात हा कर दोन भागात - केंद्र सरकार द्वारे आकारला जाणारा केंद्रीय व संबंधित राज्य / केंद्रशासित प्रदेशाद्वारे आकारला जाणारा कर - आकारला जातो.

*(उर्वरित मजकुर मुखपृष्ठ ३ वर)*



# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४८ ❖ ❖ अंक १० ❖ ❖ २०२१ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन प्रल्हादराव धोपे**

■ संघवादाच्या संकल्पनेची नवी परिभाषा
– राजीव कुमार, उर्वशी प्रसाद, देवाशिष धर ५

■ गुजरातची विकासगाथा – विजय रूपानी १०

■ गुजरातचा विकास व कायापालट – एम. के दास १६

■ कोरोना संक्रमण काळातील वित्तीय संघराज्यवाद
– डॉ.सज्जन एस यादव, सूरज के प्रधान १९

■ मुंबई आणि चित्रपटसृष्टी – हर्षदा वेदपाठक २२

■ महाराष्ट्र : साठ वर्षांचा प्रवास – योजना चमू २७

■ महाराष्ट्र पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल... – अजित पवार ३१

■ महाराष्ट्राची शिक्षण क्षेत्रातील वैभवशाली वाटचाल
– डॉ. अजित मुळजकर, डॉ. नरेश पीनमकर ३५

■ कौशल्य विकास प्रशासन – जुथिका पाटणकर, डॉ.मनीष मिश्रा ३९

■ संघराज्य व्यवस्थेतील आव्हाने आणि पुढची दिशा– समीरा सौरभ ४४

■ पर्यटन आणि महाराष्ट्र - एक अजब रसायन – डॉ. धनंजय सावळकर ४९

■ स्वांतत्र्योत्तर भारताची मानवी निर्देशांकातील प्रगती – नरेश गुप्ता ५१

## सूचना

‘योजना’ हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, ममिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हेकेवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत ‘योजना’ कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुन: प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच ‘योजना’ मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, ‘बी’ विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना - ०२२-२७५६६५८२
ईमेल : myojanadpd@gmail.com

## संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# एकीचे बळ

**राष्ट्रांतर्गत शासनामध्ये ऐक्य व सहकार्य असणे अत्यावश्यक असते**

*– सरदार वल्लभ भाई पटेल*

काही दशकांपूर्वी म्हणजे जेव्हा आपण संघराज्य रचनेबाबत विचार करत होतो तेव्हा केंद्र हे सर्व राज्यांच्या शिरोभागी असावे असे चित्र आपल्या मनात साकारले जात असे. पण या राज्यांमध्ये आपापसातील ताळमेळ आणि एकत्रितपणे विकास व वृद्धी करण्याची भावना आपल्याला क्वचितच आढळते. मात्र निती आयोगाच्या स्थापनेमुळे सहकार्य व संघराज्य वादावर आधारित असणाऱ्या संघराज्य रचनेचा नवा दृष्टीकोण उदयास आला आहे. संघराज्यवाद ही प्रामुख्याने प्रादेशिक पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाच्या दोन भिन्न संचाना सामावून घेणारी संस्थात्मक यंत्रणा आहे. यापैकी प्रत्येक सरकार त्याच्या परीघ क्षेत्रात स्वायत्त असते. भारतीय राज्यघटनेने बळकट केंद्र असलेल्या संघराज्यासाठी तरतूद केलेली आहे. मात्र राज्यघटनेने भारत देशाचा संघराज्य म्हणून नव्हे तर राज्यांची संघटना म्हणजेच काही एकात्मक वैशिष्ट्यांसह अस्तित्वात असणारा सहकारी स्वरूपाचा देश म्हणून उल्लेख केलेला आहे. त्याशिवाय केंद्र, राज्य व समवर्ती यादीमध्ये प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यही हि सीमांकित केली आहेत.

गुजरात आणि महाराष्ट्र ही राज्ये येत्या १ मे रोजी त्यांचा राज्य दिन साजरा करणार आहेत. संसदेने संमत केलेल्या मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार १ मे १९६० रोजी मुंबई राज्यातील काही प्रांत वगळून व ते गुजरात राज्यात समाविष्ट करून गुजरात राज्याची तर उर्वरित प्रांत समाविष्ट करून महाराष्ट्र राज्याची स्थापना केली. येत्या एक मे २०२१ रोजी ही दोन्ही राज्य त्यांच्या स्थापनेच्या ६१ वर्षांची पूर्ती करणार आहेत. या अंकातील त्या राज्यांसंबंधीचे लेख वाचकांना त्या राज्यांच्या गेल्या सहा दशकांतील प्रवासाचा, विकासाचा तसेच परिवर्तनाचा आढावा सादर करतील. देशातील साधन संपत्तीचे विकेंद्रीकरण झालेल्या केंद्र व राज्यांचा दोलायमान तोल सांभाळत आणि कमजोर घटकांना अधिक वाव देत संघराज्याला या सर्वांचे बळकटीकरण करावे लागते. या प्रयत्नांद्वारे संघराज्य विविध राज्यांमध्ये आरोग्य स्वच्छता श्रेणी इत्यादी विषयक निकोप स्पर्धा निर्माण करत असते. या प्रयत्नांमध्ये विविध राज्यांमध्ये संस्कृती विकसित करून नितीमुल्य, सद्भाव, परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण करण्याची संकल्पना दडलेली असते. ही संकल्पना विविध राज्यांमध्ये ऐक्य निर्माण करून त्यांना परस्परांच्या सरहद्दिंचा मान राखत त्या ओलांडण्याचा व तेथील वैविध्याचा आनंद लुटण्याची संधी बहाल करते.

संघराज्याची रचना ही माणसाचा मेंदू व त्याच्या शारीरिक अवयवांसारखी असते. हा मेंदू व इतर शारीरिक अवयव परस्परांशी मेळ साधत जोडीने काम करत असतात. संघ राज्यातही असे अनेक घटक असतात. संघराज्याचे कार्यही नेमके मानवाच्या शरीरासारखेच असते. संपूर्ण देशातील सर्व कार्य निर्विघ्नपणे पार पाडत देशाचा विकास घडवून आणण्याकरता संघराज्याचा प्रत्येक घटक दुसऱ्या घटकावर अवलंबून असतो.





राज्या-राज्यांमधील मतभेदांचे केवळ निराकरण केल्याने राष्ट्रीय ऐक्य साधले जाईल असे नव्हे. अशाप्रकारे लादलेले ऐक्य सामाजिक कलह व परकेपणा निर्माण करून अखेरीस त्या ऐक्याला तडा देते. सामाजिक विविधते बाबत आणि स्वायत्तते बाबत संवेदनशील असणारे प्रतिसादात्मक राजकारण सहकारी संघराज्याला सहाय्यभूत ठरत असते. या संवेदनशीलते बाबत सध्या सुरू असलेल्या महामारी ने आपल्याला अनेक धडे शिकवले आहेत. देशातील विविध राज्यांची साधन संपत्ती या महामारी शी सामूहिक लढा देण्यासाठी कामी आली आहे. म्हणून जागतिक महामारी च्या या संकटावर मात करण्यासाठी केंद्र व राज्यांना एकत्रितपणे लढा द्यावा लागणार आहे. त्यासाठी परस्परांशी ताळमेळ साधत एकमताने परस्परांना पूरक सहकार्य करणे भाग पडणार आहे.

■■■

मुख्य लेख

# संघवादाच्या संकल्पनेची नवी परिभाषा

**– राजीव कुमार, उर्वशी प्रसाद, देवाशिष धर**




**विकास योजना आखण्यासाठी आणि त्यांचा आढावा घेण्यासाठी राज्यांशी केलेल्या भागीदारीद्वारे नीती आयोगाने त्याच्या सहकारी संघवाद आणि स्पर्धात्मक संघवाद या जुळ्या आज्ञावलीची अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करण्याचा प्रयास केला आहे. भारताला सुधारणा हाती घेण्यासाठी मदत करण्यात आणि राज्यांसोबत केलेल्या भागीदारीच्या माध्यमातून प्रमाणबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने धोरणविषयक नव्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात नीती आयोग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो.**

राज्याचा चिरस्थायी वारसा राजकीय केंद्रस्थान आणि इच्छाशक्ती, प्रशासन आणि निगराणी तसेच कणखर आणि मृदू शक्तींसारख्या अनेक घटकांनी निश्चित होत असतो. यापैकी, राज्य सरकार स्वत:कडे उपलब्ध असलेल्या औपचारिक संस्थांच्या साधनांचा उपयोग करून स्वत:ची भूमिका निश्चित करते. सरकारच्या कार्यकाळातील सामाजिक तसेच आर्थिक विकासाच्या मार्गात असलेली आव्हाने समजून घेणे आणि त्यांना यशस्वीपणे तोंड देणे यातून राज्य सरकार त्याची भूमिका स्पष्ट करत असते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा विकास विषयक दृष्टीकोन स्पष्ट करणारी एक अशी संस्था म्हणजे योजना आयोग. २०१५ साली ही भूमिका नीती आयोगाकडे हस्तांतरित झाली. मात्र, भारताचा विकास करण्याचे शिवधनुष्य पेलण्यासाठीचा या दोन्ही संस्थांचा दृष्टीकोन आणि नियमावली यामध्ये बरेच अंतर आहे.

दृष्टिकोनातील हा फरक, नीती आयोगाच्या स्थापनेसाठी मंजूर झालेल्या संसदेच्या ठरावातून दिसून येतो. या ठरावात, महात्मा गांधी यांचे एक वचन उद्धृत केले आहे. सतत विकास करणे हा जीवनाचा नियम आहे आणि जो मनुष्य नेहमीच सुसंगत दिसण्यासाठी त्याची विशिष्ट मते दुराग्रहाने घट्ट धरून बसण्याचा प्रयत्न करतो तो स्वत:ला चुकीच्या स्थानी नेतो. योजना आयोगाने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून काम करताना, विकासाला दिशा देणारा प्राथमिक घटक म्हणून आर्थिक स्त्रोतांचा वापर केला. तर दुसरीकडे, नीती आयोगाचे काम प्रामुख्याने बौद्धिक संपदा तसेच जनादेश आणि राज्य सरकार, नागरी संस्था, खासगी क्षेत्रातील संस्था आणि नाविन्यपूर्ण संशोधन करणाऱ्यांशी असलेल्या अर्थपूर्ण भागीदारीच्या क्षमता आणि अधिकार यांच्या उपयोगातून भारताच्या विकासाची गती वाढविण्यावर आधारित आहे.

योजना आयोगाने निधी वितरक या भूमिकेतून काम केले, तर नीती आयोग सर्व संबंधितांचा विशेषत: देशाच्या आर्थिक वाढीसाठी महत्त्वाचा घटक म्हणून कारणीभूत असणाऱ्या सर्व राज्य सरकारांचा वैचारिक भागीदार म्हणून काम करतो. योजना आयोगाने राज्यांच्या आर्थिक सार्वभौमत्वावर अतिक्रमण केले होते, त्यांना आता त्यांचा निधी सर्वात योग्य प्रकारे वापरण्यासाठीचे निर्णय स्वत: घेण्याची क्षमता प्रदान करण्यात आली आहे. वरपासून खालच्या दिशेने अशा मार्गाचे अनुसरण करून निधीचा वापर करण्याचा हुकुम न देता नीती आयोगाने केंद्र सरकारच्या एकतर्फी अखिल भारतीय विकास धोरणाची रचना करण्याची पद्धत बदलून टाकली आहे. राज्य सरकारांसोबत काम करून संयुक्तपणे विकासाची ब्लू प्रिंट तयार करण्याची योजना असून त्या त्या राज्यांना उपयुक्त ठरतील आणि प्रत्येक राज्यातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेतली जाईल असा आराखडा तयार केला जाणार आहे.

हे लक्षात घ्यायला हवे की योजना आयोगाने भारतातील राज्यांच्या बाबतीत सर्वांसाठी एकच नियम या दृष्टिकोनाचा स्वीकार केला होता. तर दुसरीकडे, नीती

आयोगाने आधी राज्यांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीकोनातून कार्य सुरू केले. आयोगाच्या मुलभूत तत्वांमध्ये सहकारी संघवाद (केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय सहकार्य) आणि स्पर्धात्मक संघवाद(राज्यांराज्यांमध्ये निकोप स्पर्धेला उत्तेजन) यांचा समावेश आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की दुहेरी आज्ञावलीचे हे दोन्ही स्तंभ एकमेकांना पूरक आहेत आणि केंद्र सरकार तसेच सर्व राज्य सरकारांना विभाजित उद्दिष्टांप्रती मार्गदर्शन करण्यासाठी अर्थात सानुकुलीत दृष्टीकोनाच्या स्वीकारासह त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. म्हणून, हात बांधून टाकणाऱ्या दृष्टीकोनाऐवजी, नीती आयोगाने विकेंद्रित तसेच तळागाळापासून समाजाच्या वरच्या थराकडे जाण्याचे धोरण स्वीकारले त्यामुळे भारतीय संघासाठी केंद्र आणि राज्य सरकारांना समसमान भागीदार म्हणून एकत्रितपणे काम करण्याची शाश्वती मिळू शकली.

विकास योजना आखण्यासाठी आणि त्यांचा आढावा घेण्यासाठी राज्यांशी केलेल्या भागीदारीद्वारे नीती आयोगाने त्याच्या सहकारी संघवाद आणि स्पर्धात्मक संघवाद या जुळ्या आज्ञावलीची अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करण्याचा प्रयास केला आहे. नीती आयोगाने राज्य सरकार आणि केंद्र सरकारची विविध मंत्रालये यांच्यात प्रत्यक्ष समस्येवर आधारित संवाद साधण्यासाठी मंच उपलब्ध करून देत त्यातून प्रलंबित समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी मदत केली आहे. ईशान्य प्रदेशासाठी नीती मंचाची स्थापना करण्यात आली असून ईशान्य मंडळाशी एकंदर चौकटीत बसेल अशी भागीदारी करून आणि नीती मंचाने उपलब्ध करून दिलेल्या पाच स्तंभांच्या सहाय्याने तेथील राज्य सरकारे निश्चित प्रादेशिक प्रस्ताव लागू करत आहेत. याशिवाय, नीती आयोगाने बेटांच्या विकासाकरिता काही प्रमुख उपक्रम आखले आहेत आणि गृह व्यवहार मंत्रालयाच्या समग्र मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकारी संस्थांकडून त्यांची अंमलबजावणी होते आहे.

**सरकार त्याची भूमिका स्पष्ट करत असते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा विकास विषयक दृष्टीकोन स्पष्ट करणारी एक अशी संस्था म्हणजे योजना आयोग. २०१५ साली ही भूमिका नीती आयोगाकडे हस्तांतरित झाली. मात्र, भारताचा विकास करण्याचे शिवधनुष्य पेलण्यासाठीचा या दोन्ही संस्थांचा दृष्टीकोन आणि नियमावली यामध्ये बरेच अंतर आहे.**

ईशान्य प्रदेशासाठी स्थापन झालेल्या नीती मंचाप्रमाणेच येत्या काही महिन्यांमध्ये एकमेकांना लागून असलेल्या राज्यांसाठी इतर प्रादेशिक मंडळे स्थापन करण्याचा विचार पुढे येत आहे. त्या दृष्टीने, हिमालयीन राज्यांसाठी प्रादेशिक मंडळाची स्थापना करून आणि त्या राज्यांमध्ये असलेल्या सर्व १३ केंद्रीय विद्यापीठांची संयुक्त आघाडी स्थापन करून या दिशेने पहिले पाऊल टाकण्यात आले आहे. ही विद्यापीठे हिमालय परिसरातील सर्व १३ राज्यांमधील सामायिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी संशोधन करीत आहेत.

नीती आयोग सार्वजनिक डोमेनवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या त्याच्या विभागीय निर्देशांकांमध्ये अधिक सुधारणा करण्याच्या आवश्यकतेतून स्पर्धात्मक संघवादाला प्रोत्साहन देत आहे. पाणी, शिक्षण, आरोग्य, नवीन शोध, निर्यातविषयक सुसज्जता आणि शाश्वत विकास ध्येये यांच्यावर आधारित निर्देशांकांनी मोठ्या प्रमाणात सकारात्मकतेने साऱ्यांचे लक्ष वेधले आहे. हे निर्देशांक तंत्रज्ञानविषयक प्रमाणकांच्या तपशीलवार



आणि कठोर विश्लेषणावर आधारित आहेत. उदाहरणार्थ, आरोग्यविषयक निष्पत्तीच्या कामगिरीवर आधारित निर्देशांक, आरोग्य सुविधांचे परिणाम, प्रशासन आणि यंत्रणांमध्ये वार्षिक पातळीवर सुधारणा यांच्यासह राज्याच्या एकंदर आरोग्यविषयक कामगिरीबद्दलचे चित्र स्पष्ट करतो. त्याच प्रकारे, संयुक्त जल व्यवस्थापन निर्देशांकामुळे पाण्याशी संबंधित मुद्द्यांबाबत गेल्या काही काळात राज्याने किती प्रगती केली याचा अंदाज घेता येतो. या बाबतीत कोणत्या राज्यांनी उत्तम कामगिरी केली तसेच सर्व राज्यांच्या दृष्टीने पाणीप्रश्नाबाबत सखोल कार्य आणि गुंतवणूक आवश्यक असलेले भाग कोणते हे निश्चित करणे याचादेखील यात समावेश आहे. शालेय शिक्षणाच्या दर्जावर आधारित निर्देशांक भारतातील शिक्षण क्षेत्राचे अध्ययन, संधी आणि समानता यांच्या बाबतीतील निष्कर्ष सुधारण्यावरील लक्ष संस्थात्मक करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. ह्या निर्देशांकात शालेय शिक्षण क्षेत्राची एकूण परिणामकारकता आणि कार्यक्षमता यांच्यावर गंभीरपणे प्रभाव टाकणाऱ्या सूचाकांकाच्या संचाचा समावेश होतो.

नीती आयोगाने आपल्या महत्त्वाकांक्षी आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात स्पर्धात्मकतेचा देखील अंतर्भाव केला. प्रशासनाच्या कार्यात सुधारणा तसेच एका पातळीवरील सरकारी एजन्सी आणि संस्थांचे एकत्रीकरण यांवर लक्ष केंद्रित करून या जिल्ह्यांमधील मानवी विकास सूचकांक राष्ट्रीय सरासरीपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवून आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाची आखणी केली आहे. या जिल्ह्यांतील आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषी, जल व्यवस्थापन, आर्थिक समावेशकता, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित सूचकांकांचे नीती आयोगाकडून वास्तविक पद्धतीने परीक्षण होत आहे. त्यांमध्ये





उल्लेखनीय सुधारणा दिसून आली आहे. त्याव्यतिरिक्त, या जिल्ह्यांमध्ये प्रशासनाच्या परिचालनाविषयी अनेक उत्तम पद्धती दिसून आल्या आणि आता त्यांचे प्रमाणन करून काही राज्यांमध्ये ब्लॉक पातळीवर त्यांची त्याच स्वरुपात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नीती आयोगाने राज्य सरकारशी

**योजना आयोगाने निधी वितरक या भूमिकेतून काम केले तर नीती आयोग सर्व संबंधितांचा विशेषत: देशाच्या आर्थिक वाढीसाठी महत्त्वाचा घटक म्हणून कारणीभूत असणाऱ्या सर्व राज्य सरकारांचा वैचारिक भागीदार म्हणून काम करतो. योजना आयोगाने राज्यांच्या आर्थिक सार्वभौमत्वावर अतिक्रमण केले होते, त्यांना आता त्यांचा निधी सर्वात योग्य प्रकारे वापरण्यासाठीचे निर्णय स्वत: घेण्याची क्षमता प्रदान करण्यात आली आहे.**

भागीदारी करून केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयांच्या माध्यमातून अंमलबजावणीसाठी धोरण-संबंधी नवनवीन संकल्पना यापूर्वीही राबविल्या आहेत आणि आता देखील आयोग सतत अशा कल्पना सुचवण्याचे काम करीत आहे. सार्वत्रिक आरोग्य, कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण, पुनर्नवीकरणीय उर्जा, इलेक्ट्रिक वाहतूक सुविधा, खनन क्षेत्रातील सुधारणा तसेच स्त्रिया आणि बालकांचे कुपोषण विरोधी अभियान ही काही उदाहरणादाखल उल्लेख केलेली अशी क्षेत्रे आहेत ज्यामध्ये नीती आयोगाने गेल्या सहा वर्षांच्या कार्यकाळात धोरणविषयक मुलभूत संकल्पना सुचविल्या आहेत.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोग विधेयक तसेच वैद्यकशास्त्र आणि होमियोपॅथी यांच्या संदर्भातील भारतीय यंत्रणांशी संबंधित शिक्षण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठीचे विधेयक अशा दोन्ही विधेयकांचा मसुदा तयार करताना त्या कामात नीती आयोगाने भाग घेतला होता. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये ही तीनही विधेयके मंजूर झाली आहेत.




त्यामुळे, देशात जागतिक दर्जाची वैद्यकीय शिक्षण यंत्रणा उभारण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. जगातील बहुधा सर्वात मोठा आरोग्यविषयक उपक्रम असलेल्या आत्मनिर्भर भारत अभियानाची रचना आणि परीक्षण या दोन्हीमध्ये नीती आयोगाने महत्वपूर्ण सहभाग घेतला होता. पोषण अभियानाच्या वेळी देखील नीती आयोगाने याच प्रकारची जबाबदारी पार पाडली होती. सरकारला एखादी व्यक्ती किंवा घराच्या पोषणविषयक दर्जावर परिणाम करणारी स्वच्छता तसेच आरोग्य सुविधा मिळविण्यासारखे एकमेकांमध्ये गुंतलेले अनेक घटक स्पष्ट करणारी सुयोग्य प्रशासनिक रचना पुरविता यावी म्हणून पोषण अभियान योजना सुरु करण्यात आली आहे. नीती आयोगाने साथ अर्थात मनुष्यबळरुपी संपत्तीमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी शाश्वत कृती कार्यक्रम तीन राज्यांमध्ये लागू केला आणि याचा सकारात्मक परिणाम बघून ह्या उत्तम पद्धतींचा अवलंब इतर राज्यांमध्ये देखील सुरु करण्यावर भर दिला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा आराखडा सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना कळविण्यात आला आहे.

नीती आयोगाच्या स्ट्रॅटेजी फॉर न्यू इंडिया ७५ या दस्तऐवजामध्ये अनेक धोरणविषयक सूचनांचा समावेश आहे. या कागदपत्रांनुसार संक्षिप्त स्वरुपात समाविष्ट असलेल्या सात वर्षे कालावधीसाठीच्या या धोरणाच्या तयारीसाठी त्या त्या विषयातील तज्ञ, राज्य आणि केंद्र सरकारची मंत्रालये आणि विभाग, औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधी आणि नागरी सामाजिक संस्था यांच्याकडून विस्तृत मार्गदर्शन मिळविणे गरजेचे होते. सरकारातील आणि सरकार-बाह्य अशा एकूण १४०० भागधारकांशी चर्चा करून त्यांचा सल्ला घेण्यात आला आणि या दस्तऐवजात सरकारचा संपूर्ण दृष्टीकोन स्पष्ट होईल याची सुनिश्चितता करून घेण्यासाठी अनेक गोष्टींची उजळणी करण्यात आली.

**योजना आयोगाने भारतातील राज्यांच्या बाबतीत सर्वांसाठी एकच नियम या दृष्टिकोनाचा स्वीकार केला होता. तर दुसरीकडे, नीती आयोगाने आधी राज्यांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीकोनातून कार्य सुरू केले.**

नीती आयोगाच्या अनेक कार्यांपैकी सगळ्यात प्रमुख कार्य आणि महत्त्वाचा अनिवार्य नियम म्हणजे उत्पादन – निष्कर्ष यांचे परीक्षण करणारा आराखडा विकसित करणे आणि केंद्र सरकारच्या योजना आणि उपक्रमांचे कठोर मूल्यमापन करणे हे आहे. हे काम DMEO अर्थात परीक्षण आणि मूल्यमापन विकास कार्यालयाद्वारे हाती घेण्यात आले आहे. या कार्यालयाने १४व्या वित्तीय आयोगाच्या कालखंडापासून सुरु असलेल्या योजनांची अंमलबजावणी १५व्या वित्तीय आयोगाच्या कालखंडात देखील सुरु ठेवण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र पुरस्कृत १२५ योजनांचे मूल्यमापन केले. केंद्र सरकारची ६५ हून अधिक मंत्रालये आणि विभागांसाठी फलनिष्पत्ती अंदाजपत्रक तयार करण्यासाठी देखील DMEO सरकारच्या व्यय विभागाला मदत करत असते. त्यासोबतच, पंतप्रधानांकडून ठराविक काळाने घेतल्या जाणाऱ्या आढाव्यासाठी DMEO केंद्र सरकारच्या पायाभूत सुविधा विभागाच्या प्रगतीचा देखील आढावा घेत असते. DMEO त्याच्या कार्यपद्धतीमध्ये अधिक सफाई आणत असून निष्पत्ती आधारित कामगिरी मूल्यमापनाची परिणामकारकता सुधारण्यासाठी त्याचा मानवी साधनसंपत्तीचा पाया देखील मजबूत करीत आहे.

सरकारचा प्रत्येक पातळीवरील कारभार सुधारण्यासाठी DMEO राज्य सरकारांसोबत समान क्षमता स्थापित करता यावी म्हणून सहयोग संबंध प्रस्थापित करीत आहे. याव्यतिरिक्त, नीती आयोग सर्व राज्यांमध्ये शाश्वत विकास कार्यक्रमाच्या होत असलेल्या प्रगतीचे बारकाईने परीक्षण करीत आहे आणि वास्तविक प्रकारच्या

तंत्रज्ञानावर आधारित परीक्षण क्षमता उभारण्यात त्यांना सहभागी करून घेत आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यातील विकास प्रक्रियेत मुख्य प्रवाहातील शाश्वत विकास कार्यक्रमाला मदत होऊ शकेल.

देशभरातील अभिनव संशोधन परीसंस्थेला खतपाणी घालण्यावर देखील नीती आयोगाने लक्ष केंद्रित केले आहे. अटल नवोन्मेष अभियान हा नीती आयोगाने देशाच्या संपूर्ण क्षेत्रावर अभिनव संशोधन आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु केलेला सरकारी उपक्रम आहे. हे अभियान येत्या काही वर्षांतील भारताच्या संशोधन आणि उद्योजकताविषयक गरजा समजून घेण्यासाठी चर्चा आणि तपशीलवार अभ्यासावर आधारित आहे. या अभियानाने शाळा, विद्यापीठ, विविध पातळ्यांवरील औद्योगिक एकके, जोडल्या गेलेल्या स्वयंसेवी संस्था, उपक्रमविषयक भांडवल आणि या प्रक्रियेत सहभागी खासगी संस्था यांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन आणि उद्योजकतेचे एकात्मिक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांगीण दृष्टिकोनाचा स्वीकार केला आहे. अटल नवोन्मेष अभियान अटल टिंकरिंग प्रयोगशाळांच्या माध्यमातून अटल इन्क्युबेशन केंद्रांकडून उत्तेजन मिळालेल्या स्टार्टअप्सद्वारे शालेय विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधनासाठी आवश्यक मनोधारणेला प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहे. आतापर्यंत ११० आकांक्षित जिल्ह्यांसह भारतातील ९०% जिल्ह्यांमध्ये सात हजारांहून जास्त अटल टिंकरिंग प्रयोगशाळांना मान्यता देण्यात आली आहे.

येत्या काही वर्षांत, भारताला अशाच प्रकारचे सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यामुळे देशाचे अत्यंत गुंतागुंतीचे प्रश्न सोडवून विकासाला गती देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे एकत्र येऊन काम करतील. आपल्या तरुण पिढीच्या

**नीती आयोगाच्या स्ट्रॅटेजी फॉर न्यू इंडिया ७५ या दस्तऐवजामध्ये अनेक धोरणविषयक सूचनांचा समावेश होता. या कागदपत्रांमध्ये संक्षिप्त स्वरुपात समाविष्ट असलेल्या, सात वर्षे कालावधीसाठीच्या या धोरणाची तयारीसाठी त्या त्या विषयातील तज्ञ, राज्य आणि केंद्र सरकारची मंत्रालये आणि विभाग, औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधी आणि नागरी सामाजिक संस्था यांच्याकडून विस्तृत मार्गदर्शन मिळविणे गरजेचे होते.**

वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, भारताला, पुढील तीन दशकांमध्ये सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या दरात ठोस वाढ करणे आणि वाढलेल्या दरात सातत्य राखणे गरजेचे आहे. हे लक्ष्य साध्य करण्याच्या दृष्टीने, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाची खात्री देणाऱ्या अनेक नव्या गोष्टींची पायाभरणी करण्यासाठी, संरचनात्मक सुधारणा होत राहणे आवश्यक आहे. भारताला अशा सुधारणा हाती घेण्यासाठी मदत करण्यात आणि राज्यांसोबत केलेल्या भागीदारीच्या माध्यमातून प्रमाणबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने धोरणविषयक नव्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात नीती आयोग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो.

सर्वांसाठी रोजगार निर्माण करून जलद, शाश्वत आणि निर्मळ विकास करण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी आधी योग्य नैसर्गिक आणि सामाजिक पायाभूत सुविधा यांच्यामध्ये गुंतवणूक करण्याची गरज आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नीती आयोग त्याची बौद्धिक रुंदी आणि खोली यांच्यामुळे भारताला मदत करण्यासाठी अत्यंत योग्य संस्था आहे. गेल्या सहा वर्षांपासून केंद्र सरकारने अनेक सुधारणांचे धाडसी निर्णय घेतले आहेत. आता ह्या सुधारणा जोमाने अमलात आणण्याची गरज असून देशाला विकासाच्या पुढच्या पायरीवर नेण्यास मदत करण्याची जबाबदारी राज्यांनी पार पाडायची आहे. उदाहरणार्थ, केंद्र सरकारने कृषी क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा कायदा मंजूर केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी करून उत्पादनात भरघोस वाढ करण्याची तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याची जबाबदारी आता राज्य सरकारांनी घेणे अपेक्षित आहे. या प्रक्रियेत, या नव्या पथदर्शी सुधारणांची अंमलबजावणी तसेच सानुकुलनासाठी राज्य सरकारे नीती आयोगावर एक जबाबदार सहकारी म्हणून नक्कीच विश्वास ठेवू शकतील. या पथदर्शी सुधारणांमध्ये अनुपालनाचे ओझे कमी करणे, जुन्या आणि वापरात नसलेल्या कायद्यांना रद्दबातल करणे आणि खासगी क्षेत्राच्या सहभागाच्या संपूर्ण क्षमतांचा वापर करून घेणे यांसह अनेक सुधारणांचा समावेश आहे. शेवटी, भारताला, उच्च विकास ध्येयांच्या चढत्या मार्गावर घेऊन जाणे आणि विकासाचे लाभ सर्वांना समानतेने मिळतील याची निश्चिती करणे अशा दोन्ही गोष्टींची जबाबदारी केंद्र सरकार आणि राज्य सरकार अशा दोघांवरही आहे. देशातील सहकारी संघवाद सशक्त करण्याच्या दिशेने नीती आयोगाचे कार्य यापुढेही सुरूच राहील आणि त्यातून भारताच्या प्रगतीची सुनिश्चिती करण्यासाठी नीती आयोग केंद्र आणि राज्य सरकारांना एकमेकांचे बरोबरीचे भागीदार म्हणून समन्वयाने काम करण्यास सक्षम करील.

■■■

*राजीव कुमार नीती आयोगाचे उपाध्यक्ष आहेत तर उर्वशी प्रसाद आणि देवाशिष धर सरकारी धोरण तज्ञ आहेत.*

*ईमेल: vch-niti@gov.in*

# गुजरातची विकासगाथा

**– विजय रूपानी**



**१ मे, १९६० रोजी गुजरात राज्याची स्थापना झाली, त्याला आज ६० वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. सुप्रशासन, लोकभिमुख प्रशासन, सर्वांगीण विकास, शांतता, सुरक्षा आणि लोककल्याण अशा अनेक क्षेत्रात प्रभावी काम करून गुजरातने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे आणि त्यामुळे भारतातील आणि जगभरातील साडेसहा कोटी गुजराती लोकांच्या मनात अभिमानाची भावना वृद्धिंगत झाली आहे.**

जेव्हा गुजरात बृहद मुंबईपासून विभक्त झाले आणि स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आले तेव्हा 'गुजरातला' अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. त्यावेळी गुजरातमध्ये शेती करण्यायोग्य जमीन नव्हती, पशुसंवर्धन योजनांचा अभाव होता, सिंचनासाठी पाणी किंवा विजेची सुविधा पुरेशा प्रमाणात नव्हती. चांगल्या रस्त्यांचे जाळे तसेच सुप्रशासन, सरकारी कार्यालये, तंत्रज्ञान, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि आरोग्य सुविधांसह इतर अनेक बाबींसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याची गरज होती.

१ मे, १९६० रोजी गुजरात राज्याची स्थापना झाली, त्याला आज ६० वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. सुप्रशासन, लोकभिमुख प्रशासन, सर्वांगीण विकास, शांतता, सुरक्षा आणि लोककल्याण अशा अनेक क्षेत्रात प्रभावी काम करून गुजरातने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे आणि त्यामुळे भारतातील आणि जगभरातील साडेसहा कोटी गुजराती लोकांच्या मनात अभिमानाची भावना वृद्धिंगत झाली आहे.•'इझ ऑफ डूइंग बिझिनेस' अर्थात उद्योग करण्यातील सुलभतेला प्रोत्साहन दिल्यानंतर गुजरात आता 'इझ ऑफ लिव्हिंग' अर्थात जगण्यातील सुलभतेवर लक्ष केंद्रित करत आहे. गुजरात हे एक आदर्श राज्य आणि भारताच्या विकासाचे इंजिन बनले आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे, तर गुजरात हा विकासाचा समानार्थी शब्द झाला आहे.

गुजरातचा भूगोल, कला, सांस्कृतिक वारसा, शिक्षण, साहित्य, राजकारण, तीर्थक्षेत्र, संत-महंत, येथील महापुरुष, परंपरा, चालीरिती, भोजन, सण, आतिथ्य, पर्यटन, भाषा-बोली, प्राचीन आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाची स्थाने, शांतता आणि सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था, उद्योग, रोजगार, शेती, पशुसंवर्धन, आधुनिक पायाभूत सुविधा या बाबींनी गुजरातची स्वतंत्र ओळख घडवली आहे. त्याचबरोबर महात्मा गांधी, सरदार पटेल आणि नरेंद्र मोदी यांच्यासारखे मेहनती, दूरदर्शी आणि निर्भय नेते, हे गुजरातचे वैशिष्ट्य ठरले आहेत.

**मार्च २०२१ मध्ये गुजरातचा नकाशा**

डॉ.जीवराज मेहता हे गुजरात राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते. त्यांच्यानंतर बलवंतराय मेहता, हितेंद्रभाई देसाई, घनश्यामभाई ओझा, चिमणभाई पटेल, बाबुभाई जे. पटेल, माधवसिंह सोलंकी, अमरसिंह चौधरी, छबिलदास मेहता, सुरेशचंद्र मेहता, शंकरसिंग वाघेला, दिलीपभाई पारीख, केशुभाई पटेल आणि नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या विकासाचा प्रवास सुकर होण्यासाठी काम केले.

गुजरातचे ख्यातनाम सुपुत्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २००१ मध्ये गुजरातचे सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि त्यानंतर सलग १४ वर्षे त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्रीपद भूषविले.

श्री. मोदी यांची देशव्यापी लोकप्रियता, कठोर परिश्रम आणि गुजरातचे ''विकास पुरुष'' अशा ओळखीच्या बळावर २०१४ सालच्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) ला स्पष्ट बहुमत मिळवून दिले. त्यानंतर २६ मे २०१४ रोजी त्यांनी पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारला.

श्री मोदी यांनी गुजरातमध्ये विविध योजना राबवल्या. यापैकी सर्वात उंच पुतळ्याचे लोकार्पण म्हणजेच 'केवडिया

येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी', क्रांतीतीर्थ मांडवी, कृषी महोत्सव, गरीब कल्याण मेळा, चिंतन शिबीर, ज्योतिग्राम योजना, चरण सोलार पार्क, महात्मा मंदिर - गांधीनगर, कन्या केळवणी - शाळा प्रकाशोत्सव, गुणोत्सव, मोढेरा सूर्य मंदिरातील उत्तरार्ध महोत्सव, व्हायब्रंट गुजरात गुंतवणूक संमेलन, अहमदाबाद येथील साबरमती रिव्हरफ्रंट, वन महोत्सव - सांस्कृतिक वनांची निर्मिती, आदिवासींसाठी वनबंधू कल्याण योजना तसेच नाविकांसाठी सागरखेडू सर्वांगी कल्याण योजना अशा महत्वपूर्ण योजनांचा त्यात समावेश आहे.

त्यांच्या कार्यकाळात अनेक विद्यापीठे स्थापन झाली. त्यामध्ये पंडित दीनदयाळ पेट्रोलियम विद्यापीठ, गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी, रक्षा शक्ती युनिव्हर्सिटी, लकुलीश योग विद्यापीठ, गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, आय-क्रिएट, इंडियन इंस्टिट्यूट

**श्री. नरेंद्र मोदी यांच्यानंतर गुजरातच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून आनंदीबेन पटेल मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्या. लैंगिक समानतेवर भर देणाऱ्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले. अंगणवाड्यांमध्ये येणाऱ्या बालकांचे चांगले पोषण व्हावे, यासाठी त्यांनी विविध योजना सुरू केल्या. त्यांच्या कार्यकाळात राज्यव्यापी 'माँ अन्नपूर्णा योजना' सुरू करण्यात आली.**

ऑफ टीचर एज्युकेशन युनिव्हर्सिटी, चिल्ड्रेन्स युनिव्हर्सिटी, श्री गोविंद गुरु विद्यापीठ अशा अनेक विद्यापीठांचा समावेश आहे.

श्री. नरेंद्र मोदी यांच्यानंतर गुजरातच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून आनंदीबेन पटेल मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्या. लैंगिक समानतेवर भर देणाऱ्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले. अंगणवाड्यांमध्ये येणाऱ्या बालकांचे चांगले पोषण व्हावे, यासाठी त्यांनी विविध योजना सुरू केल्या. त्यांच्या कार्यकाळात राज्यव्यापी 'माँ अन्नपूर्णा योजना' सुरू करण्यात आली.

गुजरातच्या जनतेची सेवा करण्यासाठी मी ७ ऑगस्ट, २०१६ रोजी मुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारला. या राज्याचा मुख्यमंत्री म्हणून साडेसहा कोटी गुजरातींच्या सहकार्याने गुजरातला 'उत्तम थी सर्वोत्तम' अर्थात उत्तम पासून सर्वोत्तम घडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. माझ्या सरकारने गेल्या पाच वर्षात लोकहिताचे १७०० पेक्षा जास्त निर्णय घेऊन जनतेची सेवा केली आहे.

गुजरातमधील शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना स्वावलंबी बनवणे, हे सात पगला खेडूत कल्याण ना योजना या योजनेचे उद्दीष्ट आहे. गेल्या चार वर्षांत शेतकऱ्यांकडून आधारभूत दरात १७००० कोटी रूपयापेक्षा जास्त मूल्याच्या शेतमालाची



खरेदी, शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ४५०० कोटी रुपये खर्चाची, देशातील पहिलीच किसान सूर्योदय योजना या आणखी काही महत्वाच्या योजना राबविण्यात आल्या. पहिल्या टप्प्यात याचा ४००० गावांमधील शेतकऱ्यांना फायदा झाला. इतर योजनांमध्ये १५ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना शून्य टक्के दराने पीक कर्ज आणि प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकरी कुटुंबांना ६००० रुपयांची आर्थिक मदत यांचा समावेश आहे.

२०१९ या वर्षात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी सरकारने शेतकऱ्यांना ३७९५ कोटी रुपयांची मदत जाहीर केली तर २०२० सालात ३७०० कोटी रुपयांचे मदत पॅकेज जाहीर करण्यात आले – तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना याचा फायदा झाला. मच्छीमार आणि खलाशी यांच्या कल्याणासाठी नुकतीच, ५०००० कोटी रूपये खर्चाची सागरखेडु सर्वांगी कल्याण योजना – २ घोषित करण्यात आली.

पशुपक्षांच्या सहाय्यासाठी ४०० पेक्षा जास्त फिरते पशुवैद्यकीय दवाखाने तसेच पशुवैद्यकीय सुविधांसाठी १९६२ या टोल फ्री क्रमांकाच्या माध्यमातून सुविधा प्रदान करण्यात आली. ५१४ पांजरपोळ आणि गोशाळांसाठी २४६ कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत तर दुष्काळग्रस्त भागातील सहा लाख प्राण्यांसाठी १८५ कोटी रुपयांहून अधिक मदत प्रदान करण्यात आली आहे.

आदिवासींच्या उत्थानासाठी राज्य सरकारने सन २०१७ सालापासून पंचायत (अनुसूचित क्षेत्रासाठी विस्तार) - पेसा कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली आणि परिणामी ९० लाखापेक्षा जास्त आदिवासींना जमीन आणि वन उत्पन्नाचे हक्क प्राप्त झाले. वन हक्क कायद्यांतर्गत आदिवासींना १३ लाख एकरापेक्षा जास्त वनजमीन मिळाली. या भागातील आदिवासी बालकांना शिक्षण देण्यासाठी ४१ एकलव्य आदर्श निवासी शाळा बांधण्यात आल्या आहेत. सुमारे ७६५ आश्रम शाळा, आदर्श निवासी शाळा आणि एकलव्य शाळांमधील १,३५,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना निवास, जेवण आणि शिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे. आदिवासींच्या संस्कृतीची वैशिष्ट्ये जपणारे आदिवासी राष्ट्रीय संग्रहालय लवकरच ७० एकर जागेवर उभारले जाणार आहे, त्यासाठी शंभर कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे.

कोरोना साथरोगाच्या काळात एप्रिल आणि मे २०२० मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत राज्यातील ६८.८० लाख शिधापत्रिका धारकांना आणि दारिद्र्यरेखा - १ वरील ६१ लाख कार्डधारकांना २००० कोटी रुपये मूल्याचे धान्य मोफत वितरित करण्यात आले. मागच्या वर्षभरात संथनीच्या रूपात ७५०० एकर जमीन वंचित आणि अल्प उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना देण्यात आली. याखेरीज, कमाल शेतजमीन धारणा कायद्यांतर्गत ११,६९२ लाभार्थींना २७,३३० हेक्टर अतिरिक्त जमीन प्रदान करण्यात आली आहे.

प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत २०२२ सालापर्यंत शहरी भागातील ७,६४,००० कुटुंबांना घरे देण्याचे उद्दीष्ट आहे, त्यापैकी पाच लाखापेक्षा जास्त अधिक घरे बांधली गेली आहेत. सेवा सेतू कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, ७/१२ आणि ८-अ अशी अत्यावश्यक कागदपत्रे घरपोच उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. डिजिटल सेवा सेतु अंतर्गत जवळपास ५२ सेवा आणि प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. डिजिटल भारत – गुजरात आणि ज्या मन्वी त्या सुविधा (अर्थात जिथे माणसे, तिथे सुविधा) या मंत्राला अनुसरून हे उपक्रम राबविले जात आहेत.

**जेव्हा गुजरात बृहद मुंबईपासून विभक्त झाले आणि स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आले तेव्हा 'गुजरातला' अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. त्यावेळी गुजरातमध्ये शेती करण्यायोग्य जमीन नव्हती, पशुसंवर्धन योजनांचा अभाव होता, सिंचनासाठी पाणी किंवा विजेची सुविधा पुरेशा प्रमाणात नव्हती.**

लर्निंग विथ अर्निंग या नाविन्यपूर्ण संकल्पनेसह मुखमंत्री अप्रेंटिसशिप योजना सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना अभ्यास करत असताना दरमहा ३००० ते ४५०० रुपयांपर्यंत विद्यावेतन दिले जाते. गेल्या दोन वर्षांत २,३०,००० पेक्षा जास्त युवकांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. गेल्या चार वर्षांत गुजरातमध्ये सरकारी सेवेत दोन लाखाहून अधिक स्त्रिया आणि पुरुषांची नेमणूक करण्यात आली आहे. यूपीएससी, जीपीएससी, गुजरात माध्यमिक सेवा मंडळ अशा विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रशिक्षणासाठी आणि पूर्वतयारीसाठी गुजरातमधील युवा वर्गाला शुल्क सहाय्य सुद्धा दिले जाते. म्हणूनच भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत गुजरातमध्ये बेरोजगारीचा दर सर्वात कमी म्हणजेच ३.५% आहे.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरक्षित नसलेल्या लोकसंख्येसाठी १०% आरक्षण लागू करणारे गुजरात हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. अनारक्षित कोट्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयीन अभ्यासासाठी आणि २०२० सालापर्यंत चार टक्के व्याज दराने १० लाख रुपयांपर्यंतची कर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. ७०,००० पेक्षा जास्त कुटुंबांना या योजनेचा लाभ झाला आहे. त्याचबरोबर परदेशी शिक्षण घेण्यासाठी ४% व्याज दराने १५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज प्रदान केले जाते.

डिजिटल गुजरात मोहिमेचा एक भाग म्हणून ज्ञानकुंज प्रकल्पांतर्गत १६,००० वर्गखोल्यांमध्ये आधुनिक सुविधा प्रदान करण्यात आल्या. १००० रुपयांच्या नाममात्र

किंमतीत विद्यार्थ्यांना १०,००० टॅबलेट्सचे वाटप करण्यात आले. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर ९.५० लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील उच्च तंत्रज्ञान शिक्षणासाठी आधुनिक टॅबलेट्स भेट देण्यात आले आहेत. शोध योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना संशोधनासाठी दोन वर्षे दरमहा १५,००० रुपयांचे सहाय्य दिले जाते.

कलावंतांना मंच प्रदान करण्यासाठी तसेच कला आणि संस्कृतीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी पहिल्यांदाच कला महाकुंभ सुरू करण्यात आला. योग आणि संस्कृत भाषेला चालना देण्यासाठी राज्य योग मंडळ आणि संस्कृत मंडळ स्थापन करण्यात आले आहे. राज्य योग मंडळ स्थापन करणारे गुजरात हे भारतातील पहिलेच राज्य आहे. २००१ साली गुजरातमध्ये केवळ नऊ विद्यापीठे होती, २०२१ सालात गुजरातमधील विद्यापीठांची संख्या ८३ वर पोहोचली आहे.

मुख्यमंत्री महिला उत्कर्ष योजने अंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील प्रत्येकी ५०,००० महिलांना एकत्रित करून एक लाख महिलांचा समूह तयार केला जाणार आहे. राज्य सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या व्याजमुक्त कर्जाचा फायदा १० लाख महिलांना होणार आहे. या योजने अंतर्गत कर्ज देण्यासाठी १००० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.

वहाली डिकरी योजनेंतर्गत दोन लाख रूपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील पहिल्या दोन मुलींना पहिल्या इयत्तेत प्रवेश घेताना ४००० रूपये तर नवव्या इयत्तेत प्रवेश घेताना ६००० रूपये दिले जातात. वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर लग्नाच्या वेळी १ लाख रुपयांची मदत दिली जाते. आतापर्यंत ६००० पेक्षा जास्त कुटुंबांना या योजनेचा लाभ झाला आहे. गंगा स्वरूपा आर्थीक सहाय्य योजनेंतर्गत विधवांना देण्यात येणारे मासिक सहाय्य वाढवून १२५० रूपये करण्यात आले आहे. आतापर्यंत १० लाखापेक्षा जास्त महिलांना याचा लाभ मिळाला आहे.

**कलावंतांना मंच प्रदान करण्यासाठी तसेच कला आणि संस्कृतीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी पहिल्यांदाच कला महाकुंभ सुरू करण्यात आला. योग आणि संस्कृत भाषेला चालना देण्यासाठी राज्य योग मंडळ आणि संस्कृत मंडळ स्थापन करण्यात आले आहे. राज्य योग मंडळ स्थापन करणारे गुजरात हे भारतातील पहिलेच राज्य आहे.**

मा अमृतम-मा वात्सल्य योजनेंतर्गत लाभार्थींना आता ३ लाख रूपयांऐवजी ५ लाख रुपयांची आरोग्य कवच मिळते. आतापर्यंत या योजनेसाठी ७० लाख कुटुंबातील ३ कोटी ५० लाखापेक्षा जास्त लाभार्थींची नोंदणी करण्यात आली आहे. सध्या सुरू असलेल्या कोविड साथरोगाच्या काळात ३३०० पेक्षा जास्त ठिकाणी १७०० पेक्षा जास्त धन्वंतरी रथ कार्यरत आहेत. या सुविधेच्या माध्यमातून आतापर्यंत २ कोटी ५० लाखापेक्षा जास्त नागरिकांना त्यांच्या दारात ओपीडी सुविधा मिळाली आहे. भारत सरकार आणि जागतिक आरोग्य संघटनेने धन्वंतरी रथांच्या माध्यमातून केलेल्या कामाचे कौतुक केले आहे. लोकांच्या आरोग्याला प्राधान्य देत, गेल्या पाच वर्षांत वैद्यकीय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांमध्ये २१७० जागा वाढविण्यात आल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत नवीन वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यात आली आहेत. राजकोट येथे तब्बल २०१ एकर क्षेत्रावर ११९५ कोटी रूपये खर्चून उभारलेल्या अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्थेअंतर्गत ७५० खाटांसह प्रगत वैद्यकीय सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत..

दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी गुजरातमध्ये २०१९ सालापासून दहशतवाद नियंत्रण आणि संगठित गुन्हे कायद्यांतर्गत आजीवन कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. जमीन हडपण्याच्या कारवायांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने गुजरात भूसंपादन प्रतिबंधक कायदा २०२० लागू केला आहे.

सायबर आश्वस्थ नावाचा एक प्रकल्प सुरू झाला आहे आणि गुजरातमध्ये भारतातील पहिला सायबर गुन्हे प्रतिबंधक विभाग तयार करण्यात आला आहे. प्रकल्प आश्वस्थ अंतर्गत ४१ शहरांमध्ये ७००० सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे जाळे विणले गेले आहे. नेत्रम कमांड कंट्रोल सेंटरमार्फत गुजरातमधील ३३ जिल्ह्यांतील नागरिकांना सायबर गुन्ह्यांविरोधात विविध प्रकारचे संरक्षण प्रदान केले जात आहे.

नल से जल कार्यक्रमांतर्गत निर्धारित केलेल्या उद्दिष्टाला अनुसरून प्रत्येक घरात पाणीपुरवठा करण्यासाठी गुजरात सरकार कटिबद्ध आहे. गेल्या दोन वर्षांत २ कोटी ३१ लाख घरांना पाणी उपलब्ध झाले आहे. नल से जल कार्यक्रमांतर्गत पाच जिल्ह्यांमध्ये १००% लक्ष्य गाठले गेले आहे. दुषित पाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी गुजरातच्या शहरी भागांमध्ये वॉटर ग्रिड तयार करण्यात आले आहेत. समुद्राच्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करणारे गुजरात हे तमिळनाडूनंतर भारतातील दुसरे राज्य आहे.

सौराष्ट्र क्षेत्र हिरवेगार करण्यासाठी आणि ८० लाख लोकांना नर्मदा नदीचे पाणी पिण्यासाठी उपलब्ध करून देण्यासाठी सौनी योजना कार्यान्वित करण्यात आली. या सौनी योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात सौराष्ट्रमधील २२ जलाशयांच्या माध्यमातून १,६६,००० हेक्टर क्षेत्रासाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सुजलाम सुफलाम जल अभियानांतर्गत जलसंधारणासंदर्भातील ४१,४८८ कामे पूर्ण करण्यात आली. त्यामुळे पाणीसाठा क्षमतेत ४२०६४ दशलक्ष घनफूट इतकी वाढ झाली आहे. तसेच या कामामुळे एकूण १३०.४७ लाख मानवी दिवसांचा रोजगार

उपलब्ध झाला आहे.

मुखमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत ६८३५ कोटी रूपये खर्चून १०३९९ रस्त्यांची २७०६४ कि.मी. लांबीची कामे पूर्ण करण्यात आली. तसेच १७८४३ गावे आणि १६४०२ उपनगरे कॉंक्रीटच्या रस्त्यांनी जोडली गेली आहेत.

समर्पित धोरणांमुळे गुजरात हे धोरण समर्पित राज्य बनले आहे. बंदरे, पर्यटन, सौर, अवकाश आणि संरक्षण, माहिती तंत्रज्ञान, उद्योग, स्टार्टअप, कृषी आणि वाणिज्य, वस्त्र आणि प्रावरणे, इलेक्ट्रॉनिक्स, वारसा पर्यटन, पवन ऊर्जा, विविध क्षेत्रासाठी प्रोत्साहन, उत्पादन, जैव तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांमध्ये नवनवी धोरणे राबवली जात आहेत. यात न्यू सोलार अँड हायब्रीड पॉलिसी, बागायत मिशन (बागायती आणि औषधी वनस्पतींसाठी भाडेतत्त्वावर जमीन देणे) अशा उपक्रमांचाही समावेश आहे.

२०१९-२० या वर्षात गुजरात हा भारतातील थेट परकीय गुंतवणूकीसाठी सर्वोत्कृष्ट पर्याय मानला जात असे. २०१९-२० या आर्थिक वर्षात गुजरातमध्ये ४३,००० कोटी रूपये पेक्षा जास्त थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. २०१८-१९ च्या तुलनेत या गुंतवणुकीत ३.५ पट वाढ झाली आहे.

राज्यातील आधी उत्पादन, नंतर परवानगी या धोरणाचा मोठाच लाभ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना झाला. उद्योगांना ना हरकत प्रमाणपत्र आणि पहिल्या तीन वर्षांसाठी मंजुरी मिळवण्यातून सूट देण्यात आली आहे. ३० लाखांपेक्षा जास्त एमएसएमई एककांसाठी विशेष कमिशन दर तयार करण्यात आला आहे, ज्यामुळे १ कोटी २५ लाखापेक्षा जास्त तरुणांना रोजगाराची संधी मिळाली आहे.

खाणी आणि खनिजांचा लिलाव ऑनलाईन पद्धतीने केला जातो आणि त्रिनेत्रा ड्रोन पाळत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारदर्शकतेची खातरजमा केली गेली. यातून राज्य शासनाने १६३३ लाख रूपयांपेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त केले आहे. ७० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर १३ औद्योगिक पार्क आणि तीन लॉजिस्टीक पार्क बांधली जाणार आहेत.

सध्या देशभरात थैमान घालणाऱ्या कोविड -१९ साथरोगाच्या काळात गुजरात सरकारने १४००० कोटी रुपयांचे आत्मनिर्भर गुजरात पॅकेज जाहीर केले आहे. या पॅकेजअंतर्गत लहान विक्रेते, दुकान मालक, कामगार इत्यादींना १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज २% व्याज दराने तर १ लाखापेक्षा जास्त (अडीच लाखांपर्यंत) चे कर्ज ४% व्याजदराने दिले जाते आहे.

गुजरातमध्ये भावनगरमधील घोघा ते दक्षिण गुजरातमधील दहेज पर्यंत पहिली रो-रो फेरी सेवा सुरू झाली. यामुळे रस्त्याने कापले जाणारे हे ३६० किमी अंतर आता केवळ ३१ किमी झाले आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी, ई-रिक्षा खरेदीसाठी ४८,००० रुपयांचे अनुदान देण्यात येते आहे. इयत्ता नववी ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकीच्या खरेदीसाठी प्रत्येकी १२००० रुपयांची मदत देण्यात येते.

सौर छते उभारण्याच्या बाबतीत गुजरात राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. राज्यात १.२७ लाखाहून जास्त सौर छते उभारली गेली आहेत, ज्याद्वारे ८८६ मेगावॅट वीजनिर्मिती होते. सौर उर्जा धोरणांतर्गत गेल्या चार वर्षांत सौरउर्जा क्षमतेत १९२५ मेगावॅट इतकी वाढ झाली आहे. सौर छते प्रकल्पाची स्थापित क्षमता ६११.४६ मेगावॅट आहे, जी देशात सर्वाधिक आहे. गुजरातच्या एकूण स्थापित क्षमतेपैकी ३७% उर्जा ही नवीकरणीय उर्जा आहे. कच्छ येथे जगातील सर्वात मोठे संकरित नवीकरणीय ऊर्जा उद्यान उभारले जाणार असून त्याची क्षमता ३०,००० मेगावॅट इतकी आहे.

भारतातील २३०० पेक्षा जास्त सीएनजी स्थानकांपैकी ९२६ पेक्षा जास्त गुजरातमध्ये सक्रिय आहेत. गुजरात सरकारने येत्या काही दिवसांत ९०० पेक्षा जास्त सीएनजी स्थानके उभारण्याची योजना आखली आहे. गुजरातमधील भावनगर येथे जगातील पहिले सीएनजी टर्मिनल उभारले जात असून त्या माध्यमातून दर वर्षी ६ दशलक्ष टन मालवाहतूक केली जाते आहे.

बिगर शेती (एनए) मंजूरी देण्याचा अधिकार जिल्हा पंचायतीकडून काढून घेण्यात आला आणि जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला. नकाशे आणि आराखडे ऑनलाईन उपलब्ध असल्याने ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान झाली आहे. ऑनलाइन पोर्टलद्वारे ३५,००० पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले आहेत.

शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी मागच्या तीन वर्षांत नगररचनेच्या (टीपी) ३११ योजना आणि ४० विकास योजना (डीपी) मंजूर करण्यात आल्या आहेत. त्या माध्यमातून नागरिकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. राज्यात प्रथमच ऑनलाइन विकास परवानगी प्रणाली (ओडीपीएस) सुरू करण्यात आली. श्रावण तीर्थ योजना अंतर्गत ६० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना गुजरातमध्ये यात्राधाम दर्शनासाठी नेले जाते.

पंजाबमधील वाघा-अटारी सीमेखालोखाल गुजरातमधील बनसकांठा येथील नादाबेट सीमा दर्शन हे सीमा पर्यटनासाठी सर्वोत्कृष्ट ठिकाण असल्याचे सिद्ध झाले आहे. २०२० सालात सहा लाखापेक्षा जास्त पर्यटकांनी सीमा दर्शनाचा आनंद लुटला. गिरनार रोपवे मुळे सहा ते सात तासाचा रस्ता अवघ्या ६-७ मिनिटात कापणे शक्य झाले आहे.

गुजरातमध्ये गिर आणि देवलिया सफारी पार्क व्यतिरिक्त अमेर्ली येथे अंबार्डी सफारी पार्क सुरू करण्यात आले आहे, जेथे सुप्रसिद्ध आशियाई सिंहांचे वास्तव्य आहे. द्वारका येथून बारा किमी अंतरावर असलेला शिवराजपूर समुद्रकिनारा, हा

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित केला जात आहे. हे स्थान भारतातील अशा आठ समुद्र किनाऱ्यांमध्ये समाविष्ट आहे, ज्यांना ब्लू फ्लॅग बीचचा दर्जा देण्यात आला आहे. बालासिनोरच्या रायोली गावात भारतातील एकमेव डायनासोर फॉसिल पार्क तयार करण्यात आले आहे. हे भारतातील सर्वात मोठे आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे डायनासोर जीवाश्म स्थान आहे.

महात्मा गांधीजींच्या जीवनाशी संबंधित स्थाने जोडण्यासाठी ९३ कोटी रूपये खर्चून गांधी टूरिस्ट सर्किट विकसित केले जात आहे. यात गांधीनगर येथील दांडी कुटीर, पोरबंदर येथील कीर्ती मंदिर, राजकोट येथील महात्मा गांधी संग्रहालय (अल्फ्रेड हायस्कूल) आणि नवसारी येथील राष्ट्रीय मीठ सत्याग्रह स्मारक (दांडी स्मारक) या ठिकाणांचा समावेश आहे.

साबरमती रिव्हरफ्रंट अहमदाबाद पासून केवडिया येथील १८२ मीटर उंचीच्या स्टॅच्यू ऑफ युनिटी दरम्यान पहिली सी-प्लेन सेवा सुरू झाली. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी या सेवेचे उद्घाटन केले. सन २०२० मध्ये ४३ लाखाहून अधिक पर्यटकांनी या स्टॅच्यू ऑफ युनिटी ला भेट दिली आणि एक नवाच विक्रम प्रस्थापित केला. अमेरिकेतील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी या ठिकाणापेक्षा स्टॅच्यू ऑफ युनिटीला भेट देणाऱ्यां पर्यटकांची संख्या जास्त आहे, जी आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

प्रशासकीय कामांच्या सद्यस्थितीचा थेट आढावा घेण्यासाठी गांधीनगरमध्ये इन-हाऊस सीएम डॅशबोर्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. या डॅशबोर्डवर कामगिरीशी संबंधित ३००० पेक्षा जास्त मानकांची दखल घेतली जाते. या डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून मुख्यमंत्री लोकहिताच्या जिल्हास्तरीय उपक्रमांची प्रगती आणि सद्यस्थिती पाहू शकतात. मुख्यमंत्री साठे मोकळा मन्रे या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री गांधीनगर येथील निवासस्थानी वंचित आणि अल्पसंख्याक समाजातील लोकांशी संवाद साधतात. त्यांच्या तक्रारी ऐकल्यानंतर ते त्यांच्या गरजा आणि मागण्या पूर्ण करण्यासाठी त्वरीत निर्णय घेतात आणि कृती करतात.

**प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत २०२२ सालापर्यंत शहरी भागातील ७,६४,००० कुटुंबांना घरे देण्याचे उद्दीष्ट आहे, त्यापैकी पाच लाखापेक्षा जास्त अधिक घरे बांधली गेली आहेत.**

१९६०-६१ या वर्षासाठीचा गुजरात राज्याचा पहिला अर्थसंकल्प २२/०९/१९६० रोजी विधानसभेत सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पाचा एकूण आकार ११४,९२,८६,००० रुपये इतका होता. २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षातील गुजरात राज्याच्या ७७ व्या अर्थसंकल्पाचा एकूण आकार २,२७,०२९ कोटी रुपये इतका आहे. गुजरात राज्याची आर्थिक प्रगती दर्शविण्याच्या दृष्टीने ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे.

देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात आठ टक्के इतके महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या गुजरात राज्य सरकारच्या अथक प्रयत्नांमुळे राज्यात एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० या कालावधीत १,१९,००० कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) करण्यात आली. थेट परकीय गुंतवणूकीची ही रक्कम, या काळात देशभरात झालेल्या एकूण भांडवली गुंतवणुकीच्या ५३% इतकी आहे. देशाच्या एकूण निर्यातीत गुजरातचा वाटा २३% पेक्षा जास्त आहे आणि नीती आयोगाने जाहीर केलेल्या निर्यात सज्जता निर्देशांक २०२० मध्ये गुजरात राज्य पहिल्या स्थानावर आहे. स्टार्टअप क्रमवारी तसेच लॉजिस्टिक क्रमवारीतही मागची सलग दोन वर्षे गुजरात अव्वल स्थानी विराजमान आहे.

अहमदाबाद ते मुंबई दरम्यान देशातील पहिली बुलेट ट्रेन सेवा लवकरच सुरू होणार आहे. ढोलेरा येथे भारतातील पहिले स्मार्ट शहर विकसित केले जात आहे. केंद्र शासनाने सहा स्मार्ट शहरांच्या यादीत त्याचा समावेश केला आहे. अहमदाबाद येथे जागतिक दर्जाचे सरदार वल्लभभाई पटेल स्पोर्ट्स एन्क्लेव्ह उभारले जाते आहे, जेथे एशियाड आणि ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन करणे शक्य होईल. अलीकडेच 'नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियम' या जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन झाले असून, त्याची प्रेक्षक क्षमता १.२५ लाख इतकी आहे. युनेस्कोने चंपानेर आणि पाटण येथील राणी की वाव, या ठिकाणांना वारसा स्थान म्हणून घोषित केले आहे तर पहिले वारसा शहर म्हणून अहमदाबादचा समावेश करण्यात आला आहे. गुजरातमधील सुरत, राजकोट, अहमदाबाद आणि वडोदरा या शहरांचा समावेश जगातील २५ प्रमुख विकसित शहरांमध्ये करण्यात आला आहे.

२०१९ सालच्या भारतीय वन सर्वेक्षण अहवालानुसार गुजरातमध्ये मागच्या दोन वर्षात वृक्ष आच्छादित क्षेत्रात १०,००० हेक्टर इतकी वाढ झाली आहे तर वनांव्यतिरिक्त हरीत क्षेत्रात ३,९६,००० हेक्टर इतकी वाढ झाली आहे.

असंख्य गुजराती बंधु भगिनींनी राज्याच्या पायाभरणीपासून ते आजवरच्या प्रगतीत मोलाचा हातभार लावला आहे, असे मी अभिमानाने म्हणू शकतो. त्यांच्या कष्टाची फळे आम्ही चाखत आहोत. विकासाचा हा प्रवास आपण एकमेकांच्या सोबतीने पुढे नेला पाहिजे आणि गुजरातमधील प्रत्येक नागरिकाच्या उन्नतीसाठी तसेच विकासासाठी आपण गुजरातला उत्तम थी सर्वोत्तम अर्थात उत्तम पासून सर्वात्तम राज्य म्हणून विकसित केले पाहिजे.

■■■

***लेखक हे गुजरात राज्याचे मुख्यमंत्री आहेत.***

***ईमेल: vijayrupanicm@gmail.com***

# गुजरातचा विकास व कायापालट

**– एम. के दास**




**पायाभूत सुविधा हे गुजरातचे बलस्थान ठरले आहे. रस्त्यांची जोडणी, रेल्वेचे जाळे, बंदर, विमानतळे, वीज पुरवठा व वीज संजाले भरपूर प्रमाणात आहेत. गुंतवणूकदारांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यात यश आले असून राज्याची डिजिटल भू पेढी किंवा बँक ३३ हजार हेक्टर्सची आहे. त्यातून गुंतवणूकदारांना फायदा होतो. ते त्यांना हवी ती जागा उद्योगांसाठी निवडू शकले. याशिवाय आत्मनिर्भरतेसाठी उत्पादन क्षेत्रातही भर देण्यात येत आहे. राज्याने गुजरात सौर धोरण २०२१ जाहीर केले असून त्यात औद्योगिक कारखान्यांचा विजेचा खर्च पन्नास टक्क्यांनी कमी करण्याचा उद्देश होता. एकात्मिक वितरण धोरण व सेवा क्षेत्र धोरणास उत्तेजन देण्यासाठी आयटी, बँकिंग व आर्थिक सेवा तसेच पर्यटन यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.**


गुजरात हा प्रदेश आता देशाचे उत्पादन केंद्र बनला आहे. देशातील स्थित्यंतरात्मक प्रारूप आज आत्मनिर्भर भारतात योगदान देत आहे. उर्जा, रस्ते, वायू, बंदरे व रेल्वे या क्षेत्रात गुजरात आघाडीवर आहे. मोक्याचे ठिकाण, उद्योगस्नेही धोरणे, देशी व परदेशी गुंतवणूक यात गुजरात आघाडीवर आहे.

एप्रिल २०२० अखेर गुजरात राज्यात १.५८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. २०२०-२१ या वर्षातील पहिल्या सहा महिन्यात परदेशी गुंतवणूक ५५० टक्क्यांनी वाढली आहे. २०१९-२०२० मध्ये गुजरातमध्ये थेट परदेशी गुंतवणूक २४० टक्के वाढली होती. गुजरातची अर्थव्यवस्था विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. प्रशासन, पारदर्शकता, गुंतवणूकदार स्नेही संबंध, ठोस पायाभूत सुविधा, अनुकूल धोरणे यामुळे हा विकास होतो आहे. या घटकांमुळे राज्यातील परदेशी गुंतवणूक वाढली असून गुजरातमध्ये एप्रिल २००० ते मार्च २०२१ या काळात ७.२ अब्ज डॉलर्सची परदेशी गुंतवणूक आली. एप्रिल २०११ ते डिसेंबर २०२० या काळात ४०.७ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आली. देशांतर्गत गुंतवणुकीच्या बाबतीतही गुजरात आघाडीवर आहे. औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांशी सामंजस्य करारात राज्य आघाडीवर आहे २०१९ पासून या पातळीवरील प्रत्यक्ष गुंतवणूक मोठी आहे. सामंजस्य करारही जास्त आहेत. अशा करारांमध्ये राज्य ५१ टक्के वाटा घेऊन पहिल्या क्रमांकावर आहे. २०१९ मध्ये यातून ४९ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक झाली. गुजरातने थेट परदेशी गुंतवणूक अनेक क्षेत्रात मिळवली आहे त्यात पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, सेवा क्षेत्र, स्वयंचलित वाहने, सिमेंट, जिप्सम यांचा समावेश आहे. फॉर्च्युन ५०० कंपन्यांतील किमान १०० बहुराष्ट्रीय व मोठ्या कंपन्या, ३५ लाख लघु व मध्यम उद्योग गुजरातेत आले. गुजरात आता देशाची धातू राजधानी होण्याच्या मार्गावर आहे. यातून उद्योगांना पुरवठा साखळ्या स्थानिक करण्यास मदत झाली स्थानिक उद्योग परिसंस्था विविध समस्यांवर किफायतशीर व शाश्वत उत्तरे शोधत आहेत. गुजरातच्या स्थित्यंतराचे प्रारूप हे आज भारताच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेत मार्गदर्शक ठरत आहे. गुजरात राज्य हे पर्यावरण व उद्योगस्नेही स्वरूप निर्माण करण्यात आघाडीवर आहे. राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या समन्वयाने उद्योगांवरचे अनुपालनाचे ओझे कमी झाले आहे. त्यातून राज्याचा विकास वाढला आहे. राज्यात केंद्र सरकारकडून गुंतवणुकीस पोषक निर्णय होत आहेत त्यात कंपनी कर कमी करण्याचा निर्णय सर्वात महत्वाचा होता. उद्योगस्नेही वातावरणासाठी केंद्र सरकारने अनेक सुधारणा केल्या. त्यातून उद्योगांनीही अनुपालन केले. यात केंद्र सरकारने आत्मनिर्भर भारताचा दृष्टिकोन पुढे नेण्यासाठी उत्प्रेरकाचे काम केले.

गुजरात सरकारने कोविड १९ काळातही अनेक धाडसी निर्णय घेतले असून आर्थिक आव्हाने पेलली आहेत. गुंतवणूकदार व ग्राहक यांच्या वाढत्या विश्वासातून हे सगळे काम सोपे झाले. करोना साथीच्या काळात लघु व मोठ्या उद्योगांची वाढ झाली. टाळेबंदीनंतर उर्जावापर, वायू वापर गतवर्षाच्या तुलनेत अनुक्रमे १० व २५ टक्क्यांनी वाढला.







त्यामुळे उद्योग पुन्हा सावरू लागले आहेत. कामगार कायद्यातून सूट मिळाल्याने उद्योग सुरळित होऊ लागले आहेत. याशिवाय गुजरात सरकारने लघु उद्योगांसाठी नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

पायाभूत सुविधा हे गुजरातचे बलस्थान ठरले आहे. रस्त्यांची जोडणी, रेल्वेचे जाळे, बंदर, विमानतळे, वीज पुरवठा व वीज संजाले भरपूर प्रमाणात आहेत. गुंतवणूकदारांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यात यश आले असून राज्याची डिजिटल भू पेढी किंवा बँक ३३ हजार हेक्टर्सची आहे. त्यातून गुंतवणूकदारांना फायदा होतो. ते त्यांना हवी ती जागा उद्योगांसाठी निवडू शकले. याशिवाय आत्मनिर्भरतेसाठी उत्पादन क्षेत्रातही भर देण्यात येत आहे. राज्याने गुजरात सौर धोरण २०२१ जाहीर केले असून त्यात औद्योगिक कारखान्यांचा विजेचा खर्च पन्नास टक्क्यांनी कमी करण्याचा उद्देश होता. एकात्मिक वितरण धोरण व सेवा क्षेत्र धोरणास उत्तेजन देण्यासाठी आयटी, बँकिंग व आर्थिक सेवा तसेच पर्यटन यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. औद्योगिक परिसंस्था व विकास याला महत्व देऊन उद्योगांचा एकात्मिक विकास साधण्यात आला. अलिकडच्या अर्थसंकल्पात फिनटेक केंद्र गुजरात आंतरराष्ट्रीय वित्त तंत्रज्ञान शहरात सुरू करण्यात आले. तंत्रज्ञान कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्रही स्थापन करण्यात आले. भौगोलिकदृष्ट्या समतोल विकास व भविष्यवेधी प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यात डीएफसी, डीएमआयसी, ढोलेरा सर, मंडल बेचाराजी, पीसीपीआयआर यांचा समावेश आहे. गुजरातेत गुंतवणुकीला बराच मोठा वाव आहे. ढोलेरा हे त्यासाठी मोठे काम करणारे आकर्षक गुंतवणूक केंद्र आहे. तेथे अक्षय ऊर्जा व लिथियम आयन बॅटरी उत्पादन प्रकल्प उभारले जात आहेत. या शिवाय भविष्यवेधी पायाभूत प्रकल्प विकासात रेल्वे मार्गिका आहेत. त्यात गुजरातमधील अहमदाबाद-ढोलेरा द्रुतगती मार्ग महत्वाचा आहे. भाडभूत बंधारा प्रकल्प नर्मदा नदीवर होत आहे. सुरतमध्ये हिरे संशोधन व व्यावसायिक केंद्र आहे. कच्छ मध्ये जगातील सर्वात मोठे सौर व वायू उर्जा

**गुजरात हा प्रदेश आता देशाचे उत्पा दन केंद्र बनला आहे. देशातील स्थित्यंतरात्मक प्रारूप आज आत्मनिर्भर भारतात योगदान देत आहे. उर्जा, रस्ते, वायू, बंदरे व रेल्वे या क्षेत्रात गुजरात आघाडीवर आहे. मोक्याचे ठिकाण, उद्योगस्नेही धोरणे, देशी व परदेशी गुंतवणूक यात गुजरात आघाडीवर आहे.**

केंद्र असून त्याची क्षमता ३० गिगावॉट आहे.

गुजरात हे धोरणांवर चालणारे राज्य असून एकूण वीस धोरणे गेल्या पाच वर्षात जारी करण्यात आली आहेत. त्यात उद्योगांना अनुकूलता देण्यात आली. हरित उत्पादन संकल्पनेला प्राधान्य देण्यात आले. पायाभूत सुविधा व नवप्रवर्तनातही गुजरात आघाडीवर आहे. गुजरात सरकारने अलिकडे उद्योग धोरण २०२० जाहीर केले होते. त्यात उद्योजकतेला प्रोत्साहन होते. त्याला निर्यात स्पर्धात्मकतेची जोड होती. व्होकल फॉर लोकल,जागतिक पातळीवर जाण्यासाठी आधी देशात उत्तम दर्जाची उत्पादने तयार करण्याचा हा आग्रह होता. आत्मनिर्भर भारत योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने १५ क्षेत्रे भर देण्यासाठी निवडली असून तेथे उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यात नऊ प्रमुख क्षेत्रांचा समावेश आहे. सहा उदयोन्मुख क्षेत्रे आहेत यात १०० टक्के प्रकल्प हे निर्याताभिमुख आहेत. राज्य वस्तू व सेवा कराशी संबंधित उद्योगांची प्रोत्साहने देणारे गुजरात हे पहिले राज्य ठरले आहे. गुजरात सरकारने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाला प्राधान्य दिले असून ते आधी उत्पादन व मग परवानगी या दृष्टिकोनाशी संबंधित आहे. राज्यसरकारने गुजरात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (सुविधा आस्थापना व संचालन) संबंधित एमएसएमई कायदा २०१९ संमत केला. पहिली तीन वर्षे या उद्योगांना पूर्वपरवानगी घेण्याची गरज नाही. त्या काळात ते उद्योग यशस्वीपणे सुरू करण्यासाठी प्रयत्न करू शकतात. आजपर्यंत ९०० लघु व मध्यम उद्योगांना याचा फायदा झाला. राज्य सरकारने काही बँकांशी सामंजस्य करार करून लघु व मध्यम उद्योगांना कर्ज देण्याची सोय केली आहे. गुजरात सरकारने लघु व मध्यम उद्योगांना मोठे प्रोत्साहन दिले आहे. यामुळे गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले असून टाटा मोटर्स प्रकल्प साणंद येथे सुरू झाला. त्याला कारण राज्याची उद्योग अनुकूल धोरणे हेच होते. त्यातून स्वयंचलित वाहन क्षेत्रात गुजरातमध्ये गुंतवणूक वाढली. आता ते स्वयंचलित उद्योगांसाठी केंद्र बनत आहे. सुझुकी मोटर, फोर्ड इंडिया, होंडा, हिरोमोटोरॉर्प यांनी गुजरातमधून कामकाज सुरू केले आहे. त्यामुळे रासायनिक, धातू उद्योग, वाहतूक या क्षेत्राकडून नव्या क्षेत्राकडे गुंतवणूक वळत आहे. त्यात दूरसंचार, स्वयंचलित वाहने व अक्षय उर्जा तसेच वस्त्रोद्योग तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. गुंतवणूक वाढल्याने गुजरातेत बेरोजगारीचा दर कमी झाला असून आता तो शहरी क्षेत्रात सर्वात कमी ३.४ टक्के आहे. कर्नाटक व महाराष्ट्रात तो अनुक्रमे ५.३ व ६.६ टक्के आहे, असे २०१८-१९ च्या कालविशिष्ट कामगार सर्वेक्षणातून दिसून येते.

**गुजरात सरकारने कोविड १९ काळातही अनेक धाडसी निर्णय घेतले असून आर्थिक आव्हाने पेलली आहेत. गुंतवणूकदार व ग्राहक यांच्या वाढत्या विश्वासातून हे सगळे काम सोपे झाले. करोना साथीच्या काळात लघु व मोठ्या उद्योगांची वाढ झाली. टाळेबंदीनंतर उर्जावापर, वायू वापर गतवर्षाच्या तुलनेत अनुक्रमे १० व २५ टक्क्यांनी वाढला. त्यामुळे उद्योग पुन्हा सावरू लागले आहेत.**



कौशल्य विकासवृद्धी व रोजगार निर्मिती यांना उत्तेजन देण्यासाठी गुजरात विशिष्ट शिक्षण प्रदेश म्हणजे जी-एसइआर तयार करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यात ढोलेरा येथे पाच हजार एकर परिसरात शिक्षण केंद्र स्थापन केले जाणार असून नवीन उद्योगांना हवे असलेले अभ्यासक्रम, प्रशिक्षण, आवश्यक कौशल्ये यांची सोय त्यात होणार आहे. यात कौशल्य प्रशिक्षण हा महत्वाचा भाग आहे.गरजेनुसार प्रशिक्षणाचे तत्व त्यात अंमलात आणले जाणार आहे. गुजरात प्रदेश हा वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी, रसायने, पेट्रोरसायने, औषधे, दुग्ध व्यवसाय, सिमेंट, सिरॅमिक्स, हिरे व पाचू तसेच दागिने यासाठी अग्रेसर आहे. या सर्व क्षेत्रात गुजरातमध्ये देशात सर्वाधिक गुंतवणूक होत आहे. केंद्र सरकारच्या आणखी सहकार्यातून व आत्मनिर्भर भारताच्या नव्या दृष्टिकोनातून राज्याकडे आणखी गुंतवणूक आकर्षित होईल व त्यातून औद्योगिक वाढ एक नवी उंची गाठेल यात शंका नाही.

■■■

***लेखक हे आयएएस अधिकारी असून गुजरातच्या उद्योग व खाण खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव आहेत.***

***ईमेल : secimd@gujarat.gov.in***

# कोरोना संक्रमण काळातील वित्तीय संघराज्यवाद

– डॉ.सज्जन एस यादव, सूरज के प्रधान



**कोरोना महामारीच्या सुरुवातीच्या टप्प्यात, संसर्ग पसरण्यापासून रोखण्यासाठी लॉकडाऊन आणि नागरिकांनी सार्वजनिक व्यवहारांत परस्परांत सामाजिक अंतर राखण्यासाठी घालून दिलेल्या नियमांमुळे सर्वच स्तरावर आर्थिक व्यवहारांना ठपका बसला. लोकांचे वेतन कमी झाले पण खर्च वाढले. राज्यांना त्यांच्या रोख निधीच्या गरजेसाठी आर्थिक मदतीची आवश्यकता होती. या अडचणीतून मार्ग काढत भारत सरकारने 'वित्तीय संघराज्य' हा पर्याय निवडला. यात विविध उपाययोजनांद्वारे केंद्राने या संसर्गाविरूद्ध लढा देण्यासाठी, आर्थिक व्यवहार सुरळीत करण्यासाठी आणि सार्वजनिक सेवा देण्याचे मानक स्थिर राखण्यासाठी पुरेशी संसाधने उपलब्ध करुन दिली.**

आजच्या या घडीला संपूर्ण जग एक अभूतपूर्व लढाई लढत आहे. हे युद्ध एका अनोख्या तसेच प्राणघातक शत्रूंविरूद्ध आहे. श्वसनयंत्रणेला निकामी करू शकणारा हा गंभीर कोरोना व्हायरस-२ (एसएआरएस-कोव्ही-२) नावाचा अत्यंत संक्रामक विषाणू आहे. यामुळे कोविड -१९ हा आजार बळावतो. या रोगामुळे जगभरात या शतकातील सर्वात मोठे आरोग्य संकट निर्माण झाले आहे. याचा प्रभाव इतका तीव्र आहे की यामुळे कित्येक देशांच्या अर्थव्यवस्था डगमगल्या. कैक कुटुंब, माणसं मृत्यू पावली तसेच सामाजिक, मानसिक व शारिरीक अशा सर्व स्तरावर अभूतपूर्व दुर्बलता निर्माण झाली. या संकटाचा सामना करण्यासाठी भारत सरकारने वित्तीय संघराज्यवादाचे तत्व अंगिकारले. अनेक उपाय योजनांच्या माध्यमातून केंद्र सरकारने देशातील सर्व राज्य सरकारांना या संसर्गाविरूद्ध लढा देण्यासाठी, आर्थिक व्यवहारांना चालना देण्यासाठी आणि सार्वजनिक सेवा देण्याचे मानक राखण्यासाठी मार्गदर्शन करत पुरेशी संसाधने उपलब्ध करुन दिली.

नोव्हेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहानमध्ये या आपत्तीची सुरुवात झाली आणि ती अल्पावधीतच जगभरात वेगाने पसरली. ३० जानेवारी, २०२० रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यविषयक सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित करण्यात आली आणि ११ मार्च २०२० रोजी जागतिक महामारी असा साथीचा रोग म्हणून कोरोनाला जागतिक संसर्गजन्य आजार म्हणून घोषित करण्यात आले. या महामारीकारक रोगाचे थैमान व संक्रमणाची व्याप्ती अभूतपूर्व अशीच ठरली. ८ एप्रिल २०२१ पर्यंत जागतिक पातळीवर हा संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या २८,७५,६७२ असून यामुळे सुमारे १३,२४,८५,३८६ लोक मृत्युमुखी झाले.

भारतात पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली सरकारने ''सहकारी संघराज्य'' हा मार्ग अनुसरून कोरोनाच्या प्रसाराला प्रतिबंध करण्यासाठी इतर देशांसाठी अनुकरणीय ठरेल अशी एक लढाईच लढली. या भयानक ठरलेल्या साथीच्या रोगाचा संपूर्ण देशभर असलेला मानवी आणि आर्थिक प्रभाव मर्यादित ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी एकत्रितपणे कार्य केले आहे.

सुरुवातीच्या टप्प्यात, संसर्ग पसरण्यापासून रोखण्यासाठी लॉकडाऊन आणि नागरिकांनी सार्वजनिक व्यवहारांत परस्परांत सामाजिक अंतर राखण्यासाठी घालून दिलेल्या नियमांमुळे सर्वच स्तरावर आर्थिक व्यवहारांना ठपका बसला. लोकांचे वेतन कमी झाले पण खर्च वाढले. राज्यांना त्यांच्या रोख निधीच्या गरजेसाठी आर्थिक मदतीची आवश्यकता होती. या अडचणीतून मार्ग काढत भारत सरकारने 'वित्तीय संघराज्य' हा पर्याय निवडला. यात विविध उपाययोजनांद्वारे केंद्राने या संसर्गाविरूद्ध लढा देण्यासाठी, आर्थिक व्यवहार सुरळीत करण्यासाठी आणि सार्वजनिक सेवा देण्याचे मानक स्थिर राखण्यासाठी पुरेशी संसाधने उपलब्ध करुन दिली.

**राज्यांची कर्ज घेण्याची मर्यादा वाढविणे**

राज्य सरकारांना त्यांची वित्तीय तूट

भरून काढण्यासाठी कर्ज घेण्याचे महत्त्वाचे स्त्रोत असतात. भारतात, राज्यांनी केंद्राकडून कर्ज घेणे हे भारतीय राज्यघटनेच्या कलम २९३च्या तरतुदींद्वारे संचालित केले जाते. वित्तीय वितरणात समतोल व तारतम्य राखण्यासाठी, केंद्र सरकारने राज्य सरकारांना वित्तीय वर्षात त्यांच्या जीएसडीपीच्या ३% निव्वळ कर्ज घेण्याच्या मर्यादेमध्ये कर्ज घेण्याची परवानगी दिली.

तथापि, राज्यांच्या महसुली प्राप्तीतील अडचणीमुळे राज्य वित्तपुरवठ्यातील ताण कमी करण्यासाठी, भांडवली खर्चातील तीव्र घट टाळण्यासाठी आणि संकुचित वित्तीय आवेग रोखण्यासाठी भारत सरकारने १७ मे, २०२० रोजी राज्यांची कर्ज घेण्याची मर्यादा वाढविली. २०२०-२१ आर्थिक वर्षासाठी राज्ये त्यांच्या जीएसडीपीच्या २% ने अतिरिक्त कर्ज घेऊ शकतील अशी तरतूद देण्यात आली. यामुळे राज्यांना अतिरिक्त ४.२८ लाख कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले.

हे अतिरिक्त कर्ज घेण्यातील निम्म्या रक्कमेची सुविधा बिनशर्त होती तर उर्वरित रक्कम निर्दिष्ट, मोजण्यायोग्य आणि व्यवहार्य अशा नागरी सुधारणांत राज्यांनी निधी द्यावा अशा अटीवर देण्यात आली. यात चार नागरिक कल्याणाशी संबंधित क्षेत्रांचा समावेश होता- एक राष्ट्र एक रेशन कार्ड, व्यवसाय सुलभता योजना, वीज क्षेत्र आणि शहरी स्थानिक संस्था सुधारणा. जीएसडीपीच्या ०.२५% कर्ज घेण्याची परवानगी वरील प्रत्येक क्षेत्रात सुधारणा पूर्ण करण्याच्या अटीवर दिली गेली.

### वेज् अँड मिन्स ॲडव्हान्सेस्

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) बँकांना वेज् अँड मिन्स ॲडव्हान्सेस् (डब्ल्यूएमए) प्रदान करते जेणेकरून त्यांच्या मिळकत आणि भरणा या रोख प्रवाहातील तात्पुरती तफावत भरून निघेल. एकूण खर्च, महसूल तूट आणि राज्याची वित्तीय स्थिती यासह अनेक घटकांच्या आधारे आरबीआयने प्रत्येक राज्याची डब्ल्यूएमए मर्यादा निश्चित केली आहे. डब्ल्यूएमएवरील व्याज आरबीआयच्या रेपो दरावर आकारले जाते.

**नोव्हेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहानमध्ये कोरोना आपत्तीची सुरुवात झाली आणि ती अल्पावधीतच जगभरात वेगाने पसरली. ३० जानेवारी, २०२० रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यविषयक सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित करण्यात आली आणि ११ मार्च २०२० रोजी जागतिक महामारी असा साथीचा रोग म्हणून कोरोनाला जागतिक संसर्गजन्य आजार म्हणून घोषित करण्यात आले.**

राज्यांना ओव्हरड्राफ्ट सुविधाही घेण्यास परवानगी आहे. ही डब्ल्यूएमएच्या मर्यादेवर काढलेली रक्कम असते. परंतु ओव्हरड्राफ्टवर उच्च व्याजदर आकारला जातो.

३१ मार्च २०२० रोजी राज्यांची एकूण डब्ल्यूएमए मर्यादा ३२,२२५ कोटी रुपये होती. केंद्र आणि राज्यांच्या विनंतीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ७ एप्रिल २०२० रोजी राज्यांची डब्ल्यूएमए मर्यादा ६०% वाढविली. यामुळे राज्यांना रुपये १९,३३५ कोटींची अतिरिक्त रक्कम उपलब्ध झाली. सुरुवातीस ही वर्धित मर्यादा सप्टेंबर २०२० पर्यंत वैध होती. नंतर ती ३१ मार्च २०२१ पर्यंत वाढविण्यात आली. आरबीआयने राज्यांना ओवरड्राफ्ट घेण्याच्या सलग १४ ऐवजी २१ दिवसांच्या कामकाज कालावधीत वाढ केली आणि तीन महिन्यात ३६ ऐवजी ५० कार्यकालीन दिवसांपर्यंतचा अवधी दिला.

वाढीव डब्ल्यूएमए मर्यादेमुळे राज्यांना आरबीआयकडून कमी व्याजदराने अल्प मुदतीसाठी कर्ज घेण्याची त्वरित मुभा मिळाली. कोविड-१९ चे नियंत्रण आणि शमनाचा प्रयत्न करण्यासाठी राज्यांना अधिक दिलासा मिळाला. तसेच धोरणात्मक हस्तक्षेपामुळे राज्यांना त्यांचे बाजारातील कर्ज काढून घेता आले.

### अधिसूचित आपत्तीची घोषणा आणि राज्य आपत्ती निवारण निधीबाबतच्या अटींना स्थगिती

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५च्या कलम (४८) (१) (अ) अन्वये राज्य आपत्ती निवारण निधी (एसडीआरएफ) ची स्थापना करण्यात आली आहे. अधिसूचित आपत्तींच्या प्रतिसादासाठी राज्य सरकारांकडे हा प्राथमिक निधी उपलब्ध असतो. केंद्र सरकार या सर्वसाधारण राज्यांसाठी एसडीआरएफच्या ७५% आणि ईशान्य आणि डोंगराळ राज्यांसाठी ९०% रक्कमेचे योगदान करते

कोविड-१९चा प्रसार लक्षात घेता भारत सरकारने यास राष्ट्रीय महामारी म्हणून अधिसूचित आपत्ती म्हणून मानण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारांना अलगीकरण केंद्र उभारण्यासाठी, संबंधित उपाययोजनांवर, अत्यावश्यक उपकरणे खरेदी करण्यासाठी, आणि संक्रमणाचा धोका अधिक असणाऱ्या लोकांना तात्पुरती राहण्याची व्यवस्था, अन्न, कपडे आणि वैद्यकीय सेवा पुरवणे यासाठी आणि क्लस्टर कंटेन्ट ऑपरेशनसाठी एसडीआरएफ खर्च करण्याची परवानगी होती. सुरुवातीला, या खात्यावरील खर्च वर्षासाठी एसडीआरएफ वाटपाच्या २५% इतका मर्यादित होता जो नंतर वाढवून ५०% केला गेला.शिवाय, एसडीआरएफच्या केंद्रीय वाटाचा पहिला हप्ता सर्व राज्यांना सन २०२०-२१साठी आगाऊ जाहीर करण्यात आला होता. एसडीआरएफ अंतर्गत राज्यांना २०२०-२१ मध्ये ११,०९२ कोटी रुपये दिले गेले होते.

### राज्यांना आर्थिक सहाय्य

कोविड-१९च्या आर्थिक परिणामांमुळे राज्यांच्या ताळेबंदांवर येऊ शकणारा अतिरिक्त ताण आधीच निस्तरण्यासाठी

राज्यांनी त्यांच्या भांडवली खर्चांवर प्रतिबंध लावले. तथापि, भांडवली खर्चाचा उच्च गुणक प्रभाव असतो, जो राज्यांच्या अर्थव्यवस्थेची भविष्यातील उत्पादक क्षमता वाढवतो आणि परिणामी आर्थिक वाढीचा उच्च दर मिळतो. म्हणूनच केंद्र सरकारची प्रतिकूल आर्थिक स्थिती असूनही अर्थमंत्र्यांनी ऑक्टोबर २०२० मध्ये राज्यांना भांडवली खर्चासाठी आर्थिक सहाय्य योजनेसाठी १२,००० कोटी रुपयांची घोषणा केली. अर्थमंत्रालयाने निश्चित केलेल्या चार नागरिक-केंद्रित क्षेत्रांपैकी कमीतकमी तीन क्षेत्रांत सुधारणा करणाऱ्या राज्यांना या वाटपाचा एक भाग देण्यात आला.

या विभागाने या योजनेंतर्गत २७ राज्यांना ११,९१२ कोटी रुपये मंजूर केले. त्यातली ११,८३० कोटी रुपयांची रक्कम या राज्यांना त्वरित हस्तांतरित केली गेली. शिवाय ही राज्ये या योजनेच्या भाग-तीनच्या अंतर्गत वाढीव वाटपासाठीही पात्र ठरली.

**राज्यांना कर्ज घेण्यासाठी खास विंडो**

जीएसटीमधील स्थानिक करांची भरपाई आणि परिणामी महसूल तोटा होण्याची भीती यामुळे जीएसटी (राज्यांना नुकसान भरपाई) कायदा २०१७ लागू झाला. जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे उद्भवणारी महसुलातील कमतरता सुरुवातीच्या कालावधीसाठी लक्षात घेतली जाणार नाही यावर एकमत झाले होते. जीएसटी भरपाई निधीतून पाच वर्षे ही रक्कम काही ठराविक वस्तूंवर सेसच्या आकारणीतून भरून काढण्यात येणार होती.

आर्थिक मंदीमुळे २०२०-२१ मध्ये जीएसटी भरपाई निधीमध्ये १.१० लाख कोटी रुपयांची कमतरता वर्तविली जात होती. राज्यांच्या विनंतीनुसार, केंद्र सरकारने राज्यांच्या वतीने कमतरतेची अंदाजे रक्कम घेण्यासाठी एक विशेष विंडो स्थापित करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांना

**कोविड-१९च्या आर्थिक परिणामांमुळे राज्यांच्या ताळेबंदांवर येऊ शकणारा अतिरिक्त ताण आधीच निस्तरण्यासाठी राज्यांनी त्यांच्या भांडवली खर्चांवर प्रतिबंध लावले. तथापि, भांडवली खर्चाचा उच्च गुणक प्रभाव असतो, जो राज्यांच्या अर्थव्यवस्थेची भविष्यातील उत्पादक क्षमता वाढवतो आणि परिणामी आर्थिक वाढीचा उच्च दर मिळतो. म्हणूनच, केंद्र सरकारची प्रतिकूल आर्थिक स्थिती असूनही, अर्थमंत्र्यांनी ऑक्टोबर २०२० मध्ये राज्यांना भांडवली खर्चासाठी आर्थिक सहाय्य योजनेसाठी १२,००० कोटी रुपयांची घोषणा केली.**

नुकसान भरपाई निधीत भविष्यातील जमा झालेल्या रकमेमधून परतफेड करण्यासाठी परत दिले जाणारे कर्ज म्हणून दिले.

**राज्यांचे कर कमी करण्यात सातत्य**

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २८० नुसार स्थापन केलेला वित्त आयोग कर किंवा कर्तव्याच्या निव्वळ उत्पन्नाची टक्केवारी जी राज्यांमध्ये वितरित केली जावी त्याबाबत सुचवतो आणि ज्या प्रकारे या कर किंवा कर्तव्याचे वितरण केले जाईल त्याचीही टक्केवारी निश्चित करतो. चौदाव्या वित्त आयोगाने केंद्रीय अनुलंब करांमध्ये आतापर्यंत सर्वात मोठी अशी ३२ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस केली. जम्मू-काश्मीरच्या जम्मू-काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशात पुनर्रचनेचा विचार केल्यानंतर पंधराव्या वित्त आयोगाने ४१% कर कमी करण्याची शिफारस केली.

२०२०-२१च्या पहिल्या तिमाहीत केंद्राच्या एकूण कर महसूल संकलनात तीव्र घट झाली. तथापि, या कालावधीत, केंद्र सरकारने सन २०२०-२१च्या अर्थसंकल्पाच्या अंदाजानुसार राज्यांना करांचे वाटप करणे चालू ठेवले. याव्यतिरिक्त, आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत जेव्हा महसूल उत्साहीता दिसून आली तेव्हा केंद्राने खऱ्या अर्थाने संघराज्यवादाचे तत्व अंगिकारून ४५,००० कोटींची अतिरिक्त रक्कम राज्यांना दिली.

अशा प्रकारे, २०२०-२१ या आर्थिक वर्षात, कोरोनासारख्या साथीच्या रोगामुळे देशभरातील स्त्रोतांच्या सातत्यपूर्ण कमतरतेनंतरही, कोरोना विरूध्द लढा देण्यासाठी आणि आर्थिक पुनर्प्राप्तीस चालना देण्यासाठी केंद्राने राज्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. २०२०-२१ मध्ये वित्त मंत्रालयाने राज्यांना पुरविलेल्या अतिरिक्त स्त्रोतांचा तपशील तक्ता-१ मध्ये देण्यात आला आहे.

पंतप्रधानांच्या पुढाकारातून कोविड-१९ या जागतिक महामारीविरुद्ध भारताने केलेल्या प्रयत्नांचे जागतिक स्तरावर प्रचंड कौतुक झाले. आपल्या लोकांची काळजी घेण्याव्यतिरिक्त भारताने दीडशेहून अधिक देशांना गंभीर औषधे, लस, निदान किट, व्हेंटिलेटर आणि वैयक्तिक संरक्षक उपकरणे दिली आहेत. केंद्र आणि राज्ये यांच्या उल्लेखनीय समन्वित प्रयत्नांनी कोरोना व्हायरस विरूद्धचा लढा यशस्वीरित्या पार पडला आहे. या सामूहिक लढाईत देशाने सहकारी संघराज्य तत्वावर काम करत विकसनशील कारभाराचा नवीन मार्ग दाखविला आहे.

■■■

***लेखक डॉ. सज्जन एस यादव हे भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या खर्च विभागात संयुक्त सचिव म्हणून कार्यरत आहेत. तर सूरज के प्रधान हे तेथे सहसंचालक आहेत.***
***ईमेल: sajjan९५@gmail.com, skpradhan.icoas@nic.in***

# मुंबई आणि मनोरंजन उद्योग

– हर्षदा वेदपाठक



**चित्रपटाला, मोठ्या पडद्यावर पाहण्यासारखी दुसरी गंम्त नाही. त्यात डॉल्बी डीजीटल साउन्ड मध्ये चित्रपटाची गाणी आणि काही धमाकेदार संवाद ऐकणे यात ऐक वेगळीच गंम्मत असते आणि ती गंम्मत फक्त मल्टीप्लेक्स मध्येच अनुभवायला मिळेल. मुंबईसारखी, अद्यावत सिनेमागृह कोठेच नाहीत. चित्रपटसृष्टीला व्यावसायाचा दर्जा मिळाल्यावर, मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्हांमध्ये अद्यावत सिनेमागृह उभारली गेलीत. त्यात खास भर दिला गेला तो, आरामदायक खुर्च्या आणि साउन्ड सिस्टमला. या सगळ्यावर सिनेमागृह मालकांनी खुप खर्च केलाय.**

मुंबई, चित्रपट आणि चित्रपटसृष्टी याचं नातं तसं फार जुनं आहे. कोणी कितीही म्हटले की, मुंबई मधुन चित्रपटसृष्टी दुसरीकडे जाणार किंवा नेली जाईल तरी तसे होणार नाही. का नाही होणार त्यामागचे कारण म्हणजे, मुंबईची असलेली भौगोलीक परिस्थिती, प्रशीक्षित टेक्निशियन्स, स्टुडीयो-बॅन्काचे असलेले जाळे, कानाकोपऱ्यात पसरलेली वाहतुक व्यवस्था, प्रेक्षक आणि कलाकारांची असलेली मानसिकता, नियमाप्रमाणे वागण्याची सवय, सुस्कृंतता हे सगळं एकाच वेळेला एका ठिकाणी सापडणे कठीण. या आणि अशा मुद्यांचा उहापोह घेण्याचा एक प्रयत्न.


महाराष्ट्रातील, नाशिक येथुन चित्रपटसृष्टीचा उगम झाला खरा. मराठी सिनेमा, हिंदी आणि इतर भाषेत हळुहळु पसरत गेला. तुम्ही कोणत्याही भाषेतील भारतीय सिनेमा पाहिलात तर त्यात मुंबई नगरीचा संदर्भ तुम्हाला दिसेलच. आणि मुंबईची जादु तुम्हाला देखिल भुरळ घालेल यात शंका नाही.

लंन्च बॉक्स या रितेश बात्रा दिग्दर्शित चित्रपटामध्ये, मुंबई बाहेरुन शहारामध्ये आलेल्या नोकरदारांना आवश्य असलेला जेवणाचा टिफीन बाहेरुन मागवण्याची पध्दती यावर भाष्य केले गेले होते. त्यात जेवण चविष्ट नसणे, जेवण चविष्ट असल्याने, लोकं खुष होतात. बरोबरच, जेवण करायला शहरातील लोकांना वेळ नसणे हे सगळे शहरी बहाणे दिसुन येतील. मिस लव्हली या चित्रपटामध्ये दिग्दर्शक असीम अहलुवालिया यांनी, भारतभरामध्ये तयार होणाऱ्या बी आणि सी प्रकारचे चित्रपट ज्या कथानकांचा भर हा हॉरर अणि सॅक्सवर आधारीत असतो. तोकडे बजेट असल्यामुळे उत्तम कलाकार, गाणी, लोकेशन घेणे त्यांना जमले नसल्यामुळे, अनेक दिग्दर्शक अशा प्रकारचे चित्रपट तयार करतात. असे चित्रपट कधीच व्हाईट कॉलर लोकांना आकृष्ट करु शकत नाहीत हे हि तितकेच खरे. मुळातच हा व्हाईट कॉलर प्रेक्षक फक्त शहरात आहे, त्याचे प्रमाण दहा किंवा विस टक्के असेल. त्या तुलनेत, ऐंशी टक्के लोकं हे गावात राहतात. तेथे सिनेमा तिकीटाचे असलेले दर, हे मल्टीप्लेक्सच्या तुलनेत कधीही परवडणारे नसतात. हिच नस पकडत असीम अहलुवालीया यांनी मिस लव्हली हा चित्रपट तयार केला होता. शोर इन द सिटी या चित्रपटामध्ये राज आणि डीके यांनी मुंबई शहरामध्ये राहणाऱ्या पाच लोकांचे आयुष्य टिपले होते. निशीकांत कामत दिग्दर्शित मुंबई मेरी जान या चित्रपटामध्ये २००६ साली मुंबईमध्ये झालेल्या ट्रेन बॉम्ब ब्लास्टनंतर आणि दरम्यान पडलेली पाच लोकांची कथा पहायला मिळते. मिलन लुथरीया यांनी गॅगस्टर हाजी मस्तान आणि दाउद इब्राहिम या मुंबईतील गाजलेल्या, अन्डरवर्ल्डवर राज्य करणाऱ्या गुंडांची गोष्ट वन्स अपॉन अ टाईम इन मुंबई या चित्रपटामध्ये पहायला मिळते. मस्तान आणि दाऊद यांच्या दोस्ती-दुष्मनीचे सादरीकरण येथे मुंबईच्या पार्श्वभुमीवर रंजकरीतीने पहायला मिळते. सिटी ऑफ गोल्ड या चित्रपटामध्ये, मुंबईची शान असलेल्या सूत गिरणीतील कामगार, त्यांची मुले यांची कथा काहीशा विदारक पध्दतीने सादर केली गेली आहे. सूत गिरण्या बंद पडल्या आणि रोजंदारीवर असलेल्या कामगारांचे काय झाले त्याचे महेश मांजरेकर यांनी वास्तवातीत चित्रण केले आहे.

मुंबईमध्ये अनेक प्रेक्षणीय स्थळ आहेत, त्याचा वापर अनेक चित्रपटकर्त्यांनी चित्रपटामध्ये केला आहे. असाच एक चित्रपट म्हणजे, धोबी घाट. दुसऱ्या शहरामधून, गावांमधून मुंबईमध्ये आलेल्या लोकांच्या, मुंबईकडून असलेल्या अपेक्षा, आशा, एकटेपणा, मायेच्या ओलाव्याचा शोध हा दिग्दर्शिका किरण राव यांनी उत्तमरीत्या टिपला आहे. आपण अनेक जणं फावल्या वेळात कॅरम खेळतो. परंतु या इनडोअर गेममुळे एका गॅंगस्टरला हरवुन, आपल्या झोपडपट्टीतील वस्तीला सुखी करणाऱ्या तरुणाची कहाणी, चंदन अरोरा यांनी स्ट्राईकर या चित्रपटामध्ये टिपली होती. मुंबईमध्ये जेथे उंचच उंच इमारती आहेत तेथे झोपडपट्टीचे जाळे देखिल आहे. त्या वस्तीमधील प्रश्न या चित्रपटामध्ये पहायला मिळतात. २००५ साली मुंबईमध्ये आलेल्या महापुरामध्ये रंगणारी प्रेमकथा, कुणाल देशमुख यांनी तुम मिले या चित्रपटामध्ये दाखवली होती. मी शिवाजी राजे भोसले बोलतो या चित्रपटामध्ये, महाराष्ट्रामधुन अनेक गाव खेड्यातुन मुंबईमध्ये नशिब आजमावायाल अनेक लोकं येतात. परंतु, येथे आल्यावर हि मंडळी त्यांचे अस्तीत्व, ओळख कशी विसरुन बसतात ते दिग्दर्शक संतोष मांजरेकर यांनी समर्पकरीत्या दाखवले होते. स्लमडॉग मिल्येनर या चित्रपटामध्ये बाल गुन्हेगार असलेला एक तरुण, रियालिटी शोमध्ये भाग घेऊन आपले आयुष्य कसे बदलतो ते पहायला मिळते. याच चित्रपटामध्ये व्हीटी रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म वर सादर करण्यात आलेले सुखविन्दरच्या खड्या आवाजात, जय हो... हे गाणे कोण बरं विसरेल. निरज पांडे दिग्दर्शित वेन्सडे या चित्रपटामध्ये २००६ साली मुंबईमध्ये घडलेल्या ट्रेन ब्लास्ट घटनेचा, एक सामान्य माणुस कसा बदला घेतो ते खिळवुन ठेवणाऱ्या चित्रीकरणामध्ये पहायला मिळते. आमीर या चित्रपटामध्ये दिग्दर्शक राजकुमार गुप्ता यांनी लंडनहुन मुंबईमध्ये परतणाऱ्या तरुणाला गॅंगस्टरचा सामना कशा प्रकारे करावा लागतो ते दाखवले.

**मुंबई, चित्रपट आणि चित्रपटसृष्टी याचं नातं तसं फार जुनं आहे. कोणी कितीही म्हटले की, मुंबई मधुन चित्रपटसृष्टी दुसरीकडे जाणार किंवा नेली जाईल तरी तसे होणार नाही. का नाही होणार त्यामागचे कारण म्हणजे, मुंबईची असलेली भौगोलीक परिस्थिती, प्रशीक्षित टेक्निशियन्स, स्टुडीयो-बॅन्काचे असलेलं जाळं, कानाकोपरयात पसरलेली वाहतुक व्यवस्था, प्रेक्षक आणि कलाकारांची असलेली मानसिकता,**

कोणे ऐके काळी, मुंबई हि गॅंगस्टरची नगरी म्हणुन ओळखली जात होती. याच विषयावर अपुर्वा लाखिया यांनी १९९१ साली, मुंबईमधील लोखन्डवाला या पॉश वस्तीमध्ये गॅंगस्टर माया डोळस आणि मुंबई पोलीसांची चकमक, अंगावर काटा येईल अशा थ्रिलर पध्दतीने शुटआउट ऐट लोखन्डवाला या चित्रपटमध्ये. अनुराग बासु दिग्दर्शित लाईफ इन अ मॅट्रो या चित्रपटामध्ये, मुंबईत राहणाऱ्या नऊ लोकांचे जिवन वास्तविकरीत्या टिपले होते. रोहन सिप्पी दिग्दर्शित नऊ दो ग्यारह या चित्रपटामध्ये, मुंबईची ओळख असलेल्या कालीपीली टॅक्सी मध्ये एक बिझनेसमॅन लॉकरची चावी हरवुन बसतो आणि त्यानंतर, मुंबईभर फिरणारी टॅक्सी आपल्याला मुबई दर्शन करवते. डी या चित्रपटामध्ये दिग्दर्शक विश्राम सामंत, गॅंगस्टर दाउद ईब्राहीम याची कहाणी दाखवतात. मुंबई पोलीसात काम करणाऱ्या हवालदार कासकरचा मुलगा, जगप्रसिध्द गॅंगस्टर कसा होतो ते येथे पहायाल मिळते. यात मुंबईची काळोखी बाजु दाखवायला सामंत विसरत नाहीत. डोंबीवली फास्ट या मराठी चित्रपटाध्ये एक मध्यमवर्गीय माणुस अयोग्य आणि भ्रष्टाचारी सिस्टम विरुध्द कशाप्रकारे लढतो, ते



दिग्दर्शक निशीकांत कामत यांनी उत्तमरीत्या दाखवले आहे. पेज थ्री या चित्रपटामध्ये दिग्दर्शक मधुर भंडारकर यांनी पार्टी, लाईफस्टाईल कव्हर करणाऱ्या पत्रकाराच्या नजरेतुन मुंबईची हायक्लास लाईफ दाखवली होती. ब्लॅक फ्रायडे या चित्रपटामध्ये दिग्दर्शक अनुराग कश्यप यांनी मुंबईमध्ये १९९३ साली झालेल्या सीरीयल बॉम्ब ब्लास्टची कहाणी सादर केली होती. हा चित्रपट, क्राईम रिपोर्टर हुसैन झैदी यांनी लिहिलेल्या पुस्तकावर आधारीत होता. आणि झैदी यांनी ते पुस्तक वास्तविक घटना, लोकं यांना भेटुन लिहिल्याने, ब्लॅक फ्रायडे हा चित्रपट उत्कंठावर्धक झाला होता.

शाद अली दिग्दर्शित साथिया चित्रपटामध्ये, घरच्यांचा विरोध पत्करुन, पळून जाऊन दुसऱ्या शहरात लग्न करणारे जोडपे यांची कथा साकारली होती. प्रेमाचा रंग उडू लागताच, मुंबई सारख्या शहरामध्ये राहणे किती कठीण आहे हे त्यांना जाणवू लागते, असे ते कथानक होते. राम गोपाल वर्मा यांनी कंपनी या चित्रपटामध्ये गॅंगस्टर दाऊद इब्राहिम आणि छोटा राजन या दोन गॅंगस्टरची कहाणी सादर केली होती. कामगार जिथे जिवाचे रान करतात अशी मुंबईमधील एक जागा म्हणजे, बार! याच बारमध्ये अराजक तत्व कशी वागतात हे दाखवताना, बार मध्ये काम करणाऱ्या मुलींचे विश्व मधुर भंडारकर यांनी चांदनी बार या चित्रपटामध्ये दाखवले होते. बॉम्बे बॉईज या चित्रपटामध्ये समलिंगी संबधांवर दिग्दर्शक कैझाद गुस्ताद यांनी प्रकाशझोत टाकला होता. १९९८ साली आलेल्या, राम गोपाल वर्मा दिग्दर्शित सत्या या चित्रपटामध्ये पहिल्यांदा मुंबई दिसली ती गॅंगस्टरच्या नजरेतून. अंडरवर्ल्ड आणि गॅंगस्टर हे कसे असतात, आणि घडतात हे दाखवताना, दिग्दर्शकाने अनेक पोलीसांना भेटून वास्तवदर्शी घटना जाणून घेतल्या होत्या. रंगीला या चित्रपटामध्ये दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी मुबई चित्रपटसृष्ट्री मध्ये काम करायला येणाऱ्या आणि सुरुवातीला स्ट्रगलर म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या




लोकांची मानसिकता आणि घटना यांचे चित्रण केले होते. मुंबईमध्ये १९९२ साली उसळलेल्या हिंदु मुस्लीम दंग्याचे चित्रण मणी रत्नम यांनी बॉम्बे या चित्रपटामध्ये दाखवले होते. या चित्रपटासाठी संगीतकार ऐ. आर. रेहमान यांनी दिलेले संगीत आजही श्रवणीय ठरत आहे.

मुंबईला लाभलेला निसर्गरम्य समुद्र किनारा, उंच इमारती हे मुंबईची शान आहेत आणि या स्थळांचा अनेक चित्रपटामध्ये उत्तम वापर केलाला दिसुन येतो. तसेच, मुंबईला असलेला झोपडपट्यांचा विळखा हे देखिल अनेक चित्रपटामध्ये, कथानकांचा हिस्सा राहीला आहे. असाच एक चित्रपट म्हणजे, धारावी! सुधीर मिश्रा दिग्दर्शित या चित्रपटामध्ये, मुंबईतील नव्हे तर आशिया खंडातील सगळ्यात मोठ्या अशा झोपडपट्टीत राहणाऱ्या टॅक्सी ड्रायव्हरची कथा होती. गरीबीतून बाहेर पडायच्या प्रयत्नात हा माणूस गुंड आणि राजकारणी लोकांच्या कचाट्यात कशाप्रकारे सापडतो ते पहायला मिळते. मुकुल आनंद दिग्दर्शित अग्नीपथमध्ये मुंबईमध्ये राहणारा सामान्य माणुस एका गुंड माणसाकडुन मारला जातो आणि त्याचा मुलगा विजय दिनानाथ

**महाराष्ट्रातील, नाशिक येथुन चित्रपटसृष्ट्रीचा उगम झाला खरा. मराठी सिनेमा, हिंदी आणि इतर भाषेत हळुहळु पसरत गेला. तुम्ही कोणत्याही भाषेतील भारतीय, सिनेमा पाहिलात तर त्यात मुंबई नगरीचा संदर्भ तुम्हाला दिसेलच.**

चव्हाण, आपल्या वडीलांच्या मृत्युचा कशा प्रकारे बदला घेतो ते दाखवले गेले होते. विशेष म्हणजे मुकुल आनंद दिग्दर्शित या चित्रपटातील भुमिकेसाठी अमिताभ बच्चन यांना राष्ट्रीय पारितोषिक देखिल मिळाले होते. सलीम लंगडे पर मत रो या चित्रपटामध्ये, हिंदुत्वाचा विरोध म्हणून मुंबईमध्ये राहणारा मुस्लीम कुटुंबियातील एक मुलगा कश्याप्रकारे गुंड होतो त्याचे चित्रण होते. परिंदा या चित्रपटामध्ये मुंबईच्या रस्त्यावर वाढलेले दोन भाऊ आणि अण्णा नावाचा गॅंगस्टर यांची कहाणी होती. घरातले कोणी गुंड झाल्यास, त्या कुटुंबियांचे काय होते ते येथे पहायला मिळते. सलाम बॉम्बे या चित्रपटामध्ये, मुंबईच्या रस्त्यावर राहणाऱ्या लहान मुलांची कथा होती. दिग्दर्शिका मिरा नायर यांच्या या चित्रपटाला जगभर नावाजले गेले होते. फिरोज खान दिग्दर्शिक दयावान या चित्रपटामध्ये गॅंगस्टर वरदराजन मुदलियार यांचा कहाणी पहायला मिळते. दक्षिणेतुन मुंबईमध्ये आल्यावर त्याने, दाक्षिणात्य लोकांसाठी मसिहा म्हणुन काम केल्याचे येथे पहायला मिळते. विनोद खन्ना आणि फिरोज खान या दोन हॅन्डसम हिरोंना पडदयावर एकत्र पाहणे हि सुध्दा एक पर्वणी होती असे अनेकांचे मत होते. नोकरी नसलेले किंवा नोकरी करायची इच्छा नसलेले अनेक तरुण हे वाममार्गाला जातात हे आपण पाहिले आहे. मात्र मुंबईमध्ये, सभ्य जिवन जगायचे असेल, लग्न करायचे असेल तर नोकरी महत्वाची आहे असे शहरी कथानक होते, एन. चंद्रा दिग्दर्शित अंकुश या चित्रपटाचे! मशाल या चित्रपटामध्ये मुंबईमध्ये वृत्तपत्र चालवणाऱ्या माणसाच्या नजरेतुन पांढरपेशा व्यक्तीमत्वाचे ढोंग घेणाऱ्यांचा पडदा फाश करताना दिग्दर्शक यश चोपडा दिसतात. कथा या चित्रपटामध्ये, दिग्दर्शिका सई परांजपे या मुंबईतील चाळ सिस्टममध्ये राहणाऱ्या तरुण तरुणीची कहाणी सादर करतात. बाजुबाजुला लागुन असलेली घरे, त्यासमोर असलेली सामाईक गॅलरी, आणि एकमेकांना पसंद

करणारे दोन जिव. बरं जुळणारे प्रेमाचे धागे कोणाला कळु नयेत यासाठीची धडपड कथा या चित्रपटामध्ये दाखवली होती. कुंदन शहा दिग्दर्शित जाने भी दो यारों या चित्रपटामध्ये मुंबईमध्ये फोटोग्राफर म्हणुन काम करणारे दोन तरुण, स्टोरीच्या शोधात मर्डर मिस्ट्री कशी शोधतात ते विनोदी ढंगाने जाणाऱ्या या चित्रपटामध्ये पहायला मिळते. चक्र या चित्रपटामध्ये रबिन्द्रा धम्माराज यांनी कचरा वेचणाऱ्या, झोपडीत राहणाऱ्या अम्माची कथा सादर केली होती.

मुंबई मध्ये घडणारे कथानक आणि मुंबई या शहराला हिरो करुन घडणारे कथानक ही, हिंदी आणि मराठी चित्रपटांची खासीयत राहीली आहे. अमर अकबर अँन्थनी हा मनमोहन देसाई यांचा चित्रपट आठवतो. तुम्हाला, त्यात दाखवलेले मुंबईचे प्रसिध्द बांद्रा चर्च कोण बरं विसरेल. दिवार या चित्रपटामध्ये, मुंबईमधील गोदीचे चित्रण होते. त्या पार्श्वभुमीवर अॅग्री यंग मॅन अमिताभ बच्चन यांचे ढिश्शुम ढिश्शुम कोण बरे विसरेल. डॉन या चित्रपटामधिल यह बंम्बई नगरीया है देख बबुआ... या गाण्यामध्ये मुंबईतील अनेक प्रसिध्द प्रेक्षणीय स्थळांचे वर्णन कोण बरं विसरेल. यह मुंबई मेरी जान... या गाण्यात मोहमद रफी यांनी सगळ्यांना मुंबईपासुन बचके रेहनाची घातलेली साद आणि त्या दरम्यान जॉनी वॉकर यांनी साकारलेल्या भुमिकेचे पात्र आपल्याला जुन्या जमान्यातील मुंबई दाखवत फिरते. सी.आय.डी. या १९५६ साली प्रदर्शित झालेल्या कृष्णधवल चित्रपटामध्ये दाखवलेली मुंबई विलोभनीय आहे यावर दुमत होणार नाही. मुंबई ही विलक्षण आहे. अद्भुत आहे. ती सगळ्यांना आकृष्ट करतेच. पण तेच जर तुम्ही मुंबईचे रहिवासी आहात, आणि तुम्ही जेथे कोठे जाल तेथे तुमच्याबद्दल मुंबईकर म्हणुन असलेली उत्सुकता, होणारी आवभगत अनेकांच्या लक्षात असेल. या अश्या घटनेचे यथोचित चित्रण तुम्हाला, नया दौर या चित्रपटामध्ये जॉनी वॉकर, मैं बंम्बई का बाबु. या गाण्यातुन दाखवुन देतात.

काही महिन्यांपूर्वी, मुंबई येथील चित्रपटसृष्ट्री नविनच यु.पी. येथे वसलेल्या फिल्मसिटीमध्ये नेली जाणार अशी चर्चा होती. त्यावर हिंदी चित्रपटसृष्ट्रीमधे संमीश्र प्रतिक्रीया उमटली होती. त्यात अनेकांनी मुंबईमधुन चित्रपटसृष्टी लांब जावू शकत नाही असे मत व्यक्त केले. मुंबई हि हिंदी चित्रपटसृष्ट्रीची धडकन आहे. त्यामुळे त्यांची ताटातुट होणार नाही हा मतप्रवाह देखिल प्रामुख्याने दिसून आला.

चित्रपटाला, मोठ्या पडद्यावर पाहण्यासारखी दुसरी गंम्त नाही. त्यात डॉल्बी डीजीटल साउन्ड मध्ये चित्रपटाची गाणी आणि काही धमाकेदार संवाद ऐकणे यात ऐक वेगळीच गंम्मत असते आणि ती गंम्मत फक्त मल्टीप्लेक्स मध्येच अनुभवायला मिळेल. मुंबईसारखी, अद्यावत सिनेमागृह कोठेच नाहीत. चित्रपटसृष्ट्रीला व्यावसायाचा दर्जा मिळाल्यावर, मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्हांमध्ये अद्यावत सिनेमागृह उभारली गेलीत. त्यात खास भर दिला गेला तो, आरामदायक खुर्च्या आणि साउन्ड सिस्टमला. या सगळ्यावर सिनेमागृह मालकांनी खुप खर्च केलाय. तसा खर्च किती राज्य करतील हा एक मोठा प्रश्न आहे. सिनेमागृहा बरोबर, मुंबईमध्ये अनेक स्टुडीयो, व्हॅनीटी व्हॅन आहेत. ज्या चित्रपटाचे चित्रीकरण करणाऱ्या मंडळींना आराम देऊ



शकतात. तसेच चित्रीकरण सुकर करु शकतात. काही ठिकाणी फिल्म स्कुल आहेत जे चित्रपट तयार करणाऱ्यांची नविन पिढी घडवत आहेत. तर त्यांना सतत मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईमध्ये राहणारे अनेक कलाकार, तंत्रज्ञ आहेत. या आणि अशा सुवीधा किती ठिकाणी उपलब्ध असतील असाही एक मोठा प्रश्न आहे. याखेरीज, सुरळीत विजपुरवठा, मुबलक पाणी यासह शुटींगला गेल्यावर कलाकारांची, सामानाची सुरक्षितता हा देखिल एक गहन प्रश्न असतो. ज्या राज्यांमध्ये या सगळ्याचा तुटवडा आहे, तेथे प्रती मुंबई कशी तयार होणार हा यक्ष प्रश्न आहे.

चित्रपटसृष्टी हि कलाकार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक, निर्माता यांसह गीतकार, संगीतकार, संकलक या आणि यांसह आणखीन काही घटक मिळुन तयार होते. या सगळ्यांमुळे चित्रपट तयार होतो आणि चित्रपटसृष्टी स्थापीत होते. मग हि सगळी मंडळी जेथे अनेक दशकं काम करत आहेत. निवास करत आहेत, त्यांना दुसरीकडे कसे नेणार हा मोठा प्रश्न आहे. इतकंच नव्हे तर, प्रशिक्षित तंत्रज्ञ हे फक्त मुंबईमध्येच आहेत त्यावर कोणीही वाद घालू शकणार नाही. इतकेच नव्हे तर सबसीडी, टॅक्स बेनीफिट, स्वतात मिळणारा मजूर हे कोणी देत जरी असेल तरी, बॉलीवुडसाठी फिल्म मेकींग हा एक बिझनेस आहे. जो जोपासणे आणि वाढवणे हे देखिल महत्वाचे आहे आणि त्यासाठीची पुरक परिस्थीती सगळीकडे असेलच असे नव्हे. त्यामुळे मुंबई आणि चित्रपटसृष्टी यांची नाळ हि कधीच तुटणार नाही. म्हणुनच मुंबई मेरी जान है... असं म्हणत...मनात साचवत, चित्रपटसृष्टी मुंबईमध्येच बहरेल आणि अनेक वर्ष समृध्द होत राहील यावर दुमत होणार नाही.

■■■

*लेखिका ज्येष्ठ पत्रकार असून मनोरंजन उद्योगाच्या अभ्यासक आहेत.*

*ईमेल: **harrshadaa7@gmail.com***




**आगामी अंक**

**जून २०२१**

# आरोग्य आणि पर्यावरण

# महाराष्ट्र : साठ वर्षांचा प्रवास

– योजना चमू



**भारताला इ.स.१९४७ साली स्वातंत्र्य लाभले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषेप्रमाणे प्रांत निर्मिले जात होते. परंतु भारत सरकारने मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्मितीस नकार दिला. केंद्राच्या या पवित्र्यावरुन मराठी-जनात क्षोभ उसळला. अखेर १०५ जणांच्या बलिदानानंतर, १ मे १९६०रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर महाराष्ट्राने मोठी प्रगती केली. महाराष्ट्र राज्य ३६ जिल्ह्यांत विभागले गेले आहे. या जिल्ह्यांचे ६ समूह अथवा महसुली विभाग आहेत - पुणे, नाशिक, औरंगाबाद, कोकण, नागपूर व अमरावती. हे महाराष्ट्र शासनाचे अधिकृत राजस्व विभाग आहेत. २०१४ सालीठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर या नवीन जिल्ह्याची निर्मीती करण्यात आली, त्यामुळे एकूण जिल्ह्यांची संख्या वाढून ३६ एवढी झालेली आहे.**

महाराष्ट्र हे आधुनिक राज्य आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेला अरबी समुद्र, वायव्य दिशेला गुजरात आणि दादरा नगर हवेली केंद्रशासीत प्रदेश आहे. उत्तर आणि ईशान्य दिशेला मध्य प्रदेश, पूर्वेला छत्तीसगड, दक्षिण आणि आग्नेय दिशेला कर्नाटक आणि तेलंगणा तर नैऋत्येला गोवा हे राज्य आहे.

महाराष्ट्राचा इतिहास प्राचीन आहे. अश्मयुगापासून महाराष्ट्रात मानवी वस्ती असल्याचे पुरावे आहेत. नदीच्या काठावर आणि खोऱ्यात अनेक अश्मकालिन अवजारे सापडली आहेत. ताम्रपाषाण युगाचे पुरावे अनेक गावात सापडले आहेत. उदा. इनामगाव (इ.स.पू.१३०० ते ७००) येथे उत्खननात ताम्रपाषाण युगाचे अनेक पुरावे सापडले आहेत.

**महाराष्टाच्या इतिहासावर दृष्टिक्षेप :**

During the historical period (after the 6th century BCE) the rule of the Mauryas (4th century BCE to 2nd century BCE) is seen in Maharashtra

सहाव्या शतकात महाराष्ट्रात मौर्य साम्राज्याचे (इ.स.पू. ३२१-१८४) राज्य होते. या काळात महाराष्ट्राने भरभराटीचा व्यापार आणि बौद्धधर्माचा विकास पाहिला. पण मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासाबरोबर महाराष्ट्रावरील मौर्य सत्ता संपुष्टात येऊन या प्रदेशावर निरनिराळ्या घराण्यांची सत्ता प्रस्थापित झाली. सातवाहन हे महाराष्ट्राचे पहिले ज्ञात राजघराणे होय. त्यांचा काळ इ.स.पू. साधारणत: २२० ते इ.स. २२५ पर्यंतचा मानला जातो. अर्थात या कालखंडाबाबत मतभेद आहेत. प्रतिष्ठान अथवा पैठण ही त्यांची राजधानी आणि सिम्मुक सातवाहन हा या घराण्याचा मूळ पुरुष. महाराष्ट्राच्या राजकीय. सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने सातवाहनांचा कालखंड हा अतिशय महत्त्वाचा गणला जातो. सातव्या शतकातील हाल राजाने महाराष्ट्री प्राकृत भाषेत संकलित केलेले गाथासप्तशती काव्य ही सातवाहनांची साहित्याला मोठी देणगी. हिंदूंचा शालिवाहन शक सातवाहनांनीच सुरू केला. सातवाहन राज्याचा अंमल महारष्ट्रासोबतच मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेशापर्यंत होता. सातवाहन साम्राज्याच्या विघटनानंतरचा महाराष्ट्राचा इतिहास फारसा सुस्पष्ट नाही. सातवाहनांनंतर *आमीर*, यवन, तुषार, शक, मुरुंड, मौन आणि किलकिल या घराण्यांनी राज्य केले परंतु या घराण्यांबद्दलचा इतर कोणताही पुरावा अद्याप उपलब्ध झालेला नाही.

आमीर आणि त्यांचे मांडलिक, त्याचप्रमाणे त्रैकूटक राजांनी सध्याच्या महाराष्ट्राच्या काही भागावर राज्य केले, असा पुरावा पुराभिलेख आणि नाणी यांच्या स्वरुपात मिळतो.

**वाकाटक**: वाकाटकांच्या कालखंडाबद्दल विद्वानांत मतैक्य नाही. त्यांचा कालखंड सर्वसाधरणपणे इ. स. तिसरे शतक ते पाचवे शतक असा मानण्यात येतो. या घराण्याचे गुप्त सम्राटांशी वैवाहिक संबंध होते आणि त्यांचे राज्य मुख्यत: विदर्भात पसरले होते. यांच्या कारकीर्दीत कला आणि वाङ्मय यांची भरभराट झाली. या घराण्यातील राजा दुसरा प्रवरसेन याचे आतापर्यंत जास्तीत जास्त ताम्रपट उपलब्ध झालेले आहेत. याशिवाय विदर्भातील मांढळ, नागरा इ. ठिकाणच्या उत्खननांमध्ये वाकाटककालीन शिल्पांचे आणि विटांनी बांधलेल्या मंदिरांचे अवशेष उपलब्ध झाले आहेत. अजिंठा येथील काही चैत्य आणि विहार याच सुमारास खोदण्यात आले आणि त्यांमध्ये चित्रकाम करण्यात आले.

अजिंठ्याच्या १६ क्रमांकाच्या लेण्यातील उत्कीर्ण लेखावरून विंध्यशक्ती राजा आणि या घराण्याची काही माहिती ज्ञात झाली.



वाकाटकांच्या पाडावानंतरचा महाराष्ट्राचा इतिहास सुस्पष्ट नाही परंतु सहाव्या ते आठव्या शतकांत राज्य करणाऱ्या बादामी चालुक्यांचा महाराष्ट्रावर प्रभाव पडला. बादामी चालुक्य हे प्रामुख्याने विद्यमान कर्नाटक राज्यातील उत्तरेकडील प्रदेशांशी (विजापूर जिल्हा) जास्त निगडित असले, तरी या घराण्यातील सर्वांत प्रख्यात राजा दुसरा पुलकेशी (सु. ६१०-११ ते ६४२) याच्या एका लेखात पहिल्या प्रथम तीन महाराष्ट्रकांचा उल्लेख आलेला आहे.

इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकांत दक्षिण महाराष्ट्रात राष्ट्रकूटांनी आपला जम बसविलेला होता आणि यांनीच शेवटी बादामीच्या चालुक्यांची सत्ता नष्ट केली. चालुक्यांच्या उतरत्या काळात महाराष्ट्रात लहानमोठी राज्ये उदयास आली. सातव्या शतकाच्या उत्तरार्धात उत्तर महाराष्ट्रात कलचुरींनी आपला जम बसविला. त्यांची चांदीची नाणी आणि ताम्रपट नाशिक भागात सापडलेले आहेत. कोकण प्रदेशात मौर्य नावाचे एक राजघराणे सत्तेवर आले होते.

**राष्ट्रकूट**: राष्ट्रकूटांच्या अंमलाखाली महाराष्ट्रात पुन्हा बऱ्याच मोठ्या प्रदेशावर एकजिनसी राज्य सुरू झाले. या घराण्याचे मूळ स्पष्ट नसले, तरी चालुक्यांच्या लेखात राष्ट्रकूट या अधिकाऱ्यांचा उल्लेख येतो. इसवी सनाच्या आठव्या ते दहाव्या शतकांपर्यंत राष्ट्रकूटांनी महाराष्ट्रावर आधिपत्य गाजविले. यांच्या मान्यखेट व विदर्भ या इतर शाखा असल्या, तरी

**१३व्या शतकात महाराष्ट्र प्रथमच इस्लामी सत्तेखाली आला. दिल्लीचे अल्लाउद्दीन खिलजी व नंतर मोहंमद बिन तुघलक यांनी दखखनचे काही भाग काबीज केले.मोहंमद बिन तुघलक याने आपली राजधानी दिल्लीहून हलवून दौलताबाद येथे केली.बहमनी सुल्तानांनी सुमारे १५० वर्षे राज्य केले. १६व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मुगल साम्राज्यांशी संलग्न असलेल्या अनेक इस्लामी राजवटींनी मध्य महाराष्ट्र व्यापलेला होता तर किनारपट्टीवर मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाराच्या हेतूने आलेल्या पोर्तुगीज यांचा अंमल होता.**

महाराष्ट्राच्या मध्य भागावर यांनी प्रामुख्याने राज्य केले. या घराण्यात काही प्रख्यात राजे होऊन गेले. वेरुळच्या दशावतार लेण्यातील लेखात दंतिदुर्गाची स्तुती आढळते. त्याने गुजरात, मध्य प्रदेश, विदर्भ आणि महाराष्ट्र यांवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. या घराण्यातील पहिला कृष्ण याने संपूर्ण महाराष्ट्र व दक्षिण कोकण आपल्या अंमलाखाली आणला. याच राजाच्या आज्ञेनुसार वेरुळचे जगद्विख्यात कैलास लेणे निर्माण केले गेले. इ. स. ९७२ मध्ये परमार राजा सियक याने राष्ट्रकूटांचा दारुण पराभव करून कर्नाटकातील मान्यखेट (मालखेड) ही त्यांची राजधानी बेचिराख करून टाकली आणि त्यानंतर राष्ट्रकूट राजघराण्याला कायमची उतरती कळा लागली. वाङ्मय, ललित कला, वास्तुशिल्प यांना राष्ट्रकूटांनी उत्तेजन दिले.


**यादव**: शिलाहारांच्या काहीसे समकालीन पण नंतर सत्ताधीश झालेले यादव हे महाराष्ट्राचे खऱ्याअर्थाने राजे होते. सुरूवातीला राष्ट्रकूटांचे आणि नंतर चालुक्याचे मांडलिक असलेले यादव हे कालांतराने संपूर्ण महाराष्ट्राचे स्वामी झाले. यांची राजधानी प्रारंभी नासिक जिल्ह्यातील सिन्नर (सेऊणपूर) येथे असावी. पुढे ती औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी येथे होती.

कृष्ण (कार. १२४६-१२६१), महादेव (कार. १२६१-१२७०) आणि रामचंद्र (कार. १२७१-१३११) यांच्या कारकीर्दीत यादव साम्राज्यात उत्तर कोकण आणि मध्य प्रदेशातील छत्तीसगड हे प्रदेश अंतर्भूत करण्यात आले. याच काळात यादवांनी शिलाहारांचा सागरी युद्धात पराभव करून माळव्याचे परमार, गुजरातचे वाघेल आणि आंध्रचे काकतीय यांच्याबरोबर यशस्वी युद्धे केली.

महादेवाचा, हेमाद्री अथवा हेमाडपंत हा होता. हेमाद्री हा रामचंद्र यादवाच्या काळामध्येही पंतप्रधान म्हणून होता. याच्या काळात अनेक मंदिरे बांधण्यात आली. ती हेमांडपती मंदिरशैली म्हणून पुढे विख्यात झाली.

यादवांचे सुमारे चारशेहून अधिक शिलालेख आतापर्यंत उपलब्ध झालेले असून त्यांतून तत्कालीन समाजजीवन आणि राज्यकारभारविषयक माहिती मिळते. चक्रधरांचा महानुभाव पंथ व ज्ञानेश्वर-नामदेवांचा भक्ती वा वारकरी संप्रदाय यादवांच्या काळातच उदयास आले.मराठी भाषेला आणि वाङ्मयाला उत्तेजन मिळून ज्ञानेश्वरी आणि महानुभावांचे आद्य ग्रंथ या काळात लिहिले गेले. मराठी भाषिक महाराष्ट्राचे व्यक्तिमत्व यादव काळातच घडविले गेले.

१३व्या शतकात महाराष्ट्र प्रथमच इस्लामी सत्तेखाली आला. दिल्लीचे अल्लाउद्दीन खिलजी व नंतर मोहंमद बिन तुघलक यांनी दखखनचे काही भाग काबीज केले.मोहंमद बिन तुघलक याने आपली राजधानी दिल्लीहून हलवून दौलताबाद येथे केली.बहमनी सुल्तानांनी सुमारे १५० वर्षे राज्य केले. १६व्या शतकाच्या



सुरुवातीपर्यंत मुगल साम्राज्यांशी संलग्न असलेल्या अनेक इस्लामी राजवटींनी मध्य महाराष्ट्र व्यापलेला होता तर किनारपट्टीवर मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाराच्या हेतूने आलेल्या पोर्तुगीज यांचा अंमल होता.

बहमनी राज्याच्या विघटनानंतर महाराष्ट्राच्या विविध भागात विजापूरची आदिलशाही आणि अहमदनगरची निजामशाही यांचे राज्य होते.

१९ फेब्रुवारी १६३०ला महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळीच कलाटणी मिळाली. कारण त्या दिवशी जुन्नर येथील शिवनेरी गडावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला . महाराष्ट्रावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मा वेळी मुगलांचे व आदिलशाहीचे राज्य होते .पण छत्रपती शिवाजी महाराजांनी काही मुठभर मावळे घेऊन नवीन इतिहासाला सुरुवात किली. १६४७ मध्ये सतरा वर्षांच्या शिवाजीराजे भोसल्यांनी आदिलशहाच्या ताब्यातील तोरणागड जिंकला आणि १७व्या शतकाच्या मध्यास पश्चिम महाराष्ट्रात मराठा साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. शिवाजीराजांमुळे प्रथमच विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही आणि बलाढ्य मोगल साम्राज्याविरोधात स्वतंत्र मराठा राज्य (हिंदवी स्वराज्य) उदयास आले. यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात शिवाजी महाराजांच्या स्थानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**स्त्री हक्क चळवळीचा उदय महाराष्ट्रातून झाला.बालविवाह, सती आणि इतर जाचक प्रथांविरोधात विचारवंतांनी लढा दिला. तसेच स्त्री शिक्षण आणि विधवा विवाहाची प्रथाही महाराष्ट्रातून सुरू झाली. रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले आणि पंडित रमाबाई सारखे थोर विचारवंत महाराष्ट्रातीलच आहेत. पुणे हे भारतात शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. पुणे आणि मुंबईमध्ये अनेक स्त्रीवादी कार्यकर्त्या स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करतात. भारतातील पहिले वर्तमान पत्र दर्पण महाराष्ट्रातून सुरू झाले.**

१८ व्या आणि १९ व्या शतकांपर्यंत मराठा साम्राज्याचा विस्तार झाला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी भारतात बस्तान बसवताना मराठे व ब्रिटिश यांच्यात इ.स.१७७७-१८१८ च्या





दरम्यान तीन युद्धे झाली. इ.स.१८१८मध्ये ब्रिटिशांनी मराठ्यांचे राज्य काबीज केले.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी सहभाग घेतला.

भारताला इ.स.१९४७ साली स्वातंत्र्य लाभले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषेप्रमाणे प्रांत निर्मिले जात होते. परंतु भारत सरकारने मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्मितीस नकार दिला. केंद्राच्या या पवित्र्यावरुन मराठी-जनात क्षोभ उसळला. अखेर १०५ जणांच्या बलिदानानंतर, १ मे १९६०रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर महाराष्ट्राने मोठी प्रगती केली.

महाराष्ट्र राज्य ३६ जिल्ह्यांत विभागले गेले आहे. या जिल्ह्यांचे ६ समूह अथवा महसुली विभाग आहेत - पुणे, नाशिक, औरंगाबाद, कोकण, नागपूर व अमरावती. हे महाराष्ट्र शासनाचे अधिकृत राजस्व विभाग आहेत. २०१४ सालीठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर या नवीन जिल्ह्याची निर्मीती करण्यात आली, त्यामुळे एकूण जिल्ह्यांची संख्या वाढून ३६ एवढी झालेली आहे.

महाराष्ट्रातील एकूण क्षेत्रफळापैकी फक्त १२.३३% क्षेत्रात खनिज संपत्ती आढळते. राज्यातील बरीचशी खनिजसंपत्ती बेसाल्ट खडकाच्या बाह्य क्षेत्रात आढळते.

मॅगनीजचे प्रमुख साठे भंडारा, नागपूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यात आढळतात. लोहखनिजाचे साठे चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्ह्यात सापडतात. दगडी कोळशाचे साठेही पूर्व विदर्भात सापडतात.

महाराष्ट्रातील काही मंदिरे अनेक शतके जुनी आहेत. मंदिरांच्या शिल्पशैलीत उत्तर व दक्षिण भारताचा मिलाप आढळतो. मंदिरांवर हिंदू, बौद्ध व जैन संस्कृतींचा ठसा आहे. औरंगाबादजवळील अजिंठा व वेरुळची लेणी जगप्रसिद्ध आहेत. मोगल शिल्पशैलीची झलक औरंगाबाद येथील बीबी का मकबरा येथे पहायला मिळते. महाराष्ट्रात अनेक दुर्ग व किल्ले आहेत.रायगड,प्रतापगड व सिंधुदुर्ग ही काही उदाहरणे. महाराष्ट्राचे लोकसंगीत समृद्ध आहे. गोंधळ, लावणी, भारुड अभंग आणि पोवाडा हे प्रकार विशेष लोकप्रिय आहेत.

स्त्री हक्क चळवळीचा उदय महाराष्ट्रातून झाला.बालविवाह, सती आणि इतर जाचक प्रथांविरोधात विचारवंतांनी लढा दिला. तसेच स्त्री शिक्षण आणि विधवा विवाहाची प्रथाही महाराष्ट्रातून सुरू झाली. रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले आणि पंडिता रमाबाई सारखे थोर विचारवंत महाराष्ट्रातीलच आहेत. पुणे हे भारतात शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. पुणे आणि मुंबईमध्ये अनेक स्त्रीवादी कार्यकर्त्या स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करतात. भारतातील पहिले वर्तमान पत्र दर्पण महाराष्ट्रातून सुरू झाले.

मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी असून भारतातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. मुंबई ही भारताची आर्थिक व मनोरंजनाची राजधानी आहे. मुंबईत अनेक कंपन्यांची मुख्य कार्यालये आहेत. मुंबईत व्यवसाय व नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असल्याने भारताच्या विविध भागांतून लोक रोजगारासाठी येथे मोठ्या संख्येने येतात.

■■■

# महाराष्ट्र पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल...

**– अजित पवार**



**महाराष्ट्र आज कोरोनाविरुद्धची लढाई आपल्या संपूर्ण ताकदीनिशी लढत आहे. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी संसर्गाची साखळी तोडणे हे आज आपले मुख्य ध्येय आहे. त्यासाठी स्वत:ला व आपल्या कुटुंबाला कोरोनामुक्त ठेवण्यासाठी प्रत्येकाने काळजी घेणे अपेक्षित आहे. प्रत्येकाने नाका-तोंडावर मास्क लावणे. परस्परांमध्ये सुरक्षित अंतर राखणे, हात वारंवार स्वच्छ धुणे, अठरा वर्षांवरील सर्वांनी कोरोनाप्रतिबंधक लस घेणे या सूचनांचे पालन निष्ठापूर्वक करण्याचा निर्धार करुया. कोरोनाला हरवूया, महाराष्ट्राला कोरोनामुक्त करुया. महाराष्ट्र पडेल तो संघर्ष करेल, पण कोरोनाला हरवेल. महाराष्ट्र देशातील पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल, असा आपला विश्वास आणि प्रयत्न आहे.**

महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत राज्य आहे. महाराष्ट्राची स्वत:ची राजकीय आणि सामाजिक संस्कृती आहे. शैक्षणिक, सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशात आदर्श आहे. औद्योगिक, आर्थिक विकासातही महाराष्ट्राचं अव्वल स्थान कायम राहीलं आहे. परकीय गुंतवणुकदारांसाठीही महाराष्ट्र आकर्षणाचं केंद्र राहीला आहे. महाराष्ट्रानं आपल्या हिरकमहोत्सवी वाटचालीत यशाची अनेक शिखरे सर केली आहेत. राज्याला मिळालेल्या प्रत्येक यशाचे श्रेय इथल्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक नेतृत्वाच्या प्रगल्भतेला, नागरिकांमधल्या बंधुत्वाच्या भावनेला, उदारमतवादी विचारधारेला आहे. महाराष्ट्र राज्याने नुकतंच आपल्या स्थापनेच्या हिरकमहोत्सवी वर्षाची सांगता करुन एकसष्टावा वर्धापन दिन साजरा केला. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या एकसष्टव्या वर्धापनदिनाच्या अर्थात महाराष्ट्र दिनाच्या निमित्तानं मी सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी प्राणांचे बलिदान करणाऱ्या शहिद वीरांना श्रद्धांजली अर्पण करतो. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील त्या वीरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

महाराष्ट्राचा इतिहास कायमच संघर्षाचा राहिला आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापनाही संघर्षातून आणि एकशे सहा हुतात्म्यांच्या बलिदानातून झाली आहे. महाराष्ट्राला सहजासहजी काहीही मिळाले नाही. महाराष्ट्राने जे मिळवले ते लढून, संघर्ष करुन मिळवलं. राज्याच्या हीरकमहोत्सवी वर्षानंतरही अनेक आघाड्यांवर महाराष्ट्राचा संघर्ष सुरुच आहे. बेळगाव, कारवार, बिदर, भालकी, निपाणीसह सीमाभागातील मराठी गावे महाराष्ट्रात येण्यासाठीचा संघर्ष आजही सुरु आहे. सीमाभागातील शेवटचे मराठी गावे महाराष्ट्रात येईपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही, याची ग्वाही मी पुन्हा एकदा सीमाभागातील मराठी बांधवांना देतो. सीमाभागात, जगाच्या कानाकोपऱ्यात राहत असलेल्या तमाम मराठी बांधवांच्या इच्छा, आशा, आकांक्षा, अपेक्षांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र कायम बांधील आहे, असा विश्वास मी यानिमित्तानं देतो.

महाराष्ट्र राज्याच्या हीरकमहोत्सवी वर्षाची सांगता होत असताना, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी लढलेल्या महाराष्ट्र सैनिकांच्या, त्यांच्या कुटुंबियांच्या त्यागाचं मी स्मरण करतो. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील हुतात्म्यांना अभिवादन करतो. महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या महाराष्ट्राच्या सुपुत्रांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. महाराष्ट्रातील, देशातील, जगभरातील महाराष्ट्रप्रेमी नागरिक बंधु, भगिनी, मातांना महाराष्ट्र दिनानिमित्त, राज्याच्या हिरकमहोत्सवी वाटचालीबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

महाराष्ट्राचा इतिहास धैर्याचा, शौर्याचा, पराक्रमाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक आव्हानांवर मात करुन महाराष्ट्रात रयतेचे राज्य, स्वराज्य निर्माण केले. राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी महाराष्ट्राच्या मातीतून एकता, समता, बंधुतेचा विचार जगाला दिला. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी अत्यंत दूरदृष्टीने आधुनिक महाराष्ट्राचा पाया रचला. पायाभूत सुविधांची उभारणी केली. विकासकामांना दिशा, गती दिली. सामाजिक सुधारणांचा गाडा पुढे नेण्याचे काम केले. आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांनंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर आलेल्या



प्रत्येक नेतृत्वानं राज्याच्या जडणघडणीत अमूल्य योगदान दिलं. राज्याच्या गावखेड्यात, कानाकोपऱ्यात राहणाऱ्या, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक, सहकार अशा अनेक क्षेत्रात निष्ठापूर्वक काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून महाराष्ट्र घडला आहे. राज्याच्या हीरकमहोत्सवी सांगता वर्षाच्या निमित्तानं महाराष्ट्राच्या सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत गावखेड्यातल्या तमाम कार्यकर्त्या बंधु-भगिनींचं मी अभिनंदन करतो. आभार मानतो. धन्यवाद देतो. राष्ट्रनिर्मितीतील त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**कोरोनाप्रतिबंधक आघाडीवर महाराष्ट्राची कामगिरी**

महाराष्ट्र आज कोरोना संकटाशी एकजुटीनं, निर्धारानं लढत आहे. गेल्यावर्षी मार्च महिन्यात कोरोनाची पहिली लाट आली. सव्वा वर्षानंतर महाराष्ट्र दुसऱ्या लाटेचा सामना करत आहे. कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेतही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता राज्यातील साडेअकरा कोटी जनतेचे प्राण वाचवण्याला राहिली आहे. कोरोना संसर्गसाखळी तोडण्यासाठी सरकारला लॉकडाऊन किंवा मर्यादित

**महाराष्ट्र आज कोरोना संकटाशी एकजुटीनं, निर्धारानं लढत आहे. गेल्यावर्षी मार्च महिन्यात कोरोनाची पहिली लाट आली. सव्वा वर्षानंतर महाराष्ट्र दुसऱ्या लाटेचा सामना करत आहे. कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेतही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता राज्यातील साडेअकरा कोटी जनतेचे प्राण वाचवण्याला राहिली आहे.**

निर्बंधांसारखे निर्णय नाईलाजाने घ्यावे लागले. त्याची झळ औद्योगिक, व्यापारी क्षेत्राला बसली. त्यातून राज्याचं वित्तीय नुकसान झालं. हे वित्तीय नुकसान भविष्यात भरुन काढता येईल, परंतु नागरिकांचे गेलेले जीव परत येऊ शकत नाहीत. याची जाणीव ठेवून राज्यातील प्रत्येक नागरिकाचा जीव वाचावा, सर्वजण सुरक्षित रहावेत, कोरोनामुळे कुणाचाही मृत्यू होऊ नये, हे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवून राज्य सरकार गेले सव्वा वर्ष काम करत आहे. तो लढा आज ही सुरु आहे.

महाराष्ट्र माझं कुटुंब आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा जीव आमच्यासाठी महत्वाचा आहे. हीच भावना मनात ठेवून सन्माननीय मुख्यमंत्र्यांपासून गावोगावच्या ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत प्रत्येक लोकप्रतिनिधी कोरोनाविरुद्धच्या लढ्यात योगदान देत आहे. राज्यातील डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, फार्मासिस्ट, आरोग्य यंत्रणेतील कर्मचारी, सफाई कर्मचारी, पोलिस, अंगणवाडीताई, आशाताई, शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज संस्थांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अगदी पहिल्या दिवसापासून जीवाची जोखीम पत्करुन कोरोनाविरुद्ध पहिल्या फळीत लढत आहेत. संकटकाळात महाराष्ट्र एकजूट होतो हा इतिहास आहे. राज्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि नागरिक हाच इतिहास पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोरोनाविरुद्ध लढताना काही सहकाऱ्यांना प्राण गमवावे लागले. या दिवंगत कोरोनायोद्ध्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. कोरोनाविरुद्धच्या लढाईत अगदी पहिल्या दिवसापासून राज्य सरकारचं ध्येय स्पष्ट होतं. त्यामुळे सरकारने अनेक पथदर्शी निर्णय घेतले.

**महाराष्ट्र सरकारने घेतलेले महत्वाचे निर्णय**

कोरोनाविरुद्धच्या लढाईत लसीकरणाचं महत्व लक्षात घेऊन राज्याने लसीकरण

मोहिम प्रभावीपणे राबवली. सद्यस्थितीत दीड कोटींहून अधिक लसीकरणाचा विक्रमी टप्पा राज्याने पार केला आहे. राज्याने १८ ते ४४ वयोगटातील प्रत्येक नागरिकाला मोफत लस देण्याचा निर्णय घेतला आहे. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. लसनिर्मिती वाढवण्यासाठी मुंबईतील हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये १५४ कोटी रुपये खर्चून भारत बायोटेकच्या सहकार्याने लस उत्पादन प्रकल्प उभारण्यात येत आहे. कोरोना साखळी तोडण्यासाठी लागू ''ब्रेक द चेन'' निर्बंधकाळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी राज्यासाठी ५ हजार ४७६ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले आहे. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समित्यांच्या माध्यमातून ३ हजार ३०० कोटी, आमदारांना स्थानिक विकास निधीतून ३५० कोटी रुपये खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अन्न सुरक्षा योजनेंतर्गत राज्यातील सात कोटी लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती तीन किलो गहू, दोन किलो तांदूळ देण्यासाठी ९० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. निर्बंधकाळात राज्यात दररोज दोन लाख शिवभोजन थाळ्यांचे मोफत वितरण करण्यात येत आहे. त्यासाठी ७५ कोटी रुपये उपलब्ध केले आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन या पाच योजनांच्या राज्यातील ३५ लाख लाभार्थ्यांना दोन महिन्यांकरीता प्रत्येकी १ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य आगाऊ देण्यात येत आहे. त्यासाठी ९६१ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. राज्यातील १२ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगारांना प्रत्येकी दीड हजारांप्रमाणे १८० कोटी रुपयांची मदत दिली जात आहे. २५ लाख नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी ३७५ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येत आहे.



**कोरोना संसर्गसाखळी तोडण्यासाठी सरकारला लॉकडाऊन किंवा मर्यादित निर्बंधांसारखे निर्णय नाईलाजाने घ्यावे लागले. त्याची झळ औद्योगिक, व्यापारी क्षेत्राला बसली. त्यातून राज्याचं वित्तीय नुकसान झालं. हे वित्तीय नुकसान भविष्यात भरुन काढता येईल, परंतु नागरिकांचे गेलेले जीव परत येऊ शकत नाहीत. याची जाणीव ठेवून राज्यातील प्रत्येक नागरिकाचा जीव वाचावा, सर्वजण सुरक्षित रहावेत, कोरोनामुळे कुणाचाही मृत्यू होऊ नये, हे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवून राज्य सरकार गेले सव्वा वर्ष काम करत आहे. तो लढा आज ही सुरु आहे.**

राज्यातील ५ लाख नोंदणीकृत फेरीवाल्यांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे ७५ कोटी रुपये तर, १२ लाख परवानाधारक रिक्षाचालकांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे १८० कोटींची मदत राज्य सरकारकडून दिली जात आहे. ही मदत देतांना सायकल रिक्षाचालकांचाही विचार करण्यात आला आहे. आदिवासी विभागांतर्गत खावटी योजनेचा लाभ घेत असलेल्या १२ लाख आदिवासी कुटुंबांना प्रत्येकी दोन हजार रुपयांप्रमाणे २४० कोटींच्या निधीची तरतुद करण्यात आली आहे.

**'डीपीसी'तून ३ हजार ३०० कोटी**

जिल्हा वार्षिक योजनेतील तीस टक्के निधी 'कोविड' वरील औषधोपचार, उपकरणे, सुविधा उभारणी व इतर व्यवस्थेसाठी खर्च करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. राज्यभरासाठी ३ हजार ३०० कोटी रुपये एवढा निधी यासाठी उपलब्ध झाला आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात १ हजार १०० कोटी रुपयांचा निधी तातडीने वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत निधी आवश्यकतेनुसार वितरीत करण्यात येणार आहे. यामुळे निधी वितरणाच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण झाले आहे. 'कोरोना' लढाईसाठी आवश्यक सामुग्रीच्या खरेदीसाठी प्रक्रीया जलद आणि सुलभ झाली आहे.

**आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून ३५० कोटी**

राज्यातील आमदारांच्या स्थानिक विकास निधीत गेल्यावर्षी दोन कोटींवरुन तीन कोटी रुपये, तर यावर्षी त्यात एक कोटींची वाढ करुन तो प्रत्येकी चार कोटी रुपये करण्यात आला आहे. या चार कोटीपैकी एक कोटी रुपयांचा निधी 'कोरोना' प्रतिबंधक उपाययोजनांसाठी आपापल्या मतदारसंघात खर्च करण्यास आमदारांना परवानगी देण्यात आली आहे. या माध्यमातून विधानसभेतील २८८ आणि विधान परिषदेतील ६२ अशा एकूण ३५० आमदारांचा ३५० कोटी रुपयांचा निधी राज्याच्या विविध भागात 'कोरोना' प्रतिबंधक उपाययोजनांसाठी उपलब्ध झाला आहे.

**राज्य आपत्ती निवारण निधी (एसडीआरएफ) मधूनही निधी**

राज्यातील रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन निर्मिती प्लॅन्ट बसविण्यासाठी तसेच 'कोरोना' प्रतिबंधक अन्य उपाययोजनांसाठी राष्ट्रीय आरोग्य मिशन, सार्वजनिक आरोग्य विभाग, राज्य आपत्ती निवारण निधी (एसडीआरएफ) मधून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे 'कोरोना' विरोधी लढ्याला निधीची कमतरता भासणार नाही.

**रुग्णालयात ऑक्सिजननिर्मितीसाठी प्लॅन्ट**

राज्यातील 'कोरोना'ची वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन राज्यातच अधिकाधिक ऑक्सिजन निर्मिती करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. कोल्हापूर आणि ठाणे जिल्ह्यातील रुग्णालयांच्या ठिकाणी याआधीच हवेतून ऑक्सिजन निर्माण करण्याचे प्रकल्प स्थापन झाले आहेत. मुंबई महापालिकेनेही अशा प्रकल्पनिर्मितीची कार्यवाही सुरु केली आहे. या तिघांनी विहित प्रक्रियेद्वारे खरेदी केलेल्या दरांना प्रमाण मानून नवीन ऑक्सिजन प्रकल्पांसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे निविदा प्रक्रियेतील विलंब टाळून, प्रकल्प योग्य दरात उभा राहून कार्यान्वित होण्यास मदत होत आहे. राज्यातील साखर कारखाने, पेपर, पोलाद, पेट्रोलियम, फर्टिलायझर, रिफायनरी उद्योगांच्या माध्यमातून ऑक्सिजननिर्मिती वाढवण्यात आली आहे. अनेक उद्योगांमध्ये बंद असलेल्या ऑक्सिजन निर्मिती संयंत्रांचा शोध घेऊन ती संयंत्रे तातडीने दुरुस्त करण्यात येत आहेत.

**अधिग्रहीत खासगी रुग्णालयातील सुविधांच्या खर्चमंजूरीचे विभागीय आयुक्तांना अधिकार**

'कोरोना' विरुद्धच्या लढाईला बळ व वेग देण्यासाठी शासनाच्यावतीने अनेक खासगी रुग्णालये अधिग्रहीत करण्यात आली आहेत. कोरोनारुग्णांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन प्रशासनाने खासगी रुग्णालयातील खाटांचेही अधिग्रहण केले आहे. अधिग्रहीत खासगी रुग्णालयांमध्ये आवश्यक आरोग्य सुविधा व यंत्रणा उपलब्ध करण्यासाठी विभागीय आयुक्तांना खर्चांच्या मंजूरीचे अधिकार दिले आहेत. यामुळे कोरोना रुग्णांना आवश्यक उपचार आणि त्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री आणि यंत्रणा तातडीने उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

---

**राज्यातील डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, फार्मासिस्ट, आरोग्य यंत्रणेतील कर्मचारी, सफाई कर्मचारी, पोलिस, अंगणवाडीताई, आशाताई, शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज संस्थांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अगदी पहिल्या दिवसापासून जीवाची जोखीम पत्करुन कोरोनाविरुद्ध पहिल्या फळीत लढत आहेत. संकटकाळात महाराष्ट्र एकजूट होतो हा इतिहास आहे.**

---

**अर्थसंकल्पातही आरोग्य सेवेसाठी भरीव तरतूद**

'कोरोना' संकटाचा सामना करताना दीर्घकालीन उपाय म्हणून राज्याची सार्वजनिक आरोग्य व्यसस्था बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धनासाठी ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प येत्या चार वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये दर्जेदार आरोग्य सेवांसाठी येत्या पाच वर्षात ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत, त्यापैकी ८०० कोटी रुपये यावर्षी उपलब्ध केले जात आहेत. कर्करोगाच्या निदानासाठी राज्यात १५० रूग्णालयांमध्ये सुविधा निर्माण केली जात आहे. राज्यातील सिंधुदूर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड आणि सातारा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यात येत आहेत, तसेच अमरावती व परभणी येथेही वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न ११ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयांमध्ये रुपांतर करण्यात येत आहे. १७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडून भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालयांची स्थापना करण्यात येणार आहे. जिल्हा रूग्णालयामध्ये व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, ''पोस्ट कोविड काउन्सिलींग व ट्रीटमेंट सेंटर'' उभारण्यात येणार आहे. याचा फायदा 'कोरोना'वर मात केलेल्या रुग्णांसाठी होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी ८ हजार ९५५ कोटी २९ लाख रुपये तर वैद्यकीय शिक्षण विभागासाठी १ हजार ९४१ कोटी ६४ लाख रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणातून कोरोनाविरुद्धच्या लढाईला बळ देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. हे सर्व प्रयत्न युद्धपातळीवर सुरु आहेत.

महाराष्ट्र आज कोरोनाविरुद्धची लढाई आपल्या संपूर्ण ताकदीनिशी लढत आहे. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी संसर्गाची साखळी तोडणं हे आज आपलं मुख्य ध्येय आहे. त्यासाठी स्वत:ला व आपल्या कुटुंबाला कोरोनामुक्त ठेवण्यासाठी प्रत्येकाने काळजी घेणे अपेक्षित आहे. प्रत्येकाने नाका-तोंडावर मास्क लावणे. परस्परांमध्ये सुरक्षित अंतर राखणे, हात वारंवार स्वच्छ धुणे, अठरा वर्षांवरील सर्वांनी कोरोनाप्रतिबंधक लस घेणे या सूचनांचं पालन निष्ठापूर्वक करण्याचा निर्धार करुया. कोरोनाला हरवूया, महाराष्ट्राला कोरोनामुक्त करुया. महाराष्ट्र पडेल तो संघर्ष करेल, पण कोरोनाला हरवेल. महाराष्ट्र देशातील पहिले कोरोनामुक्त राज्य ठरेल, असा आपला विश्वास आणि प्रयत्न आहे.

■■■

*लेखक महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत.*

# महाराष्ट्राची शिक्षण क्षेत्रातील वैभवशाली वाटचाल

– डॉ. अजित मुळजकर, डॉ. नरेश पीनमकर




**महाराष्ट्राने भारत देशामध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. महाराष्ट्र ही संतांची आणि विचारवंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्राला पुरोगामी विचारसरणीचा वैभवशाली इतिहास लाभला असून अनेक संत, विचारवंत आणि समाजसुधारकांच्या परिसस्पर्शाने ही भूमी महान बनली आहे. शिक्षण क्षेत्रातही महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य राज्य आहे. २०११च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ८९% इतके आहे. यात ९१% पुरुष तर ७८% महिला साक्षर आहेत. शहरी आणि ग्रामीण साक्षरतेचे प्रमाणही महाराष्ट्रात समाधानकारक असेच आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये शिक्षणाचा प्रसार अतिशय चांगल्या प्रकारे झालेला आहे.**

पाठ्यक्रमावर आधारित नियमित शिक्षण व्यवस्थेचा आरंभ होण्याआधी धर्म हाच जीवन जगण्याचा मार्ग होता. मात्र नियमित शिक्षणाची सुरुवात होऊन ज्ञानाच्या कक्षा रुंदावत गेल्या व शिक्षणरूपी ज्ञानगंगा अनेक दिशेने वाहत, मानवी समाजाच्या विविध ज्ञानाधिष्ठित संस्कृतीचा विकास करत जीवन जगण्याचा मार्ग बनली जगणे म्हणजेच शिकणे असा शिक्षणाचा अत्यंत व्यापक अर्थ झाला.

भारतीय शिक्षण पद्धतीचा पिरॅमिड फार मोठा आहे. त्यात प्राथमिक शिक्षण हे खालच्या स्तरावर येते व विद्यापीठीय शिक्षण हे वरच्या स्तरावर येते. माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण हे अनुक्रमे चढत्या क्रमाने येतात.

ब्रिटिश गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या प्रयत्नातून भारतीयांना आधुनिक शिक्षण देणारी पहिली शाळा बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी अंतर्गत १८२७ मध्ये मुंबई राज्यात स्थापन झाली. इथूनच महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचा पाया रोवला गेला. पुण्यातील भिडे वाड्यामध्ये क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रातिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नातून मुलींची पहिली शाळा सुरू झाली आणि महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांतीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. छत्रपती राजर्षी शाहू महाराज, बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ आणि डॉ. रफिक झकेरिया इत्यादी पुरोगामी नेत्यांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीला पुढे नेण्याचे काम केले.

आज महाराष्ट्र राज्यात एकूण १,०६,६६८ शाळा असून ६५,४५० स्थानिक संस्था आहेत. यापैकी ४१, २१४ शाळा खाजगी अनुदानित शाळा आहेत. या सर्व शाळांमध्ये आज मितीला ६,८६,४९५ शिक्षक कार्यरत असून २,१७,४१,५१९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापैकी १,१५,४१,५१९ मुले असून १,०१,९९,९१९ मुली शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रात जिल्हा परिषद, नगर परिषद व महानगरपालिकांच्या शाळा, सोबतच खाजगी अनुदानित व विना-अनुदानित शाळा, आश्रमशाळा, वस्ती शाळा, साखर शाळा आणि इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून CBSE आणि ICSE अंतर्गत चालणाऱ्या बहुसंख्य शाळा कार्यरत आहेत. आज महाराष्ट्रातील सर्वात गजबजलेल्या शहरापासून ते दुर्गम-अतिदुर्गम भागांपर्यंत शाळांचा प्रसार झाला असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आजमितीस महाराष्ट्रात सर्व व्यवस्थापनांच्या शालेय शिक्षण विभागाच्या (शासकीय, खाजगी) तसेच समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, अपंग आयुक्तालयामार्फत चालवल्या जात असलेल्या शाळांमधून सुमारे २.२५ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांसंबंधीची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येते. पूर्वी ही माहिती तयार करून वरिष्ठ कार्यालयास पाठवण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक व प्रशासकीय यंत्रणांचा बराच वेळ खर्च होत होता. मात्र तो वेळ आता विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी उपलब्ध झालेला आहे.

महाराष्ट्राने भारत देशामध्ये आपली एक

वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. महाराष्ट्र ही संतांची आणि विचारवंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्राला पुरोगामी विचारसरणीचा वैभवशाली इतिहास लाभली असून अनेक संत, विचारवंत आणि समाजसुधारकांच्या परिसस्पर्शाने ही भूमी महान बनली आहे. शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य राज्य आहे. २०११च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ८९% इतके आहे. यात ९१% पुरुष तर ७८% महिला साक्षर आहेत. शहरी आणि ग्रामीण साक्षरतेचे प्रमाणही महाराष्ट्रात समाधानकारक असेच आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये शिक्षणाचा प्रसार अतिशय चांगल्या प्रकारे झालेला आहे.

महाराष्ट्रातील उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांचाही मोठा वैभवशाली इतिहास आहे. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. हे भारतात स्थापन झालेल्या पहिल्या तीन विद्यापीठांपैकी एक विद्यापीठ असून ज्ञानाचे शक्तिपीठ म्हणून त्याची विशेष ओळख आहे. आज मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या एक हजार च्या आसपास आहे. पुणे विद्यापीठ कायद्यानुसार १९४९ साली स्थापन झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पूर्वेकडील ऑक्सफर्ड म्हणून ओळख आहे. या दोन्ही विद्यापीठांचे योगदान महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या प्रगतीमध्ये मोलाचे ठरलेले आहे. मराठवाड्यात उच्चशिक्षणाची खरी सुरुवात १९५८ साली मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेपासून झाली. त्यावेळी मराठवाड्यात केवळ सहा महाविद्यालये होती. आज मराठवाड्यात सामान्य शिक्षण देणारी दोन विद्यापीठे आहेत. तेथील संलग्नित महाविद्यालयांची संख्या तर जवळपास ६०० इतकी आहे.


पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पुण्यातूनच मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी असो, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था असो, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी असो, या सर्व शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाच्या ज्ञान गंगेचे खोरे सबंध महाराष्ट्रभर विस्तारल्याचे चित्र आज आपणास पहायला मिळते. आज महाराष्ट्रात हजारो शाळा, शेकडो महाविद्यालये आणि विविध क्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक अशी ६३ विद्यापीठे आणि राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या संस्था कार्यरत आहेत. महाराष्ट्राला ज्याप्रमाणे आर्थिक केंद्र मानले जाते, त्याचप्रमाणे शिक्षणाचा सर्वदूर प्रसार करणारे राज्य म्हणूनही ओळखले जाते.

**ब्रिटिश गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या प्रयत्नातून भारतीयांना आधुनिक शिक्षण देणारी पहिली शाळा बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी अंतर्गत १८२७ मध्ये मुंबई राज्यात स्थापन झाली. इथूनच महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचा पाया रोवला गेला. पुण्यातील भिड-वाडा येथे क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नातून मुलींची पहिली शाळा सुरू झाली आणि शैक्षणिक क्रांतीची खरया अर्थाने महाराष्ट्रात सुरुवात झाली.**

**महाराष्ट्रातील उच्च शिक्षण :**

अखिल भारतीय उच्चशिक्षण सर्वेक्षण अहवाल २०१८-१९'नुसार महाराष्ट्रात एकूण ६२ विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यामध्ये ०१ केंद्रीय विद्यापीठ, २२ राज्य विद्यापीठे, ०६ राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या संस्था आणि २१ अभिमत विद्यापीठाचा समावेश आहे. यात कृषी, तंत्रज्ञान, आरोग्य, महिला, दूरशिक्षण व विधी सारखी विविध विद्यापीठे समाविष्ट आहेत. समाजातील विविध घटकांना उच्च शिक्षणाचा लाभ देण्याच्या हेतूने महाराष्ट्रात अशा विविध प्रकारच्या विद्यापीठांची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र हे सर्वाधिक महाविद्यालये असणारे भारतातले दुसरे राज्य असून 'अखिल भारतीय उच्चशिक्षण सर्वेक्षण अहवाल २०१८-१९'च्या आकडेवारी नुसार महाराष्ट्रात ४३४० महाविद्यालये आहेत. महाराष्ट्रात प्रति एक लाख लोकांमागे ३३ महाविद्यालये आहेत. महाराष्ट्रातील विद्यापीठाअंतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही देशात पहिल्या क्रमांकाचे आहे. महाराष्ट्र हे तंत्रशिक्षणाच्या बाबतीतही अग्रेसर राज्य असून २०१८-१९च्या सर्वेक्षणातील आकडेवारीनुसार महाराष्ट्रात एकूण ६६९ तंत्रनिकेतन महाविद्यालये आहेत. यातून सुमारे २.४३ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. देशातील नर्सिंग संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यादीत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. याच सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्रातील ३३,५४५ विद्यार्थी विविध नर्सिंग संस्थांमध्ये प्रवेशित होते. त्यापैकी सुमारे ९०% मुली होत्या. शिक्षक प्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येबाबतही महाराष्ट्र अग्रेसर असून महाराष्ट्रात



| अ. क्र. | विद्यापीठाचे नाव | दर्जा | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा | केंद्रीय | **१९९७** |
| २ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | राज्य सार्वजनिक | १८५७ |
| ३ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | राज्य सार्वजनिक | १९५७ |
| ४ | डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद | राज्य सार्वजनिक | १९५८ |
| ५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | राज्य सार्वजनिक | १९२३ |
| ६ | डॉ. बा. आं. तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे | तंत्रज्ञान | १९८९ |
| ७ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | कृषी | १९७२ |
| ८ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | राज्य सार्वजनिक | २०११ |
| ९ | कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक, नागपूर | संस्कृत | |
| १० | महाराष्ट्र पशू आणि मत्स्यशास्त्र विद्यापीठ, नागपूर | पशू, मत्स्य आणि दुग्ध | २००० |
| ११ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | आरोग्य | २००० |
| १२ | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी | कृषी | १९६८ |
| १३ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | राज्य सार्वजनिक | १९९१ |
| १४ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | कृषी | १९६९ |
| १५ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | राज्य सार्वजनिक | १९८३ |
| १६ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | राज्य सार्वजनिक | १९६२ |
| १७ | श्रीमती न. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई | महिला | १९१६ |
| १८ | पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | राज्य सार्वजनिक | २००४ |
| १९ | स्वा. रा. ति. म. विद्यापीठ, नांदेड | राज्य सार्वजनिक | १९९४ |
| २० | व. ना.म. कृषी विद्यापीठ, परभणी | कृषी | १९७२ |
| २१ | य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक | दूर शिक्षण | १९९० |
| २२ | महाराष्ट्र राष्ट्रीय विधीविद्यापीठ, मुंबई | विधी | २०१५ |
| २३ | महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर | विधी | २०१५ |
| २४ | महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद | विधी | २०१७ |



२०१८-१९ मध्ये सुमारे ३३,४५४ विद्यार्थ्यांनी या संस्थांमध्ये प्रवेश घेतला होता. त्यापैकी सुमारे ७९%मुली तर २१% मुले होती.

विद्यापीठ अनुदान आयोगाने अंतर्गत उच्चशिक्षणाची गुणवत्ता ठरवणाऱ्या नॅक (NAAC) या संस्थेकडून मूल्यांकन करून घेतलेल्या महाविद्यालय आणि विद्यापीठामध्येही महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील १७११ महाविद्यालयांनी आणि ३२ विद्यापीठांनी आजवर मूल्यांकन व प्रत्यायन करून घेतले आहे. विशेष म्हणजे देशातील A+ दर्जा असलेली सर्वाधिक महाविद्यालये देखील महाराष्ट्रातच आहेत. यावरून उच्चशिक्षणात गुणवत्ता टिकवण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा आग्रह किती आधिक आहे, हे लक्षात येते. महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रचंड आग्रही आहे. वेळोवेळी शिक्षण संचालनालय आणि विविध विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयांकडून महाविद्यालयांना नॅक या गुणवत्ता तपासणी करणाऱ्या संस्थेकडून मूल्यांकन करण्याचा आग्रह केला जातो. इ. स. २०१९ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात एकूण ६८ स्वायत्त महाविद्यालये आहेत, जी तमिळनाडू नंतर देशातील सर्वाधिक संख्या आहे. 'शोधगंगा' या संकेतस्थळावरील माहितीनुसार, जास्तीत जास्त संशोधनपर शोधप्रबंध सादर करणाऱ्या भारतातील पहिल्या दहा विद्यापीठांच्या यादीत महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा

समावेश आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ रद्द करून त्यातील उणिवा दूर करून नवीन 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६'' मंजूर करण्यात आला आहे. जुन्या कायद्यात शिक्षक हा केंद्रस्थानी होता मात्र नवीन कायद्यात विद्यार्थी हा केंद्रस्थानी आहे. या नवीन विद्यापीठ कायद्यामुळे उच्चशिक्षणामध्ये अनेक सकारात्मक बदल घडून आले आहेत. जसे की, संशोधनाच्या दर्जात सुधारणा; कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती; लोकशाही निवडणूक पद्धतीने विद्यार्थी परिषदेचे गठण इत्यादी बदल घडून आले आहेत.

सामान्यपणे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT) ची पाठ्यपुस्तके उच्च दर्जाची व प्रमाण मानली जातात. मात्र महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (MSBTPCR) ची पाठ्यपुस्तके तुलनेने दुय्यम मानली जातात. मात्र वास्तविक पाहता, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाची पाठ्यपुस्तके बऱ्याच निकषात तुलनेने श्रेष्ठ ठरतात. २०१५ सालापासून या पुस्तकांमध्ये QR कोडचा वापर सुरू झालेला आहे. QR कोडमुळे एखादा घटक शिकण्यासाठी सहाय्यभूत ठरणारे व्हिडिओ व इतर प्रकारचे e-content उपलब्ध झाले. ही सर्व क्रमिक पाठ्यपुस्तके बालभारती च्या संकेतस्थळावर PDF स्वरूपात उपलब्ध असल्याने लॉक-डाऊनच्या काळामध्ये विद्यार्थ्यांना घरबसल्या शिकण्यासाठी सहाय्यभूत ठरली. पण NCERTच्या पाठ्यपुस्तकांमध्ये ते आलीकडे, २०१९-२० पासून पहावयास मिळते. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या पुस्तकांमध्ये रंगसंगती उत्कृष्ट असून अनेक चित्रे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आतील मजकूर समजावून घेण्यास उपयुक्त ठरतात. NCERTच्या पुस्तकांमध्ये घोका आणि ओका' हेच तत्त्व दिसून येते; मात्र महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या पुस्तकांमध्ये विषयासंबंधी माहिती जरी कमी असली, तरी ही पुस्तके विद्यार्थ्यांना विचार करण्यास व शोध घेण्यास प्रोत्साहित करणारी आहेत.



जी शिक्षण पद्धती प्रयोगशील व नाविन्यपूर्ण असते ती परिवर्तनशील असते व अशीच शिक्षण पद्धती बदलत्या काळानुरूप येणाऱ्या आव्हानांना पेलू शकते. ज्ञान निर्मितीचे कार्य मूलभूत आणि उपयोजित संशोधनातून होत असते. या सर्व बाबींचा अभ्यास करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलात आणले जात आहे. कुठलीही नवीन गोष्ट सहजासहजी स्वीकारली जात नाही, पण जेव्हा त्याचे महत्त्व पटते, तेव्हा त्या गोष्टीच्या स्विकाराला गती मिळेल. परिवर्तनवादी महाराष्ट्राने अनेक सकारात्मक बदल फार वेगाने स्वीकारून देशाच्या शैक्षणिक क्षेत्रासमोर एक आदर्श ठेवला आहे. एकविसाव्या शतकात, जागतिकीकरणाच्या तिसऱ्या टप्प्यात, भारत हे महासत्ता होऊ पाहत असलेले राष्ट्र आहे. त्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असणार आहे. त्यात शिक्षण हे प्रमुख अस्त्र असणार आहे. देशातील प्रत्येक नागरिक हा ज्ञान कर्मी (knowledge worker) झाला पाहिजे. आजीवन शिक्षण व सुरक्षित समाज या दोन संकल्पना कुठल्याही राष्ट्रास महान बनवू शकतात.

■■■

*डॉ. अजित मुळजकर - सहायक प्राध्यापक तथा इंग्रजी विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा*

*डॉ. नरेश पीनमकर - सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा*

*ईमेल :* **ammulaskar@gmail.com**



# कौशल्य विकास प्रशासन

– जुथिका पाटणकर, डॉ.मनीष मिश्रा



**भारतात कौशल्य विकास हे क्षेत्र अजूनही केंद्र सरकारच्या अखत्यारित मानले जाते. यात थोडा बदल होत देशातील काही राज्यांनीही त्यांच्या वार्षिक अर्थसंकल्पात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण (टीव्हीईटी) इ. योजनांसाठी निधी वाटप अलीकडे वाढवले आहे. बहुतेक कौशल्य विकास योजनांचे, नियोजन आणि देखरेख केंद्रसकारद्वारे राबविले जाते आणि राज्य सरकार आणि जिल्ह्यांची त्यात अक्षरश: काहीही भूमिका नसते. लोकसहभाग आणि नागरिकांचे सक्षमीकरण होण्यासाठी आणि प्रत्येकाची रोजगाराची अपेक्षा आणि चांगल्या आर्थिक संधीची क्षमता पूर्ण करण्यासाठी हे चित्र बदलण्याची नितांत आवश्यकता आहे.**

भारतात कौशल्य विकास हे क्षेत्र अजूनही केंद्र सरकारच्या अखत्यारित मानले जाते. यात थोडा बदल होत देशातील काही राज्यांनीही त्यांच्या वार्षिक अर्थसंकल्पात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण (टीव्हीईटी) इ. योजनांसाठी निधी वाटप अलीकडे वाढवले आहे. बहुतेक कौशल्य विकास योजनांचे, नियोजन आणि देखरेख केंद्रसरकारद्वारे राबविले जाते आणि राज्य सरकार आणि जिल्ह्यांची त्यात अक्षरश: काहीही भूमिका नसते. लोकसहभाग आणि नागरिकांचे सक्षमीकरण होण्यासाठी आणि प्रत्येकाची रोजगाराची अपेक्षा आणि चांगल्या आर्थिक संधीची क्षमता पूर्ण करण्यासाठी हे चित्र बदलण्याची नितांत आवश्यकता आहे.

गेल्या दशकभरात बहुतेक राज्यांत स्थापन झालेल्या ७०० हून अधिक जिल्हा कौशल्य समित्यांना कौशल्य प्रशिक्षण योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी त्यांची भूमिका प्रभावीपणे सुरू करण्यापूर्वी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. या क्षेत्रात ख-या अर्थाने विकेंद्रीकरण हवे असल्यास जिल्हा कौशल्य समित्यांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे आणि या समित्यांद्वारे जिल्हा स्तरावर कौशल्य विकासाच्या व्यवस्थापनावर अधिकाधिक संसाधनांचा वापर, स्थानिकांच्या आकांक्षा पूर्ण करणे आणि समाजातील सर्व उपेक्षित घटकांचा समावेश सुनिश्चित व्हावा, अशी अपेक्षा आहे.

जिल्हा कौशल्य समित्यांच्या क्षमता-वाढीच्या गरजा समजून घेण्यासाठी विकेंद्रित कौशल्य व्यवस्थापन यंत्रणेतील या समित्यांच्या कार्यांबद्दल जाणून घेऊयात. यामध्ये कौशल्य प्रशिक्षणाचे नियोजन, मागणी व पुरवठा, सामाजिक-आर्थिक प्रोफाइल आणि जिल्हा पातळीवर कौशल्य पायाभूत सुविधांची उपलब्धता यांचा समावेश आहे. पुढे, जिल्हा कौशल्य समित्यांद्वारे प्रशिक्षणार्थींची ओळख, जमवाजमव, समुपदेशन, पुरस्कार इत्यादींसारख्या विविध क्रियाकलापांसाठी संसाधने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, परिणाम साध्य करण्यासाठी काय चांगले चालू आहे आणि कोणत्या गोष्टी सुधारणे आवश्यक आहेत याचे परीक्षण करणे आणि त्याचे मूल्यांकन करणे महत्वाचे आहे.

जिल्हा कौशल्य समित्यांमध्ये सर्व महत्त्वपूर्ण जिल्हा विकास विभागीय अधिका-यांच्या संरचनेचा अंतर्भाव होतो. या सर्व अधिका-यांना त्यांच्या विभागीय कार्यक्रमांद्वारे जिल्ह्याची अर्थव्यवस्था आणि त्यासंदर्भातील जिल्ह्याच्या सर्वोच्च संभाव्यतेची, तसेच जिल्ह्यातील कामगार दलाचे स्वरूप आणि त्या ठिकाणी असणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेबद्दल संपूर्ण माहिती असते. शिवाय रोजगार आणि रोजगार तयार करण्यासाठी व्यापार आणि लोकसमुदाय आणि एकूण लोकसंख्या यावर कौशल्य प्रशिक्षणांची फलदायी व्यवस्था कशी असावी याचीही कल्पना असते. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा कौशल्य समित्या जिल्ह्यासाठी योग्य नियोजन करून कौशल्य विकासाचे कार्य व्यापकपणे हाती घेण्यास सिद्धांतदृष्ट्या सर्वात योग्य संस्था असतात. आणि हे करण्यासाठी जिल्हा कौशल्य समित्यांना सुसज्ज आणि सक्षम बनविण्यासाठी, त्यांची क्षमता समजून घेण्याची, योजना करण्याची आणि वितरणाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. जिल्हा कौशल्य समित्यांनी क्षमता निर्माण

करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. यासाठी i) संबंधित माहितीची निर्मिती आणि व्यवस्थापन करणे ii) प्रशिक्षणाद्वारे माहितीचा प्रसार करणे iii) मार्गदर्शनपर सरावसंधी प्रदान करणे v) कार्यक्षम अभिप्रायासह मूल्यांकन करणे. इ. आवश्यक आहे.

राज्य कौशल्य अभियानाद्वारे अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण किंवा संकल्प सारख्या कार्यक्रमांची कमतरता तसेच लक्षात येण्यासारखा व स्पष्ट अभाव आहे. तसेच या कार्यात जिल्हा कौशल्य नियोजन संस्थेच्या सहाय्याची सातत्याने गरज लागते. याचा अर्थ असा होतो की राज्ये / जिल्हे हे जिल्हा कौशल्य समित्यांतील तज्ञ मार्गदर्शनाच्या उपलब्धतेचा योग्य प्रकारे उपयोग करण्यास अजून तरी सक्षम होऊ शकलेले नाहीत.


संकल्पच्या जिल्हा कौशल्य समित्यांशी अनेकवेळा झालेल्या चर्चांमुळे त्यांच्याकडे कौशल्य प्रशिक्षण उपक्रमांचे नियोजन आणि देखरेख करण्यासाठी प्रमाणित स्वरुप असण्याची आवश्यकता निर्माण झाली. यामुळे जिल्हा कौशल्य समित्यांना पुरावा-आधारित योजना तयार करण्यात मदत होऊ शकते आणि प्रत्येक जिल्ह्यातील योजना प्रत्यक्षात आणल्या जातील याबाबतही सुनिश्चितता येऊ शकते. त्यानुसार, संकल्पने कौशल्य उपक्रमांचे नियोजन व देखरेखीसाठी संपूर्ण जिल्हा कौशल्य समित्यांना उपयोगी होईल असे नमुना प्रकारचे टूलकिट तयार केले. कौशल्य प्रशिक्षणाचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयुक्त माहिती असलेली ग्रंथालयेही सुरू केली. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय आणि प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना यांचे काही प्रमुख उपक्रम जिल्हा कौशल्य समितींसाठी उपयुक्त ठरले आहेत. तसेच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनच्या प्रभावी अंमलबजावणीत उपसमित्या व मार्गदर्शनपर टूलकिट्स फार उपयोगी ठरले आहेत.

**गेल्या दशकभरात बहुतेक राज्यांत स्थापन झालेल्या ७०० हून अधिक जिल्हा कौशल्य समित्यांना कौशल्य प्रशिक्षण योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी त्यांची भूमिका प्रभावीपणे सुरू करण्यापूर्वी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. या क्षेत्रात ख-या अर्थाने विकेंद्रीकरण हवे असल्यास जिल्हा कौशल्य समित्यांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे**

जिल्हा कौशल्य समित्यांद्वारे ज्ञान निर्मिती आणि प्रसाराचीही प्रक्रिया संस्थागत करणे आवश्यक आहे तसेच जिल्हा कौशल्य समित्यांच्या सदस्यांना त्यांचे अनुभव आणि ज्ञान प्रभावीपणे कौशल्य व्यवस्थापनासाठी वापरण्याची क्षमता सुसज्ज करणे आवश्यक आहे.

कौशल्य प्रशिक्षणाचे यश हे प्रामुख्याने राज्य विभागांचे पूर्ण सामंजस्य आणि सहकार्यावर अवलंबून आहे. त्या विभागातील अधिकाऱ्यांना विविध प्रशिक्षण शिबिरांना पाठवण्याबरोबरच त्यांना वारंवार त्यांच्या कार्यासंबंधी नवीन कौशल्य आत्मसात करण्यास प्रोत्साहीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्वांसाठी उत्तम दर्जाचे परिणाम प्राप्त होतील. हे काम तसे अशक्य नाही परंतु सर्व अधिकृत हितधारकांत परस्पर संवाद नसल्यामुळे अडचण उद्भवते.

प्रस्तावित क्षमता वाढवण्याच्या हेतूने राज्ये आणि जिल्हे यांनी अडचणींना पूर्णपणे समजून त्यास चालना देण्यासाठी सक्रियपणे प्रयत्न केले तर मार्ग निघू शकेल. जसे राज्यस्तरिय यंत्रणा जिल्हा कौशल्य समित्यांच्या सदस्यांना प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यास परवानगी देऊन किंवा एखाद्या प्रख्यात संस्थेत किमान एक उच्च प्रशिक्षण कोर्ससाठी प्रायोजित करून प्रशिक्षित









अधिकाऱ्यांना त्यांच्या निवडीच्या पुढील पोस्टिंगची परवानगी देऊन, त्यांच्या आवडीच्या संबंधित विभागातील प्रतिनियुक्ती पदांवर पदवी देऊन किंवा वाढवून त्यांना प्रोत्साहन देण्याबाबतही राज्याने पुढाकार घेणे किंवा इतर तत्सम मार्ग अवलंबणे.

कौशल्य व्यवस्थापनाची आखणी व वितरण करण्यासाठी राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकडे (एटीआय) संपर्क साधला गेला कारण राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांतील अधिकारी हे राज्य अधिका-यांशी त्यांच्या भाषेत व्यवहार करू शकतात. संस्था बळकट करण्यासाठी संकल्पच्या उद्दीष्टांची पूर्तता केली जाऊ शकते कारण संकल्पची वित्तीय संसाधने राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये योग्य प्रमाणात आणि उपयुक्त सामग्री / मनुष्यबळ म्हणून वापरली जाऊ शकतात. शेवटचा पण महत्वाचा मुद्दा हा की खरेदीत कोणतीही अडचण येणार नाही कारण राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था या सरकारी संस्था आहेत. या संस्थांचा वापर करणे हे सर्व हितधारकांसाठी एकसमान फायद्याचे ठरते.

राज्य प्रशासकिय प्रशिक्षण संस्थांना कौशल्य विकासाच्या कामी नेमणे हा जरी एक प्रशंसनीय आणि आकर्षक प्रस्ताव वाटत असला तरी जिल्हा-स्तरावरील आणि क्षमता-वाढीच्या अभ्यासामध्ये काही प्रमाणात राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या सक्रीय सहभागाची खात्री देत नाही. या बाबतीतला मूलभूत विषय असल्याने याबाबतच्या शंकांचे पूर्णपणे समाधान होत नाही. आपल्याला वेगवेगळी राज्ये व जिल्हे येथील अधिका-यांच्या कौशल्य विकासासंबंधित गरजांच्या आवश्यकता समजण्यातला फरक, काही बाबतीतली कमतरता आणि या अधिका-यांनी नेमक काय बदल करावेत जेणेकरून क्रियाशील गतीमान अशा जिल्हा कौशल्य समित्या कार्यरत होतील याबाबत तपशीलवार नोंद करणे आवश्यक आहे.

राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकडे जिल्हा कौशल्य समितींच्या सदस्यांसाठी कौशल्य व्यवस्थापन आणि नेतृत्व प्रशिक्षण मॉड्यूलची रचना आणि वितरण करण्यासाठी संपर्क साधला गेला. राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना या कार्यासाठी नियुक्त करण्यात बरेच फायदे होते. जसे प्रमाणित पध्दतीला अनुसरून जिल्हा अधिकाऱ्यांना अधिकाधिक लहान मुदतीच्या अभ्यासक्रमासाठी नियुक्त करणे, तसेच राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांतील अधिकारी हे राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांशी त्यांच्या भाषेत व्यवहार करत असल्यामुळे भाषेचा प्रश्न राहत नाही. तसेच परस्पर सहकार्याची संस्था बळकट करण्याच्या संकल्पच्या उद्दीष्टांची पूर्तता केली जाऊ शकते. कारण संकल्पची वित्तीय संसाधने राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांत योग्य प्रमाणात आणि उपयुक्त सामग्री / मनुष्यबळ म्हणून वापरली जाऊ शकतात आणि तसेच कोणत्याही खरेदी बाबत कोणतीही अडचण येत नाही कारण राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था या सरकारी संस्था असून या संस्थांचा सहभाग हा संबंधित सर्व भागधारकांसाठी फायद्याचाच ठरतो.

क्षमता वाढवण्याची गरज निर्माण केल्याने, क्षमता वाढवण्याच्या सामग्रीवरील संक्षिप्त चर्चा देखील आवश्यक आहे. खालील उदाहरणे विचारात घेऊया जी क्षमता वाढवण्यातील सामग्री काय असू शकते यासंबंधी काही बाबी स्पष्ट करतात. अर्थ-विकेंद्रीकरणासाठी मदत म्हणून क्षमता वाढवण्याची शिफारस मंत्रालयाकडून राज्ये व जिल्हा कौशल्य समित्यांना कौशल्य अभियानांतर्फे लिहून दिली जाऊ शकत नाही. यात विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेसह काही प्रमुख बाबतीत जिल्हा कौशल्य समित्यांना हातोटी विकसित करणे आवश्यक आहे. जेणेकरून अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र, माध्यम, कार्यपद्धती, व्यावहारिक शिक्षण हे सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध संसाधनां आधारे आकार घेऊ शकतील आणि त्यांच्या आवश्यक गरजा पूर्ण करतील.

मंत्रालयात विकसित झालेल्या संकल्पनांना विशेष तज्ञ संस्था आणि प्रशिक्षकांच्या मदतीने एकत्र केले पाहिजे जेणेकरून खऱ्या सशक्तीकरण आणि कल्पनांना वाव व प्रसार मिळेल. यात खासगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही संस्थांना वाव आहे. क्षमता वाढविण्याबाबत देशातील बऱ्याच संस्था आहेत आणि त्या त्यामध्ये योगदान देऊ शकतात. उदाहरणार्थ, सार्वजनिक धोरण संशोधनात स्वारस्य असणाऱ्या संस्थांची भूमिका आहे, विशेषत: स्थानिक-स्तरावरील नियोजन या विषयावर ज्या कौशल्य व्यवस्थापनाच्या क्षेत्रात ते मार्गदर्शन करू शकतात. हे ज्ञान नंतर राज्य प्रशासकिय प्रशिक्षण संस्था आणि मार्गदर्शक सराव सारख्या संस्थांद्वारे प्रसारित केले जाऊ शकते.

कौशल्य प्रशिक्षण आणि कौशल्य व्यवस्थापनाविषयी विश्वसनीय डेटा तयार करण्यासाठी जिल्हा कौशल्य समित्या कालांतराने स्वत: क्षमता विकसित करू शकतात जे कौशल्य प्रशिक्षणात गुंतलेली संस्था, क्षेत्र कौशल्य परिषद आणि नियोक्ते वापरू शकतात. डेटा व्युत्पन्न कारणास्तव

**कौशल्य प्रशिक्षणाचे यश हे प्रामुख्याने राज्य विभागांचे पूर्ण सामंजस्य आणि सहकार्यावर अवलंबून आहे. त्या विभागातील अधिकाऱ्यांना विविध प्रशिक्षण शिबिरांना पाठवण्याबरोबरच त्यांना वारंवार त्यांच्या कार्यासंबंधी नवीन कौशल्य आत्मसात करण्यास प्रोत्साहीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्वांसाठी उत्तम दर्जाचे परिणाम प्राप्त होतील.**

बनविलेल्या प्रशिक्षण रणनीतीमुळे कौशल्य प्रशिक्षणाचे परिणाम सुधारून यात सुसंगत नसणारे अनेक स्तर कमी होऊ शकतात.

सामाजिक-आर्थिक विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण घेणे हे एक भव्य योजनेसारखे वाटते. परंतु कौशल्य व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणाद्वारे ते अचूकपणे समजण्यायोग्य आणि प्राप्त करण्यायोग्य आहे. भारतातील कौशल्ये, जाती-निहाय मानण्यात आणि पाळण्यात आली असून कमी उत्पन्नाची व सामाजिकदृष्ट्या हिन मानण्यात आलेली कामे गरिब वर्गावर लादली गेली. सफाई कामगार किंवा सफाई कर्मचारी हे त्याचे सर्वात स्पष्ट उदाहरण ठरेल. या व्यवसायाला आजवर ज्याप्रकारे हिन दर्जा मिळत आलेला आहे ती समज कोण मोडेल? कचरा विल्हेवाट लावणा-या व्यक्तिला तिचा व्यवसाय महत्वाकांक्षी, आर्थिकदृष्ट्या पुरस्कृत, उद्योगाची संधी असलेला कसा घडवता येईल? याचे उत्तर या कामाचे सर्वार्थाने यांत्रिकीकरण करणे हे असेल. धोकादायक आणि सामाजिकदृष्ट्या हिन मानलेल्या या कामांसाठी यंत्र वापरून कौशल्य-प्रशिक्षण देणे सुनिश्चित केले पाहिजे जेणेकरून हे काम सुरक्षित, आरोग्यदायी आणि सन्मानाचे ठरेल. यांत्रिकीकरणामुळे या कामाचे स्वरूप बदलले जाईल तसेच या संबंधिच्या सर्व कामांची व भूमिकांची व्याप्ती आणि सामग्री बदलली जाईल. यात वेगवेगळ्या स्तरांवर पाहणी होईल. कामाचे बदललेले स्वरूप आणि यात व्यवसायाच्या संधी निर्माण झाल्या तर इतर जातीतील व्यक्तींनाही हे काम आकर्षित करेल. तसेच विद्यमान जातींचा कार्यस्तर उंचावेल आणि त्यांना संबंधित किंवा इतर व्यवसाय करण्यास सक्षम करेल. यातून आपल्या समाजातील चिवट अशी जातीच्या आधारावर झालेली कामांच्या विभागणीची रचना मोडली जाईल आणि अधिक न्याय्य सामाजिक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल. परंतु हे सर्व होण्यासाठी ते केवळ यंत्राधारित कौशल्य प्रशिक्षणच नाही तरभौगोलिक व प्रशासकीय विभागांद्वारे जसे जिल्हानिहाय संपूर्ण व्यवसायाचे नियोजन आणि कौशल्य प्रशिक्षणांचे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन करण्यातून घडेल. सफाई कामांत सतत यांत्रिकीकरणातून हे काम करणाऱ्या व्यक्तींना ओळख, नव्या संधी व इतर वेगळे व्यवसाय करण्याची समान संधी मिळेल. जिल्हास्तरीय कौशल्य नियोजकांनी सामाजिक न्याय आणि आर्थिक वाढीसाठी कौशल्य विकासाच्या फायद्याच्या संभाव्यतेबद्दल नियोजन केले पाहिजे. या संदर्भात कचरा विल्हेवाटीचे काम हे एक उदाहरण झाले. अशी अनेक कामे करणारे लोक आहेत ज्यांच्या कामाला समाजात व्यवसायाचा, मानाचा किंवा चांगल्या रोजगार संधींचा दर्जा मिळालेला नाही. अशा कामांची यादी बनवून ती कामे करण्याच्या पारंपारिक पध्दतीत व त्यांना मिळालेल्या हिन दर्जाला बदलण्याचे काम कौशल्य विकास कार्यक्रमातून घडवले जावे. जिल्हा स्तरावर हे काम करतांना सामाजात न्याय्य बदल कसे घडतील, याचा मार्ग कौशल्य विकास नियोजकांनी विकसित करायचा आहे.

यात आणखी एक महत्त्वाचा भाग आहे ज्यामध्ये क्षमता वाढविणे आवश्यक आहे ते म्हणजे विविध व्यवसायांच्या राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय-स्तरीयनियोजन आणि संधींसह त्यांना समाकलित करण्यासाठी जिल्हा कौशल्य योजनांचे मागास आणि पुढे असलेले दुवे ओळखण्याची योजना धारकांची क्षमता आणि आकलन वाढवणे. यात उदाहरण द्यायचे झाल्यास पर्यटन क्षेत्राचे देता येईल. बहुतेक जिल्हा कौशल्य विकास नियोजक हा निष्कर्ष काढतात की जिल्हास्तरावर पर्यटनाच्या पैलूंमध्ये कौशल्य प्रशिक्षण घेतल्यास पर्यटकांची वाढ, महसूल आणि परिणामी नोकरीसंधी मिळतात.

पर्यटन आणि सार्वजनिक वापरासाठी सार्वजनिक व ऐतिहासिक वारसा वास्तूंचे संवर्धन ही जटिल कामे आहेत जी केवळ एकट्या जिल्ह्याच्या नियोजन कक्षेतून पाहिल्यास आर्थिक उत्पन्न देण्यास तेवढी सक्षम राहत नाही. स्थानिक तरुणांना पर्यटन क्षेत्रात करिअरची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा नियोजकांकडे राष्ट्रीय व राज्यस्तरीय पर्यटन विविध नकाशे / गंतव्ये / पर्यटनाचे धोरण्यांची पूर्ण कल्पना असणे आवश्यक आहे आणि या सर्वात त्या विशिष्ट जिल्ह्याचे स्थान, संभाव्य पर्यटन विस्तार संधी याची कल्पना असणे आवश्यक असते.

स्थानिक स्तरावरील पर्यटन स्थाने कोणालाही नियमितपणे रोजगार देऊ शकत नाही किंवा जर प्रशिक्षण हे जिल्ह्याच्या संभाव्यते पुरते मर्यादित असेल तर तेथील वाहतूकदार व मार्गदर्शकांसाठी स्थानिक पातळीवर म्हणावे तितके समाधानकारक रोजगार उपलब्ध होऊ शकत नाहीत. व्यवहाराच्या योजनेमध्ये जिल्ह्याचे स्थान व तेथील संबंधित व्यवसायांची व्याप्ती समजण्यासाठी जिल्हा कौशल्य समितीला



कौशल्य व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. जिल्हा कौशल्य नियोजनात जिल्ह्यातील लोकसंख्येचे सामाजिक-आर्थिक स्थान, स्थानिक समुदायाचे कौशल्य अथवा विशेषत: इतिहास आणि त्यांची बदलती किंवा उदयोन्मुख आकांक्षा यांचीही सखोल माहिती असणे आवश्यक आहे. विकेंद्रित जिल्हा कौशल्य नियोजन करतांना तेथील प्रत्येकाची क्षमता व आकांक्षा यांना योग्य न्याय देत सूक्ष्म-स्तरीय अभ्यासातून जिल्हयातील उद्योग, अर्थार्जन देणारे व्यवसाय, तेथील एकूण लोकसंख्येच्या शिक्षणाची पातळी इ. निकषांचा अभ्यास करून त्यास लागू पडणारे सक्षम नियोजन असले पाहिजे. कौशल्य प्रशिक्षण प्रशासनाची याबाबतीत सर्वसाधारण टीका ही असते की या प्रक्रियेत संधी आणि प्रशिक्षणार्थींचा दृष्टीकोन अपेक्षा यांचा योग्य मेळ बसत नाही.यावर काम करणाऱ्या अनेक व्यावसायिक संस्था आहेत ज्या नियोजनपूर्वक आवड व व्यवसाय दृष्टीकोन मार्गदर्शन करण्यावर काम करतात. या संस्थाच्या सहयोगाने काम करायचे झाल्यास जनमानसशास्त्र जाणावे लागेल. परंतु हे जनमानसशास्त्रही फार खोलात जाऊन शिकायला नकोय तर काही प्राथमिक बाबी सुनिश्चित करता येतील याची जाण येणे. यात मुख्यत: प्रशिक्षणार्थींच्या आवडीचे आकलन करण्यासाठी योग्यसाधने वापरण्याची आणि उपलब्ध अभ्यासक्रमांच्या निवडीबाबत पात्र सल्ला देण्यासाठी योग्य एजन्सीना पाचारण करता येणे या बाबी करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे, जिल्हा कौशल्य योजनाकारांना लोकांना जीवनमान देणारे व्यवहार आणि स्थानिक, राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढीची क्षमता असलेल्या व्यवसाय ओळखून त्यानुसार कौशल्य प्रशिक्षणाचे स्वरूप निश्चित करता आले पाहिजे.

जिल्हा कौशल्य समितीच्या सशक्तीकरण आणि त्यांसंबंधीत विस्तारित भूमिकेसाठी आर्थिक संसाधने आणि त्यांना वाढवण्याच्या साधनांची आवश्यकता असेल.याची सर्वसाधारण तरतूद जिल्हा कौशल्य समितीच्या स्वत: विकसित केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी किंवा नाविन्यपूर्ण महसूल-निर्मिती मॉडेलमधून होते. याचा अर्थ आर्थिक व्यवस्थापनाच्या क्षेत्रात प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता भासेल. त्यासाठी स्थानिक उद्योग आणि व्यापार कक्ष, क्षेत्र कौशल्य परिषद, व्यावसायिक सल्लागार आणि एमजीएन फेलो या तज्ञांसमवेत उद्योग प्रतिनिधींच्या सहकार्याची व त्यासाठी संवाद साधण्याची अपेक्षा आहे. याकरिता स्वयं व संस्थात्मक विकास आणि परस्पर संवादाचे अभ्यासक्रम आणि इतर तत्सम बाबींवरील अभ्यासक्रम देखील जिल्हा कौशल्य समित्यांना अधिक प्रभावी होण्यास मदत करतील.

■■■

***जुथिका पाटणकर भारतीय प्रशासकिय सेवेत अधिकारी आहेत. भारत सरकारच्या विकास मंत्रालयाच्या कौशल्य विकास मंत्रालयात त्या अतिरिक्तसचिव म्हणून कार्यरत आहेत.***

***आणि डॉ. मनीष मिश्रा, हे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या संकल्प या योजनेचे प्रमुख सल्लागार आहेत.***

***ईमेल:***
***juthikapatankar64@gmail.com***
***maneesh.mishra06@gmail.com***

## हे तुम्हाला माहीत आहे का?

एक राष्ट्र एक शिधापत्रिका हा उपक्रम राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम अंतर्गत येणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना, विशेषत: स्थलांतरित लाभार्थ्यांना देशभरातील कोणत्याही शिधावाटप दुकानातून त्यांच्या वाट्याचे संपूर्ण किंवा आंशिक खाद्यान्न सातत्याने मिळवण्याचा अधिकार प्रदान करतो. या उपक्रमांतर्गत बनविण्यात आलेल्या मेरा रेशन या मोबाईल ॲप चा उदरनिर्वाहासाठी नवीन ठिकाणी स्थलांतरीत झालेल्या शिधापत्रिकाधारकांना लाभ घेता येतो. ऑगस्ट २०१९ पासून प्रारंभी ४ राज्यात सुरू करण्यात आलेली ही प्रणाली डिसेंबर २०२० पर्यंत ३२ राज्य/ केंद्रशासित प्रदेशात लागू करण्यात आली असून आगामी काही महिन्यांत उर्वरित राज्यात/ केंद्रशासित प्रदेशातही (आसाम, छत्तीसगड, दिल्ली आणि पश्चिम बंगाल) लागू होण्याची अपेक्षा आहे. सध्या या प्रणालीत राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियमांतर्गत येणारे देशभरातील सुमारे ६९ कोटी लाभार्थी सामील असून एक देश एक शिधापत्रिका उपक्रमांतर्गत वहनक्षम शिधापत्रिका आधारित १.५ - १.६ कोटी व्यवहारांची नोंद झाली आहे.

एक देश एक शिधापत्रिका ही सेवा प्रचंड मूल्यवर्धित सेवा ठरली आहे. कोविड-१९ महामारी च्या प्रादुर्भावादरम्यान स्थलांतरित झालेल्या लाभार्थ्यांना या सेवेचा देशभरातील कोणत्याही ठिकाणावरून लाभ घेता आला. अशा प्रकारे कोणत्याही शिधावाटप दुकानातून शिधा मिळविण्याचे स्वातंत्र्य या पूर्वी अस्तित्वात नव्हते. एप्रिल २०२० ते फेब्रुवारी २०२१ दरम्यान एक देश एक शिधापत्रिका उपक्रमांतर्गत सुमारे १५.४ कोटी वहनक्षम शिधापत्रिका व्यवहारांची नोंद झाली आहे.

एक देश एक शिधापत्रिका ही योजना राष्ट्रव्यापी वहनक्षम शिधापत्रिकांचे क्रियान्वयन करण्यासाठी राष्ट्रीय खाद्यान्न सुरक्षा अधिनियमांतर्गत नेमण्यात आलेल्या सरकारी विभागाद्वारे क्रियान्वित केली जात आहे. ही प्रणाली राष्ट्रीय खाद्यान्न सुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र ठरणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना, विशेषत: उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित झालेल्या लाभार्थ्यांना, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या बायोमेट्रिक / आधार कार्ड प्रमाणित शीधा पत्रिकेच्या आधारे त्यांच्या वाट्याचे संपूर्ण किंवा अंशिक खाद्यान्न देशभरातील कोणत्याही ठिकाणावरून सातत्याने मिळविण्याची अनुमती देते. या योजनेंतर्गत आंशिक शिधा घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या वाट्याचा उर्वरित शीधा त्या लाभार्थ्यांच्या मूळ स्थानी असलेल्या त्यांच्या कुटुंबीयांना प्राप्त करता येतो.

■■■

# संघराज्य व्यवस्थेतील आव्हाने आणि पुढची दिशा

**– समीरा सौरभ**



**भारतासारख्या विविधांगी आणि विशाल देशात संघराज्य व्यवस्थेतील सहा स्तंभांमधला समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. राज्यांची स्वायत्तता, राष्ट्रीय एकात्मता, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण आणि राष्ट्रीयीकरण तसेच प्रादेशिकत्व, असे हे सहा स्तंभ आहेत. आत्यंतिक राजकीय केंद्रीकरण आणि अनागोंदी निर्माण करणारे विकेंद्रीकरण अशी दोन्ही प्रकारची परिस्थिती भारतीय संघराज्य व्यवस्था कमकूवत करु शकते.**

**भा**रतासारख्या विविधांगी आणि विशाल देशात संघराज्य व्यवस्थेतील सहा स्तंभांमधला समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. राज्यांची स्वायत्तता, राष्ट्रीय एकात्मता, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण आणि राष्ट्रीयीकरण तसेच प्रादेशिकत्व असे हे सहा स्तंभ आहेत. आत्यंतिक राजकीय केंद्रीकरण आणि अनागोंदी निर्माण करणारे विकेंद्रीकरण अशी दोन्ही प्रकारची परिस्थिती भारतीय संघराज्य व्यवस्था कमकूवत करु शकते.

हा समतोल योग्य असला तरच, केंद्र सरकारला एका मर्यादेनंतर राज्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करता येणार नाही. मात्र, त्याचवेळी मतभेद निर्माण झाल्यास, राज्यांच्या अधिकारांचे संरक्षण करताना अनेकदा राष्ट्रीय एकात्मतेसाठी धोकादायक ठरु शकते. दोन्ही बाजूनी अशा आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे असते. कारण एकीकडे देशाच्या एकात्मतेसाठी संघराज्य व्यवस्था कायम राहणे आवश्यक आहे, त्याचवेळी प्रादेशिक स्वायत्तता देखील अबाधित राखणे महत्वाचे आहे.

भारतीय संविधानाने आपल्याला एक संघराज्य स्वरूपाची राज्यव्यवस्था निर्माण करुन दिली आहे. सरकार देखील दोन स्तरांवर आहे. एक राष्ट्रीय पातळीवर आणि दुसरे राज्य पातळीवर. तथापि, असे असले तरी भारतीय राज्यघटनेने संरचनात्मक दृष्ट्या केंद्र सरकारला राज्यांपेक्षा अधिक सक्षम केले आहे. त्यामुळेच, आपल्या राज्यव्यवस्थेत- केंद्रीकृत संघराज्य व्यवस्था अशी विरोधाभासी वाटणारी प्रणाली आहे.

संवैधानिक विधीमंडळाविषयी झालेल्या चर्चेत बोलताना देशाचे पाहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले होते, देशात एक कमजोर, दुर्बल केंद्र सरकार असणे देशहिताच्या दृष्टीने धोकादायक ठरु शकते. कारण असे सरकार देशात शांतता अबाधित राखण्यास समर्थ नसेल, सामायिक चिंतांच्या महत्वपूर्ण विषयांवर ते सर्वांशी समन्वय साधू शकणार नाही आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर एकसंध राष्ट्र या नात्याने आपले विचार मांडू शकणार नाही.

या सभेतील इतर मान्यवरांनी देखील भारताच्या हितासाठी आणि राजकीय शाश्वततेसाठी एका भक्कम, मजबूत केंद्र सरकारच्या रचनेला पाठिंबा दिला. भारतातील, धर्म, भाषा, जात आणि सांस्कृतिक विविधता बघता, देशाला एका सूत्रात बांधून ठेवणारे एक केंद्र सरकार आवश्यक होते. मात्र, त्याचवेळी भारताचे संविधान केंद्र सरकारला राज्यांच्या तुलनेत अधिक अधिकार देण्याकडे झुकले आहे, असा निष्कर्ष काढणेही चुकीचे ठरेल. आपल्या संविधानात काही अत्यंत संवेदनशील आणि महत्वपूर्ण अशी संघराज्यत्मक वैशिष्ट्ये आहेत. ऑस्ट्रेलियातील संविधानाचे अभ्यासक के. सी. व्हेरेस यांनी एकदा भारतीय संविधानातील राज्यव्यवस्थेचे वर्णन आभासी-संघराज्य व्यवस्था असे केले होते. भारतीय संघराज्य ही एकात्मक राज्यव्यवस्था असून, संघराज्य ही त्यातली उपव्यवस्था आहे, एकात्मिक व्यवस्था उपस्थानी असलेली संघराज्य पद्धती भारतात नाही. आभासी संघराज्य प्रणालीचे काही स्वत:चे प्रश्न आहेत जसे की, विकेंद्रीकरणाचा अधिक खर्च, ज्याचा व्यावहारिक परिणाम आपल्याला अर्थव्यवस्थांमधील क्षमतांचां पूर्ण वापर न होण्यामध्ये दिसतो. वाढत्या लोकसंख्येतून उद्भवलेले अधिकारक्षेत्राचे मुद्दे, त्याशिवाय, सरकारच्या एका यंत्रणेकडून



दुसऱ्या सरकारमधील यंत्रणांकडे खर्चाची जबाबदारी टाकण्याचा धोकाही निर्माण होतो.

**कोविड-१९ च्या काळातील संघराज्य प्रशासन**

भारतात कोविड-१९ विरुद्धच्या लढ्यात संघराज्य व्यवस्थेचे संतुलन जरा बदलले आहे. या महामारीमुळे केंद्र सरकारला अशा काही क्षेत्रात सुधारणा करण्याची संधी मिळाली आहे जी क्षेत्रे पूर्वीपासून राज्य सरकारच्या अखत्यारीतील मानली जात होती. केंद्र सरकारने या काळात घेतलेले अनेक निर्णय आणि कार्यवाही हेच दर्शवणारी आहे, की काही महत्वाच्या सुधारणा अंमलात आणण्यासाठी केंद्र सरकार संघराज्यीय सत्तेचे नियंत्रण आपल्या हातात घेऊ शकते.

भारतीय संविधानात केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये सत्तेच्या विभाजनाची सविस्तर योजना मांडण्यात आली आहे. मात्र, अर्थातच एकात्मक भावनेला महत्व देण्यात आले आहे. राज्यघटनेनुसार स्थापन झालेल्या वित्त आयोगाने केंद्र आणि राज्य सरकारांमधील महसुलाची विभागणी स्पष्टपणे विशद केली आहे. मात्र, यातही पारंपरिकरित्या केंद्राकडे अधिक महसूल देण्यात आला आहे. मात्र आता काळाच्या ओघात, या दोन्ही सरकारांमधील संबंधांविषयी आखून दिलेल्या रुपरेषेत बदल झाला आहे. उदाहरणार्थ, वस्तू आणि सेवा कर लागू झाल्यानंतर बरीचशी समीकरणे बदलली आहेत.

**भारतीय संविधानाने आपल्याला एक संघराज्य स्वरूपाची राज्यव्यवस्था निर्माण करुन दिली आहे. सरकार देखील दोन स्तरांवर आहे. एक राष्ट्रीय पातळीवर आणि दुसरे राज्य पातळीवर. तथापि,असे असले तरी, भारतीय राज्यघटनेने संरचनात्मक दृष्ट्या केंद्र सरकारला राज्यांपेक्षा अधिक सक्षम केले आहे. त्यामुळेच, आपल्या राज्यव्यवस्थेत- ''केंद्रीकृत संघराज्य व्यवस्था'' अशी विरोधाभासी वाटणारी प्रणाली आहे.**

कधीकधी हे बदल केंद्रातील राजकीय सत्तेच्या अधिकाराच्या दाव्यातून घडतात किंवा कधीकधी बदल गरजेचा आहे, यावर दोन्ही सत्ताकेंद्रांमध्ये व्यापक सहमती होऊन, त्यानुसार, बदल घडू शकतात.

सध्याच्या परिस्थितीत संघराज्य व्यवस्थेसाठीची सर्वात महत्वाची गोष्ट समोर आली आहे, ती म्हणजे, देशातील कोविड-१९ चे संकट दूर करण्यासाठीच्या व्यवस्थापनात प्रत्यक्ष मैदानावर काम करण्यात राज्य सरकारांची भूमिका किती महत्वाची असते, याचा प्रत्यय या निमित्ताने आला. सुरुवातीच्या आव्हानांच्या वेळी, केंद्र सरकारने पुढाकार घेतला तरी नंतर हळूहळू त्यांनी राज्यांना आपल्या आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी, स्थानिक पातळीवर टाळेबंदी, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि महामारीचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजना लागू करणे या सगळ्यांचे अधिकार, स्वायत्तता आणि पुरेशी मोकळीक राज्य सरकारांना दिली. आरोग्य व्यवस्था हा राज्यांच्या अखत्यारीतील विषय असल्याने, त्यांचे केंद्र सरकारसोबत राजकीय संबंध कसेही असोत कोविड काळात, त्यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रात आरोग्य सुविधा आणि प्रशासकीय उपाययोजना केल्यात आणि या सगळ्या राज्यांच्या व्यवस्थांमध्ये मार्गदर्शन व समन्वयकाची भूमिका केंद्र सरकारने पार पाडली. मात्र, केंद्रात असलेल्या राजकीय पक्षाचेच सरकार अनेक राज्यांमध्येही सत्तेत आहे. काही ठिकाणी स्वबळावर किंवा कुठे मित्रपक्षांसोबत सत्तेत असल्याने केंद्र सरकारच्या प्रभावाबाबत प्रादेशिक/राज्य पातळीवरून होणारा विरोध गेल्या वेळेपेक्षा तुलनेने कमी आहे.

कोविड-१९ विरुद्धच्या लढाईतील सुरुवातीच्या काळात, भारतीय संघराज्य व्यवस्थेत केंद्र सरकारला असलेले झुकते माप अधोरेखित झाले. केंद्र सरकारने आपल्या अधिकारांचा वापर करत केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत देशव्यापी टाळेबंदी लागू केली. केंद्रीय गृहमंत्रालयाने महामारी रोखण्यासाठी सर्व राज्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना लागू केल्या होत्या. या कायद्यान्वये केंद्र सरकारला, गरज पडल्यास, राज्ये आणि स्थानिक अधिकाऱ्यांना आदेश देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

राज्य सरकारांना महामारी आजार (प्रतिबंधक) कायदा १८९७ अन्वये या बाबत अधिक विशिष्ट अधिकार असूनही, सर्व राज्यांनी केंद्र सरकारच्या आदेशांचे पालन केले.

राज्य सरकारांनी सुरुवातीच्या टप्प्यात, केंद्राला राष्ट्रीय टाळेबंदीबाबतचे प्रशासकीय आदेश पुढेही सुरु ठेवण्याची विनंती केली होती. असे करतांना, राज्यांनी केंद्र सरकारला निर्णय घेण्याचे अधिकार आणि राजकीय सत्ताही दिली होती.

टाळेबंदीच्या विविध टप्प्यात, राज्यांची स्वायत्तत्ता अबाधित राखली गेली असली तरीही, राज्यांकडे केंद्रापेक्षा कमी अधिकार उरले आहेत. राष्ट्रव्यापी टाळेबंदीदरम्यान अनेक आर्थिक व्यवहार बंद ठेवावे लागले, त्यामुळे राज्य सरकारांच्या महसुलावर देखील त्याचा विपरीत परिणाम झाला. टाळेबंदीच्या आधीही, भारतातील अनेक राज्यांनी एकतर त्यांच्या सकल राज्य उत्पन्नाच्या तुलनेतल्या वित्तीय तुटीची मर्यादा ओलांडली होती किंवा ओलांडण्याच्या जवळपास होते. त्यातच लागू झालेल्या टाळेबंदीमुळे त्यांचे केंद्र सरकारवरचे आर्थिक अवलंबित्व आणखीनच वाढले.

मे २०२० मध्ये भारताच्या वित्तमंत्र्यांनी, टाळेबंदी नंतर अर्थव्यवस्थेचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आर्थिक सुधारणांची एक मालिकाच जाहीर केली.

त्यातीलच एक उपाय म्हणजे राज्यांच्या कर्ज घेण्याच्या मर्यादेत सशर्त शिथिलता देण्यात आली. आधी राज्यांच्या सकल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्के कर्ज घेण्याची परवानगी राज्यांना होती ती आता पाच टक्के करण्यात आली आहे. मात्र यापैकी केवळ ०.५ टक्क्यांची मर्यादावाढ ही विनाअट आहे. त्यापुढे एक टक्यापर्यंतची वाढ, जर हे कर्ज काही निश्चित सुधारणा- जसे की कर्ज शाश्वतता, रोजगार निर्मिती, ऊर्जा क्षेत्रात सुधारणा आणि नागरी विकास अशा सुधारणांशी संलग्न असेल, तरच कर्ज दिले जाणार होते आणि जर या

**भारतात कोविड-१९ विरुद्धच्या लढ्यात संघराज्य व्यवस्थेचे संतुलन जरा बदलले आहे. या महामारीमुळे, केंद्र सरकारला अशा काही क्षेत्रात सुधारणा करण्याची संधी मिळाली आहे जी क्षेत्रे पूर्वीपासून राज्य सरकारच्या अखत्यारीतील मानली जात होती. केंद्र सरकारने या काळात घेतलेले अनेक निर्णय आणि कार्यवाही हेच दर्शवणारी आहे की काही महत्वाच्या सुधारणा अंमलात आणण्यासाठी केंद्र सरकार संघराज्यीय सत्तेचे नियंत्रण आपल्या हातात घेऊ इच्छिते.**

क्षेत्रात, सरकारने काही महत्वाची उपलब्धी मिळवली तरच त्या राज्यांना शेवटचे ०.५ अतितीक्त कर्ज मिळू शकणार होते.

कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा परिणाम कदाचित राज्यांच्या स्वयात्ततेवर पडू शकेल मात्र आज देशाच्या विकास आणि समृद्धीसाठी या सुधारणा आवश्यक आहेत. कृषी हा भारतात राज्यांच्या अखत्यारीतील विषय आहे आणि केंद्र सरकारने सुचविलेल्या अगदी किरकोळ कृषी सुधारणांना देखील अनेकदा राज्य सरकारे विरोध दर्शवतात. सरकारने अलीकडे केलेल्या सुधारणांमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यवस्थेत बदल करण्याची कित्येक वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली. कृषी क्षेत्रात या समित्यांच्या असलेल्या एकाधिकारशाहीमुळे देशात अधिक प्रभावी, पारदर्शक आणि निरोगी कृषी विपणन व्यवस्था उभी राहू शकत नव्हती. केंद्र सरकारने अध्यादेश मंजूर केला आणि त्यामुळे राज्यांचे अधिकार बाजूला पडले, हे खरे असले तरीही, केंद्राला संपूर्ण देशाच्या कल्याणाचा आणि सर्व नागरिकांचा सर्वांगीण विचार करावा लागतो. केवळ एखाद्या राज्याचा विचार करून चालत नाही.

पंजाबसारख्या काही राज्यांनी कृषी क्षेत्रातल्या काही सुधारणांना विरोध दर्शवला असला, तरीही अनेक राज्ये अशी आहेत, ज्यांनी या महत्वपूर्ण सुधारणांना विरोध केलेला नाही. ही दोन्ही उदाहरणे- म्हणजे, कर्ज घेण्याची मर्यादा वाढवणे आणि कृषी सुधारणा या अत्यावश्यक सुधारणा अंमलात आणण्यासाठी केंद्र सरकारने आपल्याकडे असलेल्या अधिकारांचा वापर केला असल्याचे निदर्शनास आले आहे.

या सुधारणा तेव्हाच लागू होऊ शकल्या जेव्हा केंद्रात सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षाचे बहुमताचे सरकार असते. काही आर्थिक सुधारणा, जसे की कृषी कायदे आणि नव्या श्रम सुधारणा, देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या तीन दशकातल्या वर्चस्वाने निर्माण केलेली धोरणे मोडून काढत नव्या व्यवस्था निर्माण करणाऱ्या आहेत. यातून असेही लक्षात येते की भारतातील संघराज्य व्यवस्थेतील सरकारांमधले नाते, संविधानाच्या संघराज्यात्मक चौकटीनुसार नाही, तर सत्तेत असलेल्या राजकीय शक्तींवर आणि त्यांच्या निर्णय-कार्यशैलींवर अवलंबून असते. जर केंद्रात एका पक्षाचे पूर्ण बहुमताचे सरकार असेल, त्या पक्षाचा प्रभाव असेल, तर राज्यांचे महत्व कमी होते आणि जर असे एकपक्षीय सरकार नसेल, तर राज्यांचे महत्व वाढते. महामारीच्या इतर प्रभावांसोबतच, या महामारीमुळे केंद्र-राज्य संबंधांचे एक नवे पर्व देखील समोर आले आहे, हा असा टप्पा आहे ज्यात, राज्यांनी केंद्र सरकारने आणलेल्या अनेक सुधारणा स्वीकारल्या आहेत. जे आधीच्या काळात घडत नसे, ते आता घडतांना दिसते आहे.

जेव्हा संपूर्ण देशासाठी एखादा कायदा किंवा अधिनियमाचा मसुदा तयार केला जातो, त्यावेळी, त्या प्रक्रियेत, राज्य सरकारांसोबतची चर्चा आणि सल्लामसलत मध्यवर्ती ठरते. मात्र, भारतासारख्या इतकी विविधता आणि मतमतांतरे असलेल्या देशात, अनेकदा, असा कायदा तयार करण्यासाठी व्यापक सहमतीचे एक सामाईक व्यासपीठ, ज्यात प्रत्येक राज्याचा सर्व मुद्यांना होकार असेल, तसे निर्माण करणे कठीण होऊन जाते. कारण अनेकदा काही मुद्दे किंवा

समस्या एखाद्या विशिष्ट राज्यापुरत्या मर्यादित असतात, त्यावर राष्ट्रीय स्तरावर सहमती मिळणे शक्य नसते.

उदाहरणार्थ, भारत आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा सदस्य आहे आणि आपण या संघटनेच्या अनेक मूलभूत करारांना मंजुरी दिली आहे. जसे की समान वेतन करार, बालमजुरीची सर्वात वाईट स्वरूपे, बळजबरीने केली जाणारी मजुरी रद्दबातल करणे, कामगारांचे किमान वय आणि इतर जसे की सागरी कामगार करार इत्यादींबाबत आपण सहमती दर्शवली आहे. ही सहमती देणे म्हणजे हे आंतरराष्ट्रीय कायदे आपल्यासाठीही बंधनकारक असल्याचे मान्य करणे असा अर्थ आहे. त्यामुळेच, ही सहमती देण्यापूर्वी, आपल्या केंद्र सरकारला सर्व राज्यांशी सल्लामसलत करावी लागते. कोणत्याही राज्यांचे अथवा राष्ट्रीय स्तरावरील कायदे या आंतरराष्ट्रीय कायद्यांशी विसंगत ठरणार नाहीत, याची खातरजमा करावी लागते, त्यानंतरच आपण ही सहमती देऊ शकतो. यासाठी सर्व राज्य सरकारांसोबतची सल्ला मसलत, अनेकदा कार्यशाळा, परिषदा आणि सर्व हितसंबंधीयांसोबत चर्चासत्रे घेऊन होते. जेव्हा सर्व राज्य सरकारे या प्रस्तावित कायद्याला किंवा एखाद्या सुधारणेविषयी सहमती व्यक्त करतात, त्यानंतरच केंद्र सरकार, अशा मंजुरीसाठीचा प्रस्ताव पुढे पाठवू शकते.

अनेकदा, मर्यादित वेळेत, सर्व राज्य सरकारांकडून एकसमान सहमती मिळवणे अत्यंत आव्हानात्मक ठरते. उदाहरणार्थ, देशातल्या सर्व ३४ राज्यांनी रेरा (बांधकाम नियमन विषयक) नियमांची अधिसूचना लागू केली असली तरी, पश्चिम बंगालने स्वत:चा वेगळा हिरा (HIRA) कायदा लागू केला आहे. मात्र या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

अशा उदाहरणांमध्ये राज्य सरकारांचे राजकीय पक्ष-विचारसारणी देखील केंद्रात सत्तेवर असलेल्या सरकारच्या विरोधी विचारांचे असतील किंवा त्यांचे केंद्र सरकारशी सौहार्दाचे संबंध नसतील तरीही, धोरण निर्मिती प्रक्रियेवर त्याचा प्रभाव पडू शकतो. जेव्हा एखाद्या नव्या कायद्याचा मसुदा तयार करायचा असतो किंवा असलेल्या कायद्यात दुरुस्ती करायची असते, त्यावेळी केंद्र सरकार सर्व राज्यांशी चर्चा करते आणि आजच्या काळात, कायद्याचा कच्चा मसुदा ऑनलाईन किंवा वेबसाईटच्या माध्यमातून पाठवला जाऊ शकतो, ज्यावर इतर लोक तसेच या कायद्याशी संबंधित हितसंबंधी गट देखील तो मसुदा बघू शकतात. उदाहरणार्थ, केंद्र सरकार मॉडेल भाडेपट्टी कायद्याचा मसुदा तयार करत असून त्यात सर्व राज्य सरकारे आणि हितसंबंधी गटांकडून सूचना आणि विचार मागवण्यात आले आहेत.



**जेव्हा संपूर्ण देशासाठी एखादा कायदा किंवा अधिनियमाचा मसुदा तयार केला जातो, त्यावेळी, त्या प्रक्रियेत, राज्य सरकारांसोबतची चर्चा आणि सल्लामसलत मध्यवर्ती ठरते. मात्र, भारतासारख्या इतकी विविधता आणि मतमतांतरे असलेल्या देशात, अनेकदा, असा कायदा तयार करण्यासाठी व्यापक सहमतीचे एक सामाईक व्यासपीठ, ज्यात प्रत्येक राज्याचा सर्व मुद्यांना होकार असेल, तसे निर्माण करणे कठीण होऊन जाते.**

आपण बाजारपेठ आधारित अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर एक नवे युग आले आहे, ज्यात, भारताच्या बाजारपेठ-प्रणित अर्थव्यवस्थेत राज्यांना महत्वाचे स्थान मिळाले आहे. केंद्र सरकार तर १९९० पासून राज्यांना थेट परदेशी बँकांकडून कर्ज घेणे किंवा संस्थांशी थेट परदेशी गुंतवणूक करण्याबाबत प्रोत्साहन देत असते. केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान राज्यांसाठी भांडवल उभे करण्याचा एकमेव स्त्रोत असल्यास, ते पुरेसे नसते. मग अशावेळी राज्ये देखील आपापल्या राज्यात थेट परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी स्पर्धा करु शकतात आणि यात केंद्र सरकार अडथळा ठरत नाही किंबहुना, ही सुविधा मिळण्यात केंद्राची मदत होऊ शकते. कारण अद्यापही केंद्र सरकारची नोडल संस्था - DPIIT उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागामार्फतच थेट परदेशी गुंतवणुकीसाठीची मान्यता मिळते. अनेकदा परदेशी गुंतवणुकीचा प्रस्ताव, काही विशिष्ट व्यापारी नियमांशी संबंधित असेल, तर DPIIT ला तो संबंधित मंत्रालयांकडे परवान्यासाठी (मंजुरीसाठी) पाठवावा लागतो. एखादा

प्रस्ताव सीमाभागाशी किंवा सुरक्षिततेशी संबंधित असेल, तर अशा वेळी इतर नोडल मंत्रालयांच्या सहमतीची देखील गरज लागते.

**राज्यांकडून होणारी समांतर मुत्सद्देगिरी**

परदेशी आर्थिक धोरण हा आता केवळ केंद्र सरकारचा विषय राहिलेला नसून, आता राज्यांकडूनही थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर समांतर मुत्सद्देगिरी केली जाते. आर्थिक जागतिकीकरणामुळे सर्व राज्य आता त्यांच्या राज्यात गुंतवणूक करणाऱ्या संबंधित गुंतवणूकदार देशांसोबत कायद्यानुसार नाही, तरी प्रत्यक्षात बोलू शकतात. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राज्यांमार्फत परदेशात ज्या गोष्टी केल्या जातात त्या याचेच निदर्शक असतात. अशा उपक्रमांचा काही राज्यांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी लाभ झाला असून त्यातून त्यांचे केंद्रावरचे आर्थिक अवलंबित्व कमी झाले आहे. गुजरात सरकारने २०१४ साली, अमेरिका, चीन, जपान या देशांमध्ये आपली स्वतंत्र कार्यालये स्थापन केली, ज्याद्वारे या देशांना व्हायब्रंट गुजरात मध्ये गुंतवणूक करण्याचे आमंत्रण आणि सुविधा देण्यात आल्या. थेट परदेशी गुंतवणूक राज्यात आकर्षित करण्यासाठी, कदाचित अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न असावा.

मात्र, अशा काही उपक्रमांमुळे कधीकधी देशाचे सार्वभौमत्व आणि सुरक्षिततेचा देखील प्रश्न निर्माण होतो. कारण, भारताच्या आजूबाजूला आपले असेही काही शेजारी आहेत, जे भारतविरोधी भूमिका घेतात. आणि त्यामुळेच, या सुरक्षाविषयक प्रश्नांमुळे, आपण जागतिकीकरणात मुक्त व्यापारी धोरणाबाबत किती लवचिक असावे हे देखील आव्हान असते. म्हणूनच, केंद्र सरकारची, अशा ठिकाणी अधिक जबाबदार आणि गुंतागुंतीची भूमिका असते. परदेशी कंपन्यांना परवाने देण्यासाठी, त्यांना या प्रस्तावांचा विविध बाजूंनी विचार करावा लागतो आणि हा विचार केवळ राज्यांना तिजोरीत येणारा व्यवसाय नफा एवढ्यापुरता मर्यादित ठेवून चालत नाही. मात्र, कदाचित हे गुंतागुंतीचे पदर लक्षात घेऊन परवान्यांसाठी केली जाणारी तपासणी/छाननी कदाचित राज्यांना आवडणार नाही आणि केंद्र सरकार या परवानगीसाठी खूप वेळ घेत आहे अथवा राज्य सरकारच्या इच्छेप्रमाणे निर्णय घेत नाही, अशी धारणा निर्माण होऊ शकते.

**भारतीय संविधानात केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये सत्तेच्या विभाजनाची सविस्तर योजना मांडण्यात आली आहे. मात्र, अर्थातच, एकात्मक भावनेला महत्व देण्यात आले आहे. राज्यघटनेनुसार स्थापन झालेल्या वित्त आयोगाने केंद्र आणि राज्य सरकारांमधील महसुलाची विभागणी स्पष्टपणे विशद केली आहे. मात्र, यातही पारंपरिकरित्या केंद्राकडे अधिक महसूल देण्यात आला आहे.**

अनेकदा, राज्य सरकारांनां, केंद्र सरकार आपल्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करत आहे, असे वाटू शकते कारण कधीकधी राज्यांच्या भूमिकेपेक्षाही एखाद्या निर्णयाचा अधिकाधिक किंवा सर्वच नागरिकांना लाभ मिळावा, या व्यापक हेतूने केंद्र सरकारने राज्यांना बाजूला ठेवून निर्णय घेतलेला असतो. राज्यघटनेतील कलम २५६ नुसार, राज्य सरकारांना त्यांच्या कार्यकारी अधिकारांचा वापर करून, देशाच्या संसदेने केलेल्या तसेच राज्यांत लागू असलेल्या इतर कायद्यांचे पालन आणि अंमलबजावणी प्रभावीपणे करणे बंधनकारक असते. जर राज्य सरकार तसे करण्यात अपयशी ठरले, तर केंद्र सरकारचे कार्यकारी अधिकारी राज्य सरकारांना तसे अधिकार देऊ शकतात

जर राज्यांनी केंद्राच्या आदेशांचे पालन करण्यास अथवा केंद्राच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात कुचराई केली किंवा नकार दिला तर अशा स्थितीत राज्यघटनेच्या कलम ३५६ नुसार, संबंधित राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे अधिकार राष्ट्रपतींना असतात. तसेच, कलम ३६५ची दखल देखील घेतली जाऊ शकते. भारतीय संघराज्य पद्धतीची सुव्यवस्थित व्याख्या करणाऱ्या एस आर बोम्मी विरुध्द केंद्र सरकार या खटल्यातील युक्तिवादांमध्ये आपल्याला याचे उदाहरण सापडते.

**निष्कर्ष: भविष्यातील दिशा**

भारतासारख्या विविधांगी आणि विशाल देशात, संघराज्य व्यवस्थेच्या सहा स्तंभांमध्ये ताळमेळ असणे खूप आवश्यक आहे- यात, राज्यांची स्वायत्तता, राष्ट्रीय एकात्मता, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण, राष्ट्रीयीकरण आणि प्रादेशिकतावाद हे ते सहा स्तंभ आहेत. टोकाचे राजकीय केंद्रीकरण किंवा अनागोंदी राजकीय विकेंद्रीकरण दोन्ही धोकादायक ठरुन संघराज्य व्यवस्था कमकुवत करू शकते. दोन्हीमध्ये योग्य तो समतोल राखला तर, केंद्र सरकारला राज्यांची स्वायत्तता एका मर्यादेनंतर दाबता येणार नाही. तसेच राज्यांची स्वायत्तता कायम ठेवत असतांना राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होणार नाही, याचीही काळजी घेतली जाईल. ही दोन्ही टोके समतोल सांभाळत नियंत्रणात ठेवणे एक आव्हानच आहे. संघराज्य व्यवस्थेत एका बाजूला राष्ट्रीय एकात्मता जपावी लागते तर दुसऱ्या बाजूला प्रादेशिक स्वायत्तता सांभाळावी लागते.

■■■

***लेखिका, केंद्र सरकारमध्ये संचालक या पदावर कार्यरत असून, त्यांनी परराष्ट्र व्यवहार विभागात धोरणनिर्मिती तसेच अंमलबजावणी, आंतरराष्ट्रीय कामगार कायदे, आंतरराष्ट्रीय श्रम दर्जा, जी-२०, ब्रिक्स, ग्रामीण विकास आणि वाणिज्य या विभागात विविध पदांवर काम केले आहे.***

*ईमेल : sameera.saurabh@gmail.com*

# पर्यटन आणि महाराष्ट्र - एक अजब रसायन

– डॉ. धनंजय सावळकर



**महाराष्ट्राच्या प्रत्येक भौगोलिक विभागाचे खास पर्यटन वैशिष्ट्य आहे. कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ हा प्रत्येक विभाग पर्यटनासाठी काहीतरी वेगळे देतो. उदाहरणार्थ कोकण हे समुद्रकिनाऱ्यांसाठी प्रसिद्ध असले तरी कोकणातील खाड्या, तेथील दुर्मिळ शेती उत्पादने जसे की आंबा, काजू, नारळ, चिकू, खास मसाले इत्यादी नैसर्गिक वरदानही कोकणाला लाभले आहे. याशिवाय सर्वाधिक किल्ले याच प्रांतात पाहायला मिळतात कित्येक प्राचीन मंदिरे, मोठे धबधबे, उंच कडेकपारी आणि त्यावरून दिसणारे सृष्टीसौंदर्य हे आपल्याला स्तिमित करते.**

महाराष्ट्राच्या भौगोलिक वैविध्यामुळे, समृद्ध इतिहासामुळे आणि परंपरांच्या अकल्पित ठेव्यामुळे, त्याचे पर्यटन सामर्थ्य विशाल आहे. महाराष्ट्र ३,७०,००० चौरस किमी. इतक्या मोठ्या क्षेत्रफळाचा असून क्षेत्रफळाच्या बाबतीत देशात पहिले, लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे राज्य आहे. मात्र हे आकडे हिमनगाच्या टोकासारखे वाटावेत इतके पर्यटन वैविध्य महाराष्ट्राच्या भूमीत आहे. नावाप्रमाणेच महाराष्ट्र भारतात दडलेला एक देशच असावा इतका पर्यटन-परिपूर्ण आहे. बर्फ आणि वाळवंट सोडून सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी अनुकूल स्थळे महाराष्ट्रात जागोजागी पाहायला मिळतात.

अगदी प्राचीन काळात भारतात प्राचीन स्थापत्यकलेचे उत्तम दर्शन घडवणाऱ्या गुंफा निर्माण झाल्या. या एकूण १२०० गुंफांपैकी ८०० गुंफा एकट्या महाराष्ट्रात आहेत. या गुफा बौद्ध, जैन, हिंदू अशा तीनही परंपरांचे प्रतिनिधित्व करतात त्यामुळे प्राचीन काळात हे तीनही धर्म येथे गुण्यागोविंदाने नांदत असल्याचे स्पष्ट होते. पुढे मध्ययुगात भक्ती परंपरा महाराष्ट्रातील संतांनी मोठ्या उंचीवर नेऊन ठेवली. मराठवाड्यात, पश्चिम महाराष्ट्रात तसेच कोकणात या परंपरेची प्रतीके आजही पाहायला मिळतात. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्राला वीरांची भूमी म्हणून ओळखले जाऊ लागले. पेशव्यांसोबत, शिंदे, होळकर यांनी एकत्र येऊन अफगाणिस्तानातल्या अटकेपर्यंत मराठ्यांचे साम्राज्य पसरवले. आज त्या सुवर्णकाळाची साक्ष देणारे किल्ले, सरदारांचे वाडे, शहरांच्या तटबंद्या या सगळ्यांचे अस्तित्व महाराष्ट्रात आहे. ब्रिटिश काळात दोन महत्त्वाच्या बंदरांपैकी एक कोलकाता आणि दुसरे आत्ताची आर्थिक राजधानी मुंबई होते. त्याच काळातील वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा क्रांतिकारक विचारवंत नेत्यांची मोठी फळी महाराष्ट्रात होती. या नेत्यांची स्मारके, जन्मगावे त्यांच्या कर्तृत्वाच्या आठवणी सांगतात. स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेले अमर्याद कला-साहित्यामुळे महाराष्ट्र हा आधुनिक भारतातील वाङ्मयाचा कधीही न आटणारा झरा बनला यात शंका नाही.

महाराष्ट्राच्या प्रत्येक भौगोलिक विभागाचे खास पर्यटन वैशिष्ट्य आहे. कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ हा प्रत्येक विभाग पर्यटनासाठी काहीतरी वेगळे देतो. उदाहरणार्थ कोकण हे समुद्रकिनाऱ्यांसाठी प्रसिद्ध असले तरी कोकणातील खाड्या, तेथील दुर्मिळ शेती उत्पादने जसे की आंबा, काजू, नारळ, चिकू, खास मसाले इत्यादी नैसर्गिक वरदानही कोकणाला लाभले आहे. याशिवाय सर्वाधिक किल्ले याच प्रांतात पाहायला मिळतात कित्येक प्राचीन मंदिरे, मोठे धबधबे, उंच कडेकपारी आणि त्यावरून दिसणारे सृष्टीसौंदर्य हे आपल्याला स्तिमित करते. केरळपेक्षा आकाराने लहान असलेले कोकण इतके पर्यटनवैविध्य देऊ शकते. कोस्टल रोड (सागरी किनारा मार्ग), सिंधुदुर्ग-रत्नागिरीतील विमानतळे, मुंबई-गोवा मार्गाचे रुंदीकरण आणि जलमार्गाचा विकास झाल्यानंतर कोकण पर्यटन निश्चित विकसित होईल.

महाराष्ट्राने नुकतेच कृषी पर्यटन धोरण जाहीर केले आहे. बदलापूरला श्री. चंद्रशेखर भडसावळे यांच्या प्रयत्नांतून सुरु झालेली कृषी पर्यटनाची चळवळ आज मोठी झाली आहे. आज महाराष्ट्रात ७०० पेक्षा अधिक कृषी पर्यटन केंद्रे आहेत. या नवीन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन, त्यांचे प्रशिक्षण इत्यादींमधून हे क्षेत्र विकसित होऊ शकते. त्या-त्या प्रांतातील खास कृषी उत्पादने पर्यटकांना आकर्षित करू शकतात. पश्चिम महाराष्ट्रातील डाळिंब, ऊस, पेरू; नाशिकची द्राक्षे; नागपुरातील संत्री; मराठवाड्यातील बोरे अशी बागायती आणि धान्योत्पादने; त्यापासून बनलेले पदार्थ हे त्या ठिकाणी जाऊन खाण्याचा आनंद पर्यटक घेऊ शकतील. शिवाय कोरोना

नंतरच्या पर्यटनाचे बदललेले स्वरूप पाहता आपण कमी गर्दीची, कमी खर्चाची, ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणारी आणि कमी अंतरावरची कृषी पर्यटन केंद्रे विकसित होताना नजीकच्या काळात पाहू शकतो.

महाराष्ट्र राज्य शहरी पर्यटनाच्या बाबतीत आघाडीवर आहे. ३२ अम्युझमेंट पार्क्स (मनोरंजन उद्याने), ३० इन्डोर अम्युजमेंट पार्क्स, कित्येक वॉटर पार्क्स महाराष्ट्रात आहेत. गोरेगावच्या फिल्मसिटीमध्ये आपल्याला चंदेरी दुनियेची सफर करण्याची संधी मिळते. चित्रीकरण पाहणे, कलाकारांना भेटणे असे अनेक पर्यटन उपक्रम या ठिकाणी राबवता येऊ शकतात.

साहसी पर्यटनाच्या बाबतीतही महाराष्ट्र आघाडीवर आहे. सह्याद्रीत गिर्यारोहण तर केले जातेच पण शिवाय हवा, पाणी आणि जमीन अशा तीनही ठिकाणचे साहसी खेळ आपल्या महाराष्ट्रात आहेत. सिंधुदुर्गात स्कुबा डायविंग, कामशेत व पाचगणीत पॅराग्लायडिंग, कोलाडला रिव्हर राफ्टिंग असे दर्जेदार आणि सुरक्षित साहसी खेळ महाराष्ट्राच्या पर्यटनाची शोभा वाढवतात. याच धर्तीवर अन्य खेळ यात समाविष्ट होतील आणि हे क्षेत्र निश्चित विकसित होईल.

मध्ययुगीन संत परंपरा आणि तीर्थक्षेत्रांच्या मांदियाळीमुळे महाराष्ट्रात धार्मिक पर्यटनाला मोठा वाव आहे. ५ ज्योतिर्लिंग, १२ अष्टविनायक, ३.५ शक्तिपीठे शिवाय अक्कलकोटला स्वामी समर्थ, शिर्डीला साईबाबा, शेगावला गजानन महाराज, ज्ञानेश्वरांची आळंदी, तुकारामांचे देहू, एकनाथांचे पैठण असे संत-महात्म्यांच्या कर्मभूमींचे दर्शन संपूर्ण महाराष्ट्रात घडू शकते. त्यांची जन्मगावे, त्यांची समाधीस्थळे आपल्याला त्यांची आठवण करून दिल्याशिवाय राहत नाहीत. याव्यतिरिक्त कोकणातील भराडीदेवी, अमरावतीची अंबादेवी, साताऱ्याची काळूबाई यांची प्राचीन मंदिरे, नांदेडमधील ओट्टल येथील मंदिर, अमरावतीजवळ लासूर येथील मंदिर, कोल्हापूरजवळील खिद्रापूरचे मंदिर, सिन्नरचे गोंदेश्वराचे मंदिर, फलटणमधील जबरेश्वराचे मंदिर ही १००० वर्षे जुनी असलेली मंदिरे उत्कृष्ट वास्तुकलेचे दर्शन घडवणारी आहेत.

महाराष्ट्र निसर्गसौंदर्याने समृद्ध आहे. निसर्गाचा वरदहस्त आणि समतोल हवामानामुळे येथील वनसंपदा बहारदार झाली आहे. महाराष्ट्रात



**महाराष्ट्राच्या भौगोलिक वैविध्यामुळे, समृद्ध इतिहासामुळे आणि परंपरांच्या अकल्पित ठेव्यामुळे, त्याचे पर्यटन सामर्थ्य विशाल आहे. महाराष्ट्र ३,७०,००० चौरस किमी इतक्या मोठ्या क्षेत्रफळाचा असून क्षेत्रफळाच्या बाबतीत देशात पहिला, लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे राज्य आहे. मात्र हे आकडे हिमनगाच्या टोकासारखे वाटावेत इतके पर्यटन वैविध्य महाराष्ट्राच्या भूमीत आहे.**

५० वन्यजीव अभयारण्ये, ६ राष्ट्रीय उद्याने, अनेक कॉंजर्वेशन रिझर्व्ह आणि कांदळवने देखील आहेत. विदर्भातील जगप्रसिद्ध ताडोबा, नागझिरा, मेळघाट, टिपेश्वर या प्रकल्पांव्यतिरिक्त खास वैशिष्ट्य असलेली अभयारण्ये जसे की रानटी गवे असलेले राधानगरी, काळवीटांची मोठी वस्ती असलेले रेहेकुरी, शेकरूचे घर असलेले भीमाशंकर, मोरांची वसाहत असलेले मोराची चिंचोली अशी एकमेवाद्वितीय अभयारण्ये संपूर्ण महाराष्ट्रात आहेत. बऱ्याचदा अभयअरण्यांना लागून किल्ले असतात. त्यामुळे तिथे निसर्ग, साहस आणि इतिहास अशा तिन्ही गोष्टींचा एकत्रित अनुभव घेता येतो.

महाराष्ट्रात एकूण ४५० किल्ले आहेत. त्यात जलदुर्ग म्हणजे पाण्याच्या मधोमध बांधलेले किल्ले हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य आहे. येथे समुद्रात बांधलेले सिंधुदुर्ग, मुरुड-जंजिरा, कुलाबा, विजयदुर्ग असे ८-१० जलकोट आहेत की जे संपूर्ण भारतात कोठेही पाहावयास मिळत नाहीत. रायगड, तोरणा, राजगड, पन्हाळा असे गिरिदुर्ग म्हणजे डोंगरावरील किल्ले स्थापत्याचे उत्कृष्ट नमुने आहेत. मालेगाव, सोलापूर, अहमदनगर येथे भुईकोट म्हणजे सपाट जमिनीवरील किल्ले पाहायला मिळतात.

महाराष्ट्रात सरदार-वतनदारांची मोठी परंपरा होती. यातून विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात अनेक संस्थाने निर्माण झाली. भोर, फलटण, मिरज, सातारा, कोल्हापूर येथे संस्थानिकांचे राजवाडे, गढ्या आहेत. अनेक संस्थानांचे साहित्य जसे की शस्त्रे, चित्रे, दस्तऐवज, इतर वस्तू यांचे जतन व्हावे म्हणून त्यांचे संग्रहालयात रूपांतर करता येऊ शकते. संस्थानाच्या वारसांची सहमती घेऊन या वास्तूंचे वाणिज्यीकरण करता येऊ शकते. अन्यत्र यशस्वी झालेले हे प्रयोग महाराष्ट्रात राबवता येऊ शकतात.

ऐतिहासिक, धार्मिक, साहसी, नैसर्गिक, सांस्कृतिक, खाद्यपर्यटन अशा अनेक प्रकारच्या पर्यटनाला महाराष्ट्रात भरपूर वाव आहे. ''केल्याने देशाटन... मनुजा चातुर्य येतसे फार'' असे म्हणतात. प्रत्येक प्रवास हा एक स्वतंत्र शोध असतो. हा शोध सुरक्षित आणि समृद्ध व्हावा असे महाराष्ट्र पर्यटनाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट नक्कीच साध्य होईल आणि महाराष्ट्राच्या पर्यटन वैभवात भर पडेल याची खात्री बाळगूया.

■■■

***लेखक महाराष्ट्र राज्य पर्यटन संचानलयानाध्ये संचालक या पदावर कार्यरत आहेत.***

***ईमेल : jdtourism05@gmail.com***

# स्वांतत्र्योत्तर भारताची मानवी निर्देशांकातील प्रगती

– नरेश गुप्ता



**मानवी विकास अहवाल आणि मानवी विकासाच्या मापनावरील दृष्टिकोनाची सुरुवात मानवी विकास अहवालाच्या वार्षिक मालिकेच्या सुरूवातीस झाली. यूएनडीपीचा पहिला मानव विकास अहवाल १९९० मध्ये प्रकाशित करण्यात आला.**

दारिद्र्य निर्मूलन हे भारतातील विकासाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. निकृष्ट दर्जाचे जीवन, साधनांचा अभाव, कुपोषण, अशिक्षितपणा आणि मानवी संसाधनांचा अभाव ही गरीबीशी संबंधित वैशिष्ट्ये आहेत. १९५० आणि १९६०च्या दशकात, भौतिक पायाभूत सुविधांमधील मोठ्या गुंतवणूकीला विकासाचे प्राथमिक साधन म्हणून पाहिले गेले. खरे तर, १९६० च्या दशकाच्या मध्यापर्यंत, जगभरातील विकास धोरणांचा मुख्य जोर विकास प्रक्रियेला गती देणे हा होता आणि विकासाची फळे समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचणे गरजेचे होते.

**मानवी विकास संकल्पना :**

१९९० मध्ये समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक दृष्टीकोनातून मानव विकास संकल्पना विकसित झाली.

या संकल्पनेत क्षमतांचा विस्तार, निवडींचे स्वातंत्र्य, स्वातंत्र्य वर्धित करणे आणि मानवी हक्कांची पूर्तता करण्यासाठी ''मानवी विकास'' हा शब्द मान्य केला आहे.

मानवी विकास अहवाल आणि मानवी विकासाच्या मापनावरील दृष्टिकोनाची सुरुवात मानवी विकास अहवालाच्या वार्षिक मालिकेच्या सुरूवातीस झाली. यूएनडीपीचा पहिला मानव विकास अहवाल १९९० मध्ये प्रकाशित करण्यात आला.

तरीही मानवी विकास निर्देशांकात विकासात वंचितपणा किंवा विकासाचे वाटप आणि असमानता याचे प्रतिबिंब दिसत नाही.

१९९५ मध्ये प्रथमच लिंग असमानतेसाठी समग्र निर्देशांक तयार केले गेल्याने त्याची दखल घेतली गेली. दुसरे म्हणजे १९९७ मध्ये गरीबीच्या बहुआयामीपणाचे मोजमाप करण्यासाठी एक संयुक्त निर्देशांकात प्रस्तावित आणि तयार केला गेला. तिसऱ्यांदा, या संयुक्त निर्देशांक प्रदेश, प्रांत, लिंग, वंश, वांशिक गट आणि ग्रामीण-शहरी विभाजन अशी गटवारी केली गेली. १९९५ मध्ये लैंगिक विकास निर्देशांक (जीडीआय) आणि लिंग सशक्तीकरण उपाय योजना सूचविण्यात आल्या. मानवी निर्देशांकाप्रमाणेच लैंगिक विकास निर्देशाक मोजण्यात येतो. मात्र, यात स्त्री आणि पुरूषांमधील असमानतेच्या मुद्याचा विचार करण्यात येतो. महिला आर्थिक आणि राजकीय जीवनात सक्रियपणे भाग घेण्यास सक्षम आहेत की नाही हे देखिल पाहिले जाते.

यात सहभागावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. राजकीय आणि आर्थिक प्रक्रियेत लैगिंग असमानता आणि निर्णय घेण्याची क्षमता यावर लक्ष देण्यात आले आहे.

१९९७ मध्ये गरीबी निर्मूलनासाठी बहुआयामी असा मानव गरीबी निर्देशांक सादर करण्यात आला. २०१० पासून मानवी विकास निर्देशांक मोजणीच्या कार्यपद्धतीत बदल झाला आहे. कमीतकमी व जास्तीत जास्त मूल्यांमध्ये बदल केले आहेत. निर्देशकांसाठी किमान आणि कमाल पातळ्या सध्या खालीलप्रमाणे तयार करण्यात आल्या आहेत.

आयुर्मान: किमान २०वर्षे निश्चित केले आहे तर जास्तीत जास्त ८५ वर्षे निश्चित केले आहे.

शिक्षणासाठी किमान मूल्य शून्य निश्चित करण्यात आले आहे.

सरासरी वर्षे आणि अपेक्षित शालेय शिक्षणासाठी जास्तीत जास्त मूल्ये अनुक्रमे

१५ आणि १८ वर्षे निश्चित केली.

राष्ट्रीय दरडोई उत्पन्न किमान मूल्य १०० डॉलर आणि कमाल मूल्य ७५०० डॉलर निश्चित करण्यात आले आहे.

**मानवी विकास निर्देशाकांत भारताचे स्थान**

२०२० मधील मानवी विकास निर्देशांकानुसार १८९ देशांच्या यादीत भारत १३१ व्या स्थानी आहे.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम या संस्थेने १९९० ते २०१९ पर्यंत भारतातील मानवी निर्देशांकाची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. या आकडेवारीनुसार भारताने १९९० पासून मानवी विकास निर्देशाकांत ०.४२९ ते ०.६४५ अशी प्रगती केली आहे. ही वाढ सुमारे ५० टक्के आहे. याच काळात, भारतात जन्मलेल्या व्यक्तीचे आयुर्मान अंदाजे १२ वर्षांनी वाढले, तर शालेय शिक्षणाच्या सरासरी वर्षांमध्ये ३.५ वर्षांची वाढ झाली आहे. या काळात, शैक्षणिक वर्षाची अपेक्षित वर्षे देखील ४.५ वर्षांने वाढली आहेत.

शिवाय, या कालावधीत भारतातील दरडोई उत्पन्नातही सुमारे २४४ टक्क्यांनी वाढ झाली. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमात दक्षिण आशियातील देशाची आणि भारताच्या मानवी विकास निर्देशाकांचीही तुलना करण्यात आली आहे. विशेषत: पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्याशी! मानवी विकास निर्देशांकात भारत १३१व्या स्थानी असून तर बांगलादेश १३३व्या स्थानी आहे तर पाकिस्तान १५४व्या स्थानी आहे. दक्षिण आशियाई देशांचा सरासरी मानवी विकास निर्देशांक ०.६४१ आहे तर भारताचा मानवी निर्देशांक या सरासरीपेक्षाही जास्त आहे.

२०१७च्या संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या मानव विकास अहवालात, यूएनडीपी इंडियाचे भारतातील संचालक फ्रान्सिन पिकअप यांनी मानवी विकास निर्देशाकांत भारताने केलेल्या स्थिर प्रगतीमुळे मानवी विकास निर्देशांक वाढत असल्याचे म्हंटले आहे. केंद्र सरकार नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध आहे. बेटी बचाओ बेटी पढाओ, स्वच्छ भारत,




मेक इन इंडिया यासारख्या भारताच्या राष्ट्रीय विकास योजनांचे यश आणि शालेय शिक्षण आणि आरोग्य सेवा सार्वत्रिकरण करण्याच्या उद्देशाने केले गेलेले उपक्रम मानवी विकासाच्या वाढीला गती देतील. पंतप्रधानांच्या 'सबका साथ, सबका विश्वास' या तत्वानुसार शाश्वत विकासात कोणीही अविकसित राहणार नाही.

**सहस्राब्दी विकासाचे ध्येय**

सप्टेंबर २००० मध्ये, न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात संयुक्त राष्ट्रसंघ सहस्राब्दी घोषणापत्र स्वीकारण्यासाठी १४९ जागतिक नेते एकत्र आले. सप्टेंबर २००० मध्ये संयुक्त राष्ट्राच्या १८९ सदस्य देशांनी २०१५ पर्यंत सहस्राब्दी विकासाचे ध्येय साध्य करण्याचे मान्य केले आहे. ८ ध्येय, १८ लक्ष्य आणि ४८ कामगिरी निर्देशकांवर आधारित हे ध्येय साध्य करण्याचे ठरले.

**सहस्राब्दी विकासाचे ध्येय खालील प्रमाणे आहे.**

- गरीबी आणि भूकबळी थोपवणे.
- सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण.
- महिला सशक्तीकरण आणि लैंगिक समानतेस प्रोत्साहन देणे.
- बालमृत्यू दर कमी करणे.
- गरोदर महिलांच्या आरोग्याला चालना देणे.
- मलेरिया, एचआयव्ही / एड्स आणि इतर रोगांशी लढणे.
- शाश्वत पर्यावरण विकासासाला प्रोत्साहन देणे.
- विकासासाठी जागतिक भागीदारी विकसित करणे.

शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी, जागतिक स्तरावर गरीबी निर्मूलनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे तसेच पृथ्वीचे रक्षण केल्यास जगातील सर्व लोकांना आनंद आणि समृद्धी मिळेल.

शाश्वत विकासासाठी १७ ध्येय निश्चित करण्यात आले आहेत.

**ध्येय १.** सर्व प्रकारच्या गरिबीचा नाश करणे

**ध्येय २.** भूकबळी नष्ट करणे. सर्वांसाठी अन्न सुरक्षा आणि पोषणयुक्त आहार आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन

**ध्येय ३.** सर्वांसाठी चांगले आरोग्य आणि संपन्न, सुखी जीवन

**ध्येय ४.** सर्वसमावेश गुणवत्तापर्ण शिक्षण आणि सर्वांसाठी आयुष्यभर शिक्षणाची संधी.

**ध्येय ५.** लैंगिक समानता आणि सर्व महिला आणि मुलींचे सक्षमीकरण

**ध्येय ६.** सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता उपलब्ध व्हावी यासाठी शाश्वत व्यवस्थापन

**ध्येय ७.** सर्वांसाठी परवडणारी, विश्वासार्ह आणि आधुनिक उर्जा

**ध्येय ८.** सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक विकास, उत्पादक रोजगार निर्मिती

**ध्येय ९.** चिरकाल टिकणारी पायाभूत सुविधा निर्मिती, सर्वसमावेशक औद्योगिकीकरण आणि नवकल्पनालेला प्रोत्साहन

**ध्येय १०.** देशांमधील आणि देशांतर्गत असमानता दूर करणे

**ध्येय ११.** शहरे आणि मानवी वस्ती सर्वसमावेशक, सुरक्षित आणि टिकाऊ बनवणे

**ध्येय १२.** शाश्वत उपभोग आणि उत्पादनाची खात्री

**ध्येय १३.** जागतिक हवामान बदलांच्या परिणामाचा प्रतिकार करण्यासाठी त्वरित उपाययोजना

**ध्येय १४.** शाश्वत विकासासाठी समुद्र आणि सागरी संसाधनांचे जतन आणि शाश्वत वापर

**ध्येय १५.** परिसंस्थेच्या शाश्वत वापराचे संरक्षण, पुनर्संचयन आणि प्रोत्साहन, जंगलांचे शाश्वत व्यवस्थापन, जैवविविधतेचे संरक्षण तसेच जमिनीचे संरक्षण करणे

**ध्येय १६.** शाश्वत आणि सर्वसमावेशक संस्थांना शाश्वत विकासासाठी प्रोत्साहन देऊन, सर्वांना न्याय मिळावा आणि सर्व स्तरांवर प्रभावी, जबाबदार व समावेशक संस्था तयार करणे.

**ध्येय १७.** अंमलबजावणीची साधने बळकट करणे आणि शाश्वत विकासासाठी जागतिक भागीदारीचे पुनरुज्जीवन करणे.

**भारतातील महत्त्वपूर्ण कार्यक्रम उपक्रम / योजना.**

**ध्येय १ :** अति गरीबी आणि भूक दूर करणे.

- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना (मनरेगा).
- प्रधान मंत्री आवास योजना - ग्रामीण
- दीन दयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन (DAY- NRLM).
- प्रधान मंत्री ग्राम सडक योजना.
- जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी नूतनीकरण अभियान.
- दीन दयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय शहरी आजीविका मिशन (DAY - NULM).
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान.
- एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस).
- राष्ट्रीय आरोग्य अभियान.

**ध्येय २ : जागतिक प्राथमिक शिक्षण.**

- सर्व शिक्षा अभियान.
- मध्यान्ह भोजन योजना.
- आयसिडीएस अंतर्गत बालपनातील काळजी आणि शिक्षण.

**ध्येय ३ : लिंग समानता आणि सामर्थ्यवान महिला प्रचार.**

- सर्व शिक्षा अभियान.
- बेटी बचाओ बेटी पढाओ.
- कस्तूरबा गांधी बालिका विद्यालय योजना.
- मुलींना माध्यमिक शिक्षणासाठी प्रोत्साहन.
- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान.
- राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान आणि महिला साठी कार्यक्रम.
- साक्षर भारत.
- किशोरशक्ती योजना आणि किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना - सबला
- प्रशिक्षण आणि सबलीकरण कार्यक्रमास समर्थन.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा.

**ध्येय ४ : बाल मृत्यू कमी करणे.**

- राष्ट्रीय आरोग्य अभियान.
- एकात्मिक बाल विकास योजना (आयसीडीएस).
- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम.

**ध्येय ५ : भौतिक आरोग्यात सुधारणा करणे.**

- राष्ट्रीय आरोग्य अभियान.
- एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस).
- इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना.
- प्रधान मंत्री मातृत्व सुरक्षा योजना.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

**ध्येय ६ : एचआयव्ही / एड्स, मलेरिया आणि इतर रोग**

- राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम.
- लक्ष्य ८: २०१५ पर्यंत साथीचे आजार दिसून येत नव्हते. नंतर मात्र मलेरिया आणि इतर मोठ्या आजारांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे.
- राष्ट्रीय वेक्टर-जनित रोग नियंत्रण कार्यक्रम.
- शहरी वेक्टर-जनित रोग नियंत्रण कार्यक्रम.
- सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम.

**ध्येय ७ :** शुद्ध पर्यावरणाची शाश्वतता.

- राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम.
- हरित भारतासाठी राष्ट्रीय चळवळ.
- राष्ट्रीय सीएफसी उपभोग फेज-आउट योजना.
- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम.
- स्वच्छ भारत अभियान.
- अटल मिशन फॉर रीजुव्हिनेशन आणि शहरी ट्रान्सफॉर्मेशन (एएमआरयूटी).
- प्रधान मंत्री आवास योजना.

**ध्येय ८ : विकासासाठी जागतिक भागीदारी विकसित करणे.**

**लक्ष्य १८ :** खासगी क्षेत्राच्या सहकार्याने नवीन तंत्रज्ञानाचा लाभ उपलब्ध करुन देणे. विशेषत: माहिती व संप्रेषण.

४७. प्रत्येक १०० लोकसंख्येमध्ये टेलिफोन लाइन आणि सेल्युलर ग्राहक.

४८ अ. प्रत्येक १०० लोकसंखेमागे इंटरनेट सदस्य.

४८ ब. १०० लोकसंख्येमागे वैयक्तिक संगणक.

- राष्ट्रीय ज्ञान आंतरजाल.
- राष्ट्रीय ई-शासन योजना.
- राज्य अनुसार एरिया नेटवर्क.
- डिजिटल इंडिया प्रोग्राम.
- मूलभूत आवशक्ताचा निर्देशांक.

२०१२ च्या तुलनेत २०१८ मध्ये घर, पाणी, स्वच्छता, वीज आणि स्वच्छ स्वयंपकासाठी इंधन यासारख्या 'गरजा' ची उपलब्धता देशातील सर्व राज्यांत सुधारली आहे.

२८.०१.२०२१आर्थिक सर्वेक्षण चा एक भाग. पेयजल, स्वच्छता, स्वच्छता आणि गृहनिर्माण परिस्थिती या दोन एनएसओ (जवळपास ६९ आणि ७६) मधील डेटाचा वापर करुन ग्रामीण, शहरी आणि अखिल भारतीय स्तरासाठी बीएनआय विकसित केली गेली आहे. निर्देशांक पाच परिमाणांवर २६ निर्देशकांचा सारांश देते - पाणी, स्वच्छता, गृहनिर्माण, सूक्ष्म पर्यावरण आणि इतर सुविधा (स्वयंपाकघरातील प्रवेश, निवास युनिटचे वायुवीजन, स्नानगृह, वीज आणि इंधन प्रकार इत्यादी सारख्या संकेतकांचा वापर करून या सर्वेक्षणात असे म्हटले आहे की फक्त आवश्यक वस्तू मध्ये सुधारणा केल्यामुळे आरोग्य निर्देशकांमध्ये सुधारणा झाली आणि भविष्यात शैक्षणिक निर्देशांकात सुधारणा घडल्या.

■■■

***लेखक सेवानिवृत्त सनदी अधिकारी आहेत. भारतातील मानवी विकास या विषयावरील पुस्तक अलीकडेच प्रकाशित झाले.***
***ईमेल :* gupta_naresh_06@yahoo.co.in**

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

(मुखपृष्ठ २ वरुन)

**वस्तू व सेवा कराचा प्रवास -**


मार्च २०२१ मध्ये वस्तू व सेवा कर महसुलाच्या ढोबळ संकलनातून १, २३,९०२ कोटी रुपये इतका विक्रमी कर गोळा झाला. यामध्ये २२,९७३ कोटी रुपये केंद्रीय कर, २९,३२९ कोटी रुपये राज्य कर व ६२ हजार ८४२ कोटी रुपये एकीकृत वस्तू व सेवा कराचा (IGST) समावेश होता (आयातीत वस्तू व सेवांवर आकारलेला ३१,०९७ कोटी रुपये कर व ८,७५७ कोटी रुपये उपकरासह).

वस्तू व सेवा कराच्या नियमित विभागणी प्रणालीच्या आधारे सरकारने एकिकृत वस्तू व सेवा कराची रक्कम विभागून दिली. त्यापैकी २१,८७९ कोटी रुपयांची रक्कम केंद्रीय कर रूपाने व १७,२३० कोटी रुपये रज्यिय कर रूपाने विभागली गेली. त्या व्यतिरिक्त सरकारने २८,००० कोटी रुपयांची एकिकृत वस्तू व सेवा कराची रक्कम ५० - ५० टक्के प्रमाणात केंद्र सरकारला व राज्य सरकार ला / केंद्रशासित प्रदेशांना विभागून दिली. या नियमित व मोघम विभागणी अंती मार्च २०२१ दरम्यान केंद्र व राज्य सरकारांचे कर महसूल उत्पन्न अनुक्रमे ५८,८५२ कोटी रुपये व ६०,५५९ कोटी रुपये इतके होते. मार्च २०२१ दरम्यान केंद्र सरकारने राज्यांना भरपाई रूपाने ३०,००० कोटी रुपये देखील प्रदान केले.

मार्च २०२१ दरम्यान संकलित झालेला वस्तू व सेवा कर महसूल जीएसटी लागू झाल्यापासून संकलित झालेला सर्वाधिक महसूल होता. वस्तू व सेवा कर महसुलाचा गेल्या पाच महिन्यातील चढता कल पाहता मार्च, २०२१ दरम्यान संकलित झालेला कर गेल्या वर्षी याच महिन्यात संकलित झालेल्या करापेक्षा २७ टक्के अधिक होता. या महिन्यात आयातीत मालावर आकारलेल्या कराचे संकलन ७० टक्के अधिक, तर देशांतर्गत व्यवहारांवर आकारलेल्या कराचे संकलन गेल्या वर्षी याच महिन्यात झालेल्या संकलनापेक्षा १७ टक्के अधिक होते. वस्तू व सेवा कर महसूल उत्पन्नाची चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या तिमाहीतील वाढ, गेल्या वर्षीच्या तिमाहीतील महसूल उत्पन्नाच्या तुलनेत अनुक्रमे (-) ४१ टक्के, (-) ८ टक्के, ८ टक्के आणि १४ टक्के इतकी नोंदली गेली. याद्वारे वस्तू व सेवा कराचा महसुली उत्पन्नाचा व देशाच्या सर्वांगीण अर्थव्यवस्थेचा चढता कल स्पष्ट होतो.

गेल्या सहा महिन्यात वस्तू व सेवा कराच्या महसुली उत्पन्नाने एक लाख कोटी रुपयांचा आकडा पार केला असून, या कालावधीत जोरदार मुसंडी मारणारा कल महामारी च्या संकटानंतर अर्थव्यवस्थेत तीव्र गतीने सुधारणा घडून आणणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बनावट बिलांची बारकाईने निगराणी व वस्तू व सेवा कर, आयकर व सीमा शुल्क विभागाच्या माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे केलेल्या सखोल माहिती विश्लेषणामुळे कर महसूल उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. गेल्या काही महिन्यात केल्या गेलेल्या प्रभावी प्रशासनाचाही कर वाढीस हातभार लागला आहे.

खालील तक्त्यात वस्तू व सेवा कर महसुलाचा चालू वर्षातील कल दर्शविला आहे. हा तक्ता वस्तू व सेवा कराचे मार्च २०२१ दरम्यानचे (मार्च २०२० च्या तुलनेत) राज्यनिहाय संकलनही दर्शवितो.



**Yojana Marathi** (Montly) **May, 2021**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2019-21

Published Date : 12th May, 2021
Date of Posting : 16th May, 2021

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा. आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने ७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

### जाहिरात दर पत्रक

| | |
|---|---|
| ब्लॅक अँड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अँड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

विक्रीचे ठिकाण : ७०१ बी, ७०१ सी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध केले जाते.

Editor - **Umesh Ujgare**
Published by **Ms. Monideepa Mukerjee**, Director General, on behalf of Publications Division
and Printed at JVK Dev Prints, TTC Industrial Area, Mahape, Navi Mumbai - 400710. Mob. : 8369976663
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400614.
Posted at - Kokan Bhavan Post Office, CBD Belapur - 400 614